## निर्मलकुमार फडकुले

# हिरव्या वाटा



# हिरव्या वाटा

निर्मलकुमार फडकुले

सुपर्ण प्रकाशन, पुणे

प्रकाशक
सौ. सुनीता मिरासदार
सुवर्ण प्रकाशन
१५५२, चिमणबाग
सदाशिव, पुणे ४११ ०३०

प्रथमावृत्ती
मार्च १९८६

© निर्मलकुमार फडकुले
१५४, रेल्वे लाईन्स
सोलापूर

मुखपृष्ठ
चंद्रमोहन कुलकर्णी

किंमत ३० रुपये

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४, सदाशिव पेठ
टिळक रोड, पुणे ४११ ०३०

'हिरव्या वाटा' हे प्रा. डॉ. निर्मलकुमार फडकुले लिखित पुस्तक १९८६ साली 'सुपर्ण प्रकाशन' यांनी प्रकाशित केले. त्या पुस्तकाचे सर्वाधिकार लेखकाचे चिरंजीव व वारस श्री अजित फडकुले यांच्याकडे आहेत.

त्यांनी ई साहित्य प्रतिष्ठानला याचे ई पुस्तक बनवून विनामूल्य वितरित करण्याचे कायदेशीर अधिकार दिले आहेत. त्यानुसार आम्ही आमच्या वाचकांना ते पुस्तक विनामूल्य देत असून त्यांनी ते आपल्या ओळखीच्या वाचकांत विनामूल्य वितरित करावे ही विनंती करत आहोत.

या परवानगीसाठी आम्ही

श्री अजित फडकुले :-9422463642

यांचे आभारी आहोत.

ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com
www.esahity.com
www.esahity.in

# हिरव्या वाटा

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : श्री. अजित फडकुले यांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

**असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.**

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.

## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाचे चिरंजीव व वारस श्री. अजित फडकुले यांचेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (तुरुंगवास व दंड) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## ई प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

प्रकाशन : २८ जुलै २०२०

(स्व. श्री. निर्मलकुमार फडकुले स्मृतीदिन)

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी- घेणे आवश्यकआहे.

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

अनुभवाहून मोठा गुरू नाही. कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. काही प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. बाकीचे प्राणी अनुभव घेत घेत शिकतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

www.esahity.in आणि www.esahity.com

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वतःही लिहायला हवं.

सौ. मंदाकिनीस...

# थोडे माझ्या मनातले....

माझ्या काही ललितलेखांचा हा संग्रह. मनात येणाऱ्या अनेक भावविचारांना शब्दांकित करण्याचा हा एक प्रयत्न. याचे स्वरूप काहीसे स्वैर आहे. एखाद्या जड तंत्रात आपले लेखन बसवावे असे मला वाटत नाही. एखादी चौकट मनात ठेवून चित्र रेखाटण्याची कल्पना मला तरी कृत्रिम वाटते. तंत्राचे भान ठेवताना लेखन निर्जीव, साचेबंद बनण्याची शक्यता असते. जसे सुचत गेले तसे लिहिण्यात कदाचित विस्कळितपणाचा दोष निर्माण झाला तरी त्यातला अंगभूत जिवंतपणा जाणवतो. तोच कोणत्याही साहित्याचा केंद्रबिंदू असतो व असावा. माझ्या लेखनात तो कितपत आहे याचा निर्णय रसिकांनी करायचा आहे.

हे लेख अनेकविध विषयांवरील आहेत. जीवनाकडे पाहण्याची लेखकाची एक विशिष्ट दृष्टी असते. लेखनात आणि त्याच्या चिंतनात ती मिसळलेली असावी अशी अपेक्षा आहे. प्रेमापासून मृत्यूपर्यंत जीवनातल्या कित्येक विषयांवर मी लिहीत गेलो. चिंतनशीलता आणि लालित्य यांचा या लेखांतून समन्वय झालेला दिसेल. प्रत्येक अनुभव आपल्याला काहीतरी देऊन जातो. त्याच्या खुणा मनावर उमटलेल्या असतात. त्या अनुभवांमुळेच आपल्या चिंतनालाही गती मिळते. कित्येक प्रश्नांची उत्तरे अशावेळी सुचतात. पण काही प्रश्न अनुत्तरितही राहातात. स्वतःच्या मनाशीच वाद संवाद करण्याच्या प्रवृत्तीतून या लेखनाला आकार मिळत गेला. थोडे फार जीवन पाहिलेल्या आणि

अनुभवलेल्या, अंतर्मुख वृत्तीच्या मनुष्याचा स्वतःशी बहुधा वाद-संवाद चाललेला दिसतो. त्यातल्या तत्त्वचिंतनाला कधी मिस्कीलपणाचा, तर कधी हास्यविनोदाचा वात्रट आणि कधी तत्त्वमंथनाचा काहीसा गडद रंग चढलेला दिसतो. असेच काही गमतीदार रंग आणि गंध या लेखनावरही आलेले आहेत असे मला वाटते. आमोद प्रमोदाच्या हिरव्या वाटांनी सहजपणाने केलेले जीवनचिंतन असेच याचे स्वरूप आहे. मात्र या वाटा आखलेल्या नाहीत. त्या सापडलेल्या आहेत. या वाटांना काही अंगभूत वळणेही आहेत. त्यावरून चालताना पायाखालची हिरवळ आणि अवतीभवती आपल्याच नादात वाहणारे चिमुकले निर्झर, पक्ष्यांची हिरवी किलबिल, वाऱ्याची झुळुक आणि बोचणारे काही काटे यांचा मला आलेला अनुभव मी व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे.

'केसरी', 'लोकमत' आणि 'संचार' या नियतकालिकांतून हे लेख प्रथम प्रकाशित झाले. वाचकांना ते आवडले. अनेकांनी प्रत्यक्ष भेटीत व पत्रे लिहून आपली प्रतिक्रिया कळवली. माझे मित्र प्रा. वसंत मिरासदार व सौ. सुनीता मिरासदार यांनाही हे लेखन आवडले. सुपर्ण प्रकाशनच्या वतीने त्यांनी स्नेहभावाने हा ललितलेखसंग्रह प्रकाशित केला याबद्दल मी त्यांचा मनःपूर्वक ऋणी आहे. वर उल्लेखिलेल्या नियतकालिकांच्या संपादकांचाही मी आभारी आहे.

वाचकांच्या पदरात हे ललितलेख चिंतनाचे आणि आनंदाचे काही समाधानी क्षण टाकतील अशी मला आशा आहे.

**निर्मलकुमार फडकुले**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | प्रेम प्रकरण | १ |
| २ | हास्यकथा | ७ |
| ३ | अजून यौवनात मी | १३ |
| ४ | महापुरुष आणि पुतळे | १९ |
| ५ | स्त्री : पिंजऱ्यातील मैना ! | २५ |
| ६ | खरंच जग सुंदर आहे | ३२ |
| ७ | पतिव्रतेच्या गळ्यात धोंडा | ३९ |
| ८ | पुस्तके बुडवून टाकली तर... | ४४ |
| ९ | संत आणि चमत्कार | ५१ |
| १० | पैशाला पासरी माणसे | ५८ |
| ११ | ' संवाद ' ज्ञानेश्वराशी | ६४ |
| १२ | कविता आणि कोंबडीचे अंडे | ७१ |
| १३ | शेपटी हलविण्याची विद्या | ७८ |
| १४ | अरे संसार संसार ! | ८४ |
| १५ | कथा आत्मकथेची | ९० |
| १६ | काळपुरुषाशी ' संवाद ' | ९७ |
| १७ | ते बहारीचे दिवस... | १०३ |
| १८ | भाकरी आणि स्वप्ने | ११३ |
| १९ | शेवटचा दीस गोड व्हावा ! | ११८ |

## १

# प्रेम प्रकरण

' अंधारी रात्र. मधून मधून मेघांचा गडगडाट आणि विजांचा कडकडाट. अशा वेळी मुसळधार पावसाची क्षिती न बाळगता वसंतसेना चारुदत्ताला भेटण्यासाठी संकेत स्थळाकडे निघाली आहे. काट्याकुट्यांची अन् खाचखळग्यांचीही तिला पर्वा नाही. '

हे वर्णन जेव्हा मी वाचलं तेव्हा मनाशी म्हणालो, ' धन्य तो चारुदत्त ! ' ' मृच्छकटिक ' नाटकामधलं पदही मला आठवलं. ' अंगे भिजली जलधारांनी, ऐशा ललना स्वये येऊनी, आलिंगिती ज्यांना, तेचि पुरुष दैवाचे.' प्रेमाचा लाभ होणं हे सुदैवाचं लक्षण आहे असं मत या कवीनं व्यक्त केलं आहे. त्यातून वसंतसेनेसारख्या रसिक युवतीचं प्रेम मिळणं हे अधिकच भाग्याचं मानलं पाहिजे.

पण बर्नार्ड शॉ या प्रतिभावंत नाटककाराला मात्र हे मत मान्य नाही. हा अभिजात खवचट लेखक प्रेमासंबंधी जो अभिप्राय देतो तो वाचण्यासारखा आहे. त्याच्या बोलण्यात चमत्कृती आणि विनोद असतो. पण केवळ विनोद करण्यासाठी तो विक्षिप्त विधानं करीत नाही. प्रेम, विवाह याबद्दल तो म्हणतो, " Love is like getting drunk, Marriage is like the headache next morning and divorce is the aspirin tablet." प्रेम म्हणजे मद्यपान, लग्न म्हणजे दुसऱ्या दिवशीची डोकेदुखी आणि घटस्फोट म्हणजे डोकेदुखी नाहीशी करणारी ॲस्परिनची गोळी. शॉच्या या विधानात

विनोद तर आहेच पण वस्तुस्थितीचंही चित्र आहे हे नाकारता येणार नाही. मद्याची नशा आणि प्रेमाची धुंदी यात विलक्षण साम्य नाही काय? मद्यपान करणाऱ्याचाही तोल जातो तसाच प्रेममदिरेचं प्राशन करणाऱ्याचाही जातो. दोघेही बेभान असतात. आपल्या स्वैर कल्पनेच्या विश्वात भटकत असतात. प्रेमात पडलेल्या दोन व्यक्ती अखेर लग्न करतात आणि मग इथेच त्यांच्या प्रेमाचा शेवट होतो. लग्नापूर्वी या प्रेमिकांच्या अंतःकरणातली प्रेमगंगा ( हो ! गंगाच म्हटलं पाहिजे. कारण प्रेम हे गंगेसारखं पवित्र असतं असं मी कुठंतरी वाचलं आहे. ) दुथडी भरून वाहत असते. प्रणयाच्या उन्मादक चांदण्यातून विहार करताना त्यांना काटे देखील फुलंच वाटतात. यावेळी चंद्रावरचा कलंक दिसत नाही. उलट चंद्रावर स्वारी करण्याचे प्रेमळ मनसुबे रचले जातात. त्या परमेश्वराने आपल्याला ' एक दुजे के लिए ' निर्माण केलं आहे असा विचार या प्रेम–पंढरीच्या वारकऱ्यांना सुचतो. तो तिच्या ' अद्वितीय ' सौंदर्याची तोंड भरून स्तुती तिच्या तोंडावर करीत असतो. तिला ती खरीच वाटते. तीही त्याच्या ' सद्‌गुणांची, पराक्रमांची ' उजळणी करीत असते. त्यालाही ते शंभर टक्के पटतं. काहीही खरं वाटावं अशाच अवस्थेत ते असतात. प्रेमाचा प्याला झोकल्यानंतर कल्पनेच्या हिंदोळ्यावर बसून स्वर्गापर्यंत झोके घ्यायला कुणाची बंदी आहे? पण हेच प्रेमिक जेव्हा लग्न करून मोकळे होतात तेव्हा एकमेकांना बांधले जातात. अगदी करकचून बांधले जातात. स्वप्नांचं इंद्रधनुष्य वितळून गेलेलं असतं. चांदण्याचा सुवास, फुलांची गाणी विरून जातात आणि रडगाणी कानावर येऊ लागतात. वास्तवाचं उन्ह चटके देऊ लागते. मग ते धास्तावतात आणि पस्तावतात. धुंदी उतरते. डोकेदुखीला सुरुवात होते. शॉच्या विधानात विनोदाचं पांघरुण घेतलेलं एक सनातन बोचक सत्य आहे यात शंका नाही.

कित्येक प्रेमविवाहांची अशीच परिणती झालेली मी पाहिली आहे. एके दिवशी एम. ए. च्या वर्गातला एक अभ्यासू तरुण विद्यार्थी ' थोडं खाजगी बोलायचं आहे ' असं म्हणून हळुवार पण काहीसा व्याकुळ स्वरात माझ्याशी बोलू लागला. त्याचं म्हणे वर्गातल्या एका सुंदर मुलीवर प्रेम बसलं होतं. ( प्रेम सुद्धा धूर्त असतं. नेमक्या सुंदर मुलीकडेच ते वळतं. ) तो म्हणाला, ' सर, गेले दोन महिने मी तिच्याच विचारात गुरफटून गेलो आहे. ध्यानी, मनी, स्वप्नी केवळ तीच असते. तिची सुद्धा अशीच अवस्था आहे. आम्ही दोघांनी

लग्न करण्याच ठरवलं आहे. आम्हाला मार्गदर्शन करा '. या बाबतीत मार्गदर्शन करण्याचा मला अधिकार आहे असा त्याचा गैरसमज का बरं झाला असावा ? या विद्यार्थ्याची परीक्षा बुडणार ही मला चिंता होती. म्हणून मी त्याला म्हणालो ' नीट विचार करूनच निर्णय घे.' त्यावर तो उत्कटतेनं म्हणाला, ' तिच्याशिवाय मी जगूच शकणार नाही. आयुष्य किती सुंदर असतं हे तिच्यामुळं ध्यानात आलं.'

आता माझ्याही ध्यानात आलं होतं की, यावेळी तरी त्याला विरोध करणे शक्य नाही. Love is a malady without a cure (प्रेमाचा हा रोग असा आहे की, त्याच्यावर उपाय नाही. ) दोघांनीही झटपट लग्न केलं पण वर्षभरातच ती दोघेही विटली. एकमेकांचा द्वेष करू लागली. लग्नाचं बंधन त्यांना असह्य झालं. ज्याला आपण प्रेम म्हणत होतो ते एक अल्पकाळ टिकणारे आकर्षण होते. तो एक तात्पुरता मोह होता. प्रेमाची संजीवक स्फूर्तिदायक भावना आपल्या मनात रुजलेलीच नव्हती. आपण क्षणिक विकारालाच प्रेम समजण्याची फार मोठी चूक करून बसलो याची जाणीव त्या दोघांनाही झाली. प्रेमापेक्षा प्रेमविवाहाचेच त्यांना आकर्षण वाटले असावे. आपण काहीतरी लौकिकावेगळे, विलक्षण, काहीतरी रोमँटिक साहस करीत आहोत या भावनेने ते भारावले असावेत. प्रेमाची भावना ही खरे तर एक अत्यंत सुंदर आणि उत्कट भावना आहे यात संशय नाही. या भावनेचे बीज एकदा का आयुष्याच्या भूमीत खोलवर रुजले की जीवनाचा वृक्ष कसा बहरून जातो. जडत्वाला चैतन्याची देणगी देणारी प्रेम नावाची हिरवी सळसळती शक्ती जेव्हा माणसाच्या रोमरोमांत संचारते, तेव्हा त्याच्या माणुसकीचा विकास होतो. त्याच्या जाणीवा उत्कट आणि समर्थ बनतात. प्रेमातूनच पराक्रमाला उधाण येते. भक्तीला भरती येते. शृंगाराला माधुर्य मिळते. दु:खालाही अर्थ आणि सुरूपता येते. प्रेमाची कवचकुंडले असतील तर आयुष्याच्या रणांगणात मरण नाही. पण हे प्रेम अस्सल असेल तरच. व्यवहारात ज्याप्रमाणे खोट्या नाण्यांचा धूर्त लोक वापर करतात, त्याप्रमाणे प्रेमाच्या नावाखाली आपला स्वार्थ साधणारे कमी नसतात. प्रेमही समजले पाहिजे. सुख आणि दु:ख देण्याची त्याची शक्ती त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्यालाच समजते.

स्त्री-पुरुषांत निर्माण होणारे प्रेम ही एक इतकी नैसर्गिक घटना आहे की तिचे समर्थन करण्याचे काहीच कारण नाही. प्रेम नसते तर साऱ्या सृष्टीचेच जीवन रसशून्य झाले असते. ' प्रीती निमाली तर ' या नावाची विनायकांची एक

कविता मला आठवते. ' भीतीने मरतील मानवकुले, प्रीती निमाली तर ' असा निष्कर्ष त्यानी काढला आहे. भावनाशील कवींनीच नव्हे तर विचारशील तत्त्ववेत्त्यांनीही प्रेमाची महती गाताना शब्दांची काटकसर केली नाही. किंवा खरे सांगायचे तर कितीही शब्द उधळले तरी प्रेमाच्या प्रभावाची यथातथ्य कल्पना शब्दांतून येणार नाही. प्रेम म्हणजे काय या प्रश्नाचे उत्तर आपण स्वतः प्रेमात पडल्याशिवाय मिळू शकत नाही. प्रेम कसे मिळते याही प्रश्नाला आपण स्वतः प्रेम दिल्याशिवाय आपल्याला मिळत नाही हेच आहे. स्त्री-पुरुषांतली नैसर्गिक शारीरिक ओढ ही प्रेमाची पहिली पायरी मानायला हरकत नाही. पण केवळ याच पायरीवर कायमचा मुक्काम करणाऱ्या अभाग्यांना प्रेमाचा स्वर्ग कसा दिसणार ? कदाचित याच लोकांनी या भावनेला बदनाम करून ठेवले आहे, असे म्हणायला हरकत नाही. आपल्या प्रिय व्यक्तीच्या सुखदुःखांशी, आशा-आकांक्षांशी सर्वस्वी समरस होऊन जाण्याच्या अदम्य प्रवृत्तीलाच प्रेम ही संज्ञा शोभून दिसते. ' उत्तररामचरित ' या भवभूतीच्या नाटकात एक भावपूर्ण प्रसंग आहे. दुःखावेगाने मूर्च्छित झालेल्या सीतेच्या कपाळावर राम आपला हात ठेवतो आणि त्या ' राम ' स्पर्शाने सीता लगेच सावध होते. हा प्रसंग मला एकेकाळी ' नाटकी ' वाटत होता. भवभूतीला मी त्याबद्दल मनातल्या मनात दोषही दिला होता. पण कविवर्य बा. भ. बोरकर त्या संदर्भात मला म्हणाले,

' यात कसलीही अतिशयोक्ती नाही. नाटक रंगविण्यासाठी ही कल्पना नाटककारानं लढवली नाही. रामाच्या हृदयात सीतेबद्दल जी आत्यंतिक प्रीती होती तिचा साक्षात्कारी स्पर्श बेशुद्ध झालेल्या सीतेला रामाच्या हातातून स्पष्ट जाणवला. खरं प्रेम लपत नाही. आणि लपवलं तरी ते प्रकट झाल्याशिवाय राहत नाही. सीता आणि राम यांच्या हृदयातली कंपनं परस्परांना भेटत होती, असंच यातून भवभूतीला सुचवायचं आहे.' अशाच आशयाचं स्पष्टीकरण एकदा वि. स. खांडेकरांशी बोलताना त्यांनी केलं होतं हे मला आठवलं.

ज्ञानेश्वराची एक मार्मिक ओवी आहे. खरं तर ज्ञानेश्वर एक संन्यासी, बालब्रह्मचारी. पण ते नुसतेच ज्ञानेश्वर नव्हते तर कवीश्वरही होते. साऱ्या जीवसृष्टीवर आपल्या हृदयस्थ प्रेमामृताचा वर्षाव करणारा हा एक रसलुब्ध प्रेमिक होता. प्रेमभावनेतली मृदुलता आणि समर्थता याची जाणीव या सौंदर्यवादी कलावंताला होती. त्याच्या ओवीचा सारांश असा की, चंद्रोदय झाला की

चंद्रविकासी कुमुदिनी आपलं स्थान न सोडता चंद्राला उत्कटतेनं आलिंगन देते. हा प्रेमानुराग केवळ तिलाच भोगता येतो. प्रीतीचं इतकं सूक्ष्म आणि संवेद्य रूप दुसऱ्या एखाद्या कवीनं दाखवलं आहे काय ? माझ्या तर अंगावर ही ओवी वाचताना रोमांच उभे राहतात. चंद्रकिरणानं कमलिनीची अंगांगे फुलून येतात, तर रामाच्या प्रेमस्पर्शाने सीता शुद्धीवर का येऊ नये ? तर्कबुद्धीच्या चिमटीत प्रेमाला पकडता येत नाही. तो अनुभवाचाच विषय आहे. प्रेम व्यक्त करावं लागत नाही ते मूकपणानं प्रकट होतं. पण शब्दांच्या पकडीत मात्र आक्रसून जातं. काही प्रेमवीर आपल्या प्रेमाची जाहिरात करण्यात धन्यता मानतात तेव्हा हसूच येते. ' आय लव्ह यू ' असं आंग्ल भाषेतून पुन्हापुन्हा आपल्या प्रेयसीला बजावून सांगणारे ' लव्हर्स ' आपल्या ऐकण्यात आहेत. इंग्रजीतली धड दोन वाक्ये बोलता येत नाहीत पण आपल्या प्रेमाची ग्वाही मात्र इंग्रजीतूनच दिली पाहिजे. मराठीतून प्रेम कसं बरं व्यक्त होणार ? ग्यानबा, तुकारामाची ही खेडवळ भाषा ! इंप्रेशनच पडत नाही ! साहेबाच्या शब्दांतून एक्सप्रेस केल्यावर कसं वंडरफुल फीलिंग येतं ! पण काहीही असो, प्रेमानं प्रेमपत्र लिहायला भलतीच स्फूर्ती येते. आता सगळ्याच पत्रांतली भाषा, संबोधनं आणि विशेषणं ठरलेलीच असतात ते सोडून द्या. प्रेमपत्रे लिहिणारे प्रेमिक आपल्या अतिशयोक्तिपूर्ण भाषेत चक्क थापा मारीत असतात. प्रेमात आणि युद्धात सर्व काही क्षम्य असल्यामुळं हे असत्य खपून जायला हरकत नाही. प्रेमकवितांनी तर जीव बेजार करून टाकला आहे. ज्यांच्याकडे कधीही ढुंकून पाहण्याची सुद्धा प्रेमाची छाती होणं शक्य नाही असे काही कवी ( ? ) प्रीतीचे लेबल चिकटवून कविता मॅन्युफॅक्चर करीत बसलेले दिसतात. चालायचंच ! कालिदास, शेक्सपिअरशी सोयरीक साधण्याचा एक प्रेमळ प्रयत्न !

परवा एका चित्रपट रसिकानं मला आग्रह करून एका चित्रपटाला नेलं. त्या चित्राची प्रेमकथा म्हणे त्याला फार आवडली होती. पण त्यातले ढोबळ प्रेमचाळे पाहून मी कंटाळलो. ते सांकेतिक फिल्मी प्रेम पडद्यावर पाहताना मला केव्हा झोप लागली ते कळलेच नाही. ' अब दुनियाकी कोई ताकद हमें एक दुसरेसे जुदा नही कर सकती ' असे चिरक्या आवाजात त्यातला तडफदार नायक जेव्हा म्हणतो तेव्हा तर थिएटरात टाळ्यांचा कडकडाट झाला आणि मी जागा झालो. त्या प्रेमाने मला जागृती आणली. आपले प्रेम सफल होत नाही म्हणून त्यातले

नायक नायिका आत्महत्या करतात असा त्या चित्राचा ' दर्दभरी ' शेवट होता. मग असला खुळचट संदेश देण्याऐवजी प्रेमासाठीच तुम्हाला जगले पाहिजे हा संदेश देण्याची आवश्यकता आहे. प्रेमवैफल्याचं दु:ख सहन करीत आपल्या प्रेमाला उदात्ताच्या पातळीवर नेण्याचे सामर्थ्य प्रेमातूनच मिळवायला पाहिजे. प्रेमभंगाच्या वेदनेने दु:खी झालेली काही माणसे आपल्या भावनेचे उदात्तीकरण करून समाजाच्या सुखदु:खात एकरूप झालेली मी पाहिली आहेत. ते आपल्या प्रेमभंगाचे ढोल बडवीत बसले नाहीत.

एकदा कुसुमाग्रजांची एक सुंदर कविता वाचून दाखविल्यावर मी तिच्यातल्या प्रेमभावनेचे विश्लेषण करीत होतो. एक विद्यार्थी उठून मला मिस्किलपणानं म्हणाला, ' सर, प्रेम करण्याचं परमिट कसं मिळतं ? कुठं मिळतं ?' त्याच्या व्रात्य प्रश्नाला मीही तशाच खट्याळपणानं उत्तर दिलं,

' तुम्हाला हे परमिट कधीकाळी मिळेल असं लक्षण दिसत नाही. तुमच्याबद्दल मला सहानुभूती वाटते. पण अगदीच निराश होऊ नका. चार ठिकाणी खटपट करा. कोणाचा तरी वशिला लावून पहा. एखाद्यावेळेस जमून जाईल !' वर्गात हास्याच्या लाटा उठत होत्या. त्या विरल्यानंतर मी म्हणालो,

' प्रेमाच्या प्रांतात प्रवेश करताना सारे पासपोर्ट, सारी सर्टिफिकिटं व्यर्थ आहेत. ती प्रथम फेकून द्या. आपल्या प्रामाणिक भावनेचा दरवळणारा गंध दुसऱ्या व्यक्तीला देण्याची दुर्दम्य इच्छा ज्याच्या अंत:करणातून उचंबळत असते, त्यालाच प्रेमाच्या गावाला जाण्याचे तिकिट मिळते. ज्याला आकाशाची निळाई मोह घालते, ज्याला पाखरांची किलबिल आवडते, ज्याला एखादी उत्तम कविता वाचताना रोमांचित होता येते, ज्याला संगीताचे सूर मुग्ध करतात, ज्याला एखाद्याचे अश्रू आपल्या अंत:करणाच्या ओठांनी टिपून घ्यावेसे वाटतात, ज्याला स्त्रीच्या डोळ्यांत तरंगणारे, गालावर खुलणारे, हास्यात भिजलेले सौंदर्य चटका लावून जाते, आणि ज्याला तिच्या हृदयाची कंपने जाणवतात, जो तिच्यासाठी जीवही ओवाळून टाकायला तयार होऊ शकतो तोच खरा प्रेमिक असतो. प्रेमाचं परमिट मिळवणं हे सिमेंटच्या परमिटइतकं सोपं नसतं. '

# २

## हास्यकथा

निसर्गाने माणसाला काही अद्भुत देणग्या देऊन टाकल्या आहेत. हास्य ही सर्वांत विलक्षण देणगी नव्हे काय? माणूसच केवळ हसू शकतो. रस्त्यातून जाताना एखादी म्हैस दुसऱ्या म्हशीकडे पाहून केव्हातरी हसल्याचा पुरावा अजून तरी मिळत नाही. गालावर हास्याचे चांदणे खुलले की, कुरूप मनुष्यसुद्धा सुरूप दिसू लागतो हा एक चमत्कार आहे. सुंदर मुखावर हास्याची प्रभा पसरली तर ते विलोभनीय हास्य कसे दुधात केशर मिसळल्यासारखे वाटेल.

असे म्हणतात की, सृष्टीतला सर्वात सुंदर प्राणी मनुष्य हाच आहे. पण मला वाटते त्याच्या सुंदरतेचे रहस्य त्याच्या हास्यातच आहे. हसणाऱ्या माणसाबरोबर सारेच हसतात, मैत्री करतात. रडणाऱ्याला मात्र एकट्यानेच रडावे लागते. काही वर्षांपूर्वी– कॉलेजात मी विद्यार्थी म्हणून होतो तेव्हाची गोष्ट. आपल्या मुग्ध हास्याने साऱ्यांना मंत्रमुग्ध करणारी एक मुलगी आमच्या वर्गात होती. केव्हाही पाहिले तरी तिच्या मुद्रेवर सुंदर हास्याची मधुर छटा दिसायची. हसायला तिला एखादे विशेष कारण लागायचे असे मुळीच नाही. ती अगदी सहज हसत असे. जन्माला आल्यानंतर प्रत्येक मनुष्य रडत असतो. याचा अर्थ रडणे जन्मजात असते. पण ही मुलगी जगात अवतीर्ण झाल्याबरोबर आपल्या आईकडे पाहून हसली असावी इतके तिचे हास्य नैसर्गिक होते. एखाद्या दिवशी ती वर्गात आली नाही तर प्राध्यापकसुद्धा काहीसे बेचैन व्हायचे. त्यांची अस्वस्थता लक्षात येऊन आम्ही

खट्याळपणाने हसत असू. या घटनेला बरीच वर्षे झाली. ती 'स्मितप्रभा' सध्या कोठे आहे हे कोणालाच माहीत नाही. दोन दोन मुलांचे बाप झालेले माझे वर्गमित्र जेव्हा मला भेटतात तेव्हा साहजिकच कॉलेजातल्या त्या बहरलेल्या दिवसांची आठवण निघते. 'त्या हास्यमुखीच्या' कित्येक आठवणी मित्र बोलून दाखवतात. प्रत्येकानेच आपल्या हृदयाच्या एका कोपऱ्यात तिचे हास्य अजूनही जपून ठेवले आहे. परवा विदर्भातल्या एका गावात व्याख्यानासाठी गेलो होतो. भाषण करीत असताना स्त्री-समूहातून ते विलक्षण सुंदर स्मितहास्य माझ्या दिशेने येत आहे असे मला दिसले आणि त्याच्या चैतन्यस्पर्शाने माझे व्याख्यान रंगून निघाले. मुळातच ती मुलगी विशेष सुंदर नव्हती. आता तर ती चांगलीच प्रौढ झाली होती. पण तिच्या मुखावरच्या त्या विलक्षण हास्यात पूर्वीचेच नवथर तारुण्य डोकावत होते. तिच्या स्वच्छ मनाप्रमाणे तिच्या हास्यातही एक अंतर्बाह्य नितळपणा आणि निर्मळपणा होता. वर्षे उलटून गेली तरी आपले हास्य सदैव टवटवीत ठेवण्याच्या तिच्या सामर्थ्याचा मला हेवा वाटला. दैनंदिन व्यवहाराच्या उष्णतेतही आपल्या हास्याची फुले तशीच सतेज आणि सुगंधी ठेवणे आम्हाला तरी जमले नाही. पण हिच्या हृदयातील हास्याची तार अजूनही मधुर झंकार करीत आहे हे पाहून फार बरे वाटले.

एकदा मी अशीच हास्यविनोदाची बाजू माझ्या एका मित्रासमोर जोरदारपणे मांडीत होतो. माझा युक्तिवाद तो गंभीरपणे ऐकून घेत होता तरी माझे मुद्दे त्याला अगदीच हास्यास्पद वाटत होते असे दिसले. आपल्या ठेवणीतले एक कुजके हास्य मला बहाल करून तो म्हणाला,–

'हसण्यासंबंधीचा तुझा हा सगळा युक्तिवाद ऐकून तुझ्यापुढे काय रडायचे! तू एक खुशालचेंडू वृत्तीचा उनाड माणूस आहेस. हसायला तुम्हाला पैसे पडत नाहीत. पण सद्गृहस्था, अरे, आपल्या आयुष्यात आणि जगात इतकी दुःखे आहेत की, हसायचे म्हटले तरी हसू येत नाही. ज्याला दुःखे आणि संकटे दिसत नाहीत, ज्याला जगातल्या अन्यायाची चीड येत नाही, ज्याला कोणत्याही जबाबदारीची जाणीव असत नाही असले टोळभैरवच फक्त हसू शकतात. समर्थ रामदासांनी म्हणून ठेवले आहे की, 'टवाळा आवडे विनोद'. आम्हालाही कधीकधी हसावेसे वाटते पण हसताच येत नाही याला काय करावे?' त्याच्या या प्रश्नाला मी भरपूर हसलो. त्याच्या खांद्यावर थोपटून म्हणालो,–

' भल्या गृहस्था, आता तुझा युक्तिवाद ऐकून कुणीही हसेल. जो हसतो त्याचे अंत:करण जिवंत असते. मनमोकळेपणाने खळखळून हसणारा मनुष्य वयाने म्हातारा झाला तरी वृत्तीने तरुणच राहतो. ज्याला मनापासून हसता येते तोच एखाद्या अन्यायाचा मनापासून धिक्कार करतो. आणि त्यावर प्राणपणाने तुटून पडतो. हसायला दात लागत नाहीत. ते नसले तरी चालतात. हसायला केवळ जीवनप्रेमी मनुष्याचे उचंबळते अंत:करण आवश्यक असते. जीवनात आणि जगात फार दु:खे भरली आहेत म्हणून दुबळेपणाने रडत बसणारा मनुष्य दु:खात नुसती भर घालीत असतो...पण दु:खाच्या आणि आपत्तीच्या वणव्यातसुद्धा रसिकतेने हसू शकणारी जिद्दी माणसे आपल्या हास्य-विनोदाने दु:खाला पराभूत करू शकतात. तुला कल्पना नाही, मोलियर हा एक विनोदी नाटककार होऊन गेला. त्याची नाटके पाहताना हजारो प्रेक्षकांच्या हसून हसून मुरकुंड्या वळायच्या. विनोदी साहित्यात त्याने अत्यंत लक्षणीय भर टाकली. दैनंदिन दु:खातून आणि व्यावहारिक काचातून सुटण्यासाठी प्रेक्षकांची नाटकगृहात झुंबड उडायची. घरून वैतागूनआलेले हे लोक नाटक पाहताना एखाद्या धबधब्यासारखे धो धो हसायचे, हास्याच्या त्या प्रचंड प्रवाहाबरोबर जणू त्यांची दु:खे आणि विंवंचना पार वाहून जायच्या. ताज्या टवटवीत मनाने ते आपल्या घरी जायचे आणि रोजच्या दैन्य-दु:खाबरोबर नव्या उत्साहाने झगडत राहायचे. या हजारो लोकांच्या मनात मोलियरने हास्यविनोदाची फुलबाग फुलवली. आश्चर्याची गोष्ट अशी की, स्वत: मोलियरचे आयुष्य अनावर दु:खाने वेढलेले होते. दु:ख पचवून हसत राहायचे आणि जगालाही हसवीत ठेवायचे ही कठीण पण आनंददायक तपश्चर्या या नाटककाराने केली. अश्रूंचे रूपांतर हास्यात करणे अवघड असते पण अशक्य मात्र मुळीच नसते. प्रत्येकाच्या वाट्याला दु:खवेदनांच्या रसायनांने भरलेला एक प्याला येत असतो. ते कडवट पेय पिताना तुमच्या मुखावर हास्याचा प्रकाश पसरला तर तुमच्याबरोबर अनेक जण हसत हसत आयुष्याच्या काटेरी वाटा चालायला लागतील.'

हास्यावरचे माझे हे गंभीर प्रवचन ऐकून माझा मित्र आता मनापासून हसला. तो हसला म्हणून मी हसलो. आचार्य अत्रे म्हणायचे, ' हास्य हा एक सांसर्गिक रोग आहे.' पण सगळेच मन:पूर्वक हसू शकतात आणि विनोदाचा आस्वाद घेऊ शकतात असे मात्र नाही. मला अशी शंका आहे की, काही जणांना हसण्याचे

इंद्रियच नसते. ते हसतात तेव्हा केवळ त्यांचा जबडा पसरट होतो. दात दिसतात. डोळे थोडे किलकिले होतात. असल्या 'शारीरिक' हास्याला घेऊन काय करायचे? हे हसणे नव्हेच मुळी! आता थोडे हसायलाच पाहिजे म्हणून हसणाऱ्या लोकांचे मला तरी हसू येते. निवडणुकीला उभा राहिलेला उमेदवार आपल्या मतदारासमोर उभे राहून विनयाचा नाटकी अभिनय करीत जे कावेबाज हास्य करतो, त्यालाही मी हास्य म्हणणार नाही. अंतरंगातल्या निर्व्याज, निरपेक्ष आनंदाचा व प्रेमाचा आविष्कार जेव्हा सहजहास्यातून होतो तेव्हा ते हास्य म्हणजे सौंदर्याचा अप्रतिम नमुना असतो. सद्भावनेतून फुलून येणाऱ्या हास्याचा गंध वर्षानुवर्षे दरवळत राहतो. असले उदात्त हास्य हसण्याइतके सौभाग्य आमच्या वाट्याला कधी येईल का? महात्मा गांधी आणि पंडित नेहरू दिल-खुलासपणे हसत आहेत असे एक छायाचित्र अनेक ठिकाणी लावलेले मी पाहिले आहे. गांधी-नेहरूंच्या रसील्या मनांवर या हास्याने किती प्रसन्न प्रकाश टाकला आहे. गौतम बुद्धाच्या साऱ्याच मूर्तींतील त्याची मुद्रा शांत प्रसन्न स्मिताने उजळलेली दिसते. श्रवणबेळगोळच्या डोंगरावर उभ्या असलेल्या गोमटेश्वराच्या मुद्रेवरही असे प्रसन्न मंदहास्य असलेले जाणवते. काय असेल ते असो! हास्याला आणि हसणाऱ्याला सारेच वश होतात.

एकदा गौतम बुद्ध एका तथाकथित प्रतिष्ठित गृहस्थाच्या घरापुढे भिक्षेसाठी उभे राहिले. ते घर बुद्धाच्या विरोधकाचे होते. तो गृहस्थ संतापाने बुद्धांना शिव्या देऊ लागला. आठवतील तितक्या शिव्यांचा वर्षाव त्याने त्यांच्यावर केला. पण बुद्धदेवांच्या चेहऱ्यावरचे प्रसन्न हास्य काही ढळले नाही. अखेर त्याच्या शिव्यांचा स्टॉक संपल्यावर बुद्ध स्मित करून शांतपणे त्याला म्हणाले, 'हे महाविद्वाना, तुला एक प्रश्न विचारतो. एखाद्याने एखाद्याला काही दान दिले पण ते त्याने स्वीकारले नाही तर ते दान कोणाच्या मालकीचे होते?' ते गृहस्थ उपहासाने हसून म्हणाले, 'ज्याने दिले त्याच्याच मालकीचे होते!' बुद्ध पुन्हा आपले मंद स्मित करून म्हणाले, 'होय ना? मग मी आपले दान स्वीकारले नाही.' गौतम बुद्धांच्या त्या प्रशांत हास्याचा आणि त्यांच्या क्षमाशीलतेचा परिणाम होऊन ते महाविद्वान विरघळले आणि बुद्धांचे अनुयायी झाले. हास्यविनोदालाही सत्प्रवृत्तीची भूमिका असावी लागते.

हसणे म्हणजे केवळ थिल्लरपणा असे मानणारे काही महाभाग आहेत. आपल्या

बायकोबरोबर तरी ते कधी नर्मविनोद करतात काय हा एक संशोधनाचा विषय आहे. आम्हाला शिकवणारे एक प्राध्यापक कमालीचे रुक्ष, गंभीर आणि हास्यशत्रू होते. कपाळावर आठ्या. तोंडातून बाहेर पडणारे शब्द रसशून्य. एकदा वर्गात कोणातरी विद्यार्थ्याने मुलीसारखा आवाज काढून त्यांना प्रश्न विचारला. सारा वर्ग खिदळत होता. मुलीही त्यात सामील झाल्या. खरे तर अशा वेळी प्राध्यापक-महाशयांनीसुद्धा त्या वात्रट विनोदाचा आस्वाद घेऊन त्या विद्यार्थ्याला विचारायला हवे होते, 'काय रे ! असं एकदम काय झालं ? डॉक्टरांकडून तपासणी तरी करून घे.' माझी खात्री आहे की, असला खोडकर विनोद केल्यावर तो वाह्यात विद्यार्थी निश्चित वरमला असता. पण प्राध्यापकमजकूर भयंकर संतापले. त्या वीस वर्षाच्या पोराला कॉलेजातून काढून टाका असला वेडा हट्ट घेऊन प्रिन्सिपॉलशी हुज्जत घालीत बसले. विनोद, वात्रटपणा आणि तारुण्य यांचे एक सुंदर समीकरण असते. वर्गात शिकवताना कधी कधी विनोदाचे फवारे उडत असतात. ते अंगावर घेऊन दोन फवारे आपणही उडवण्यात गंमत असते. हसऱ्या अवखळ तरुण-तरुणींच्या वर्गात प्रवेश केल्यावर प्राध्यापकाच्या मानेवरचे प्रौढपणाचे ओझे थोडे तरी कमी व्हावे आणि त्याने रसिकतेने आपल्या विद्यार्थ्यांशी काही अंशी समरस व्हावे, यात उभयपक्षी आनंद आहे. सरस्वती ही ज्ञानाची व रससौंदर्याची आनंददायी देवता आहे. आंबट अन् तुरट चेहरे करून बसले-ल्यांना ती कशी बरे प्रसन्न होईल ? एका विचारवंताने म्हटले आहे, 'ज्या दिवशी आपण हसलो नाही, तो दिवस अगदी व्यर्थ गेला असे समजावे.'

हास्यविनोदाची चव केवळ सुसंस्कृत रसिकालाच कळते. कुत्सित बुद्धीने उणीदुणी काढून हास्य निर्माण करण्याचा खटाटोप करणारा किंवा बीभत्स, अश्लील शब्द आणि हातवाऱ्यांचा वापर करून मनोरंजन करून घेणारा असंस्कृत माणूस खरे तर विनोदाचा मारेकरीच असतो. यांच्या विकट आणि चिकट हास्याला कुटाळकीचा दुर्गंध येतो. असल्या हास्याची कोण तरफदारी करील ? पण समाजातल्या दांभिकतेला, व्यक्तीच्या ठायी असणाऱ्या अहंगंडाला आणि लोकव्यवहारातील विसंगतींना उपहासाने हसणारे विडंबक मन हास्यविनोदाचा चांगला आविष्कार करू शकते. आमच्या काही थोर साधुसंतांनीही असला विनोद केला आहे. एकनाथांच्या भारुडात आणि तुकारामांच्या काही अभंगात अत्यंत गमतीदार पण उद्बोधक असा विनोद आहे. अध्यात्माची शिकवण

देतानासुद्धा हास्यविनोदाची पेरणी करणारे आमचे साधुसंत खरोखरच रसप्रसन्नतेचे देणे लाभलेले विनोदपंडित होते असेच म्हटले पाहिजे. जगात व जीवनात अनंत दु:खे आहेत तशीच अगणित सौंदर्येही आहेत. एखाद्या निरागस बालकाच्या मुखावरचे गोड हास्य पाहायला मिळणे किती आनंददायक आहे. एखाद्या प्रमदेच्या कपोलांवर फुललेले गुलाबी स्मित पाहिले की, निसर्गाच्या रमणीय जादुगिरीने काळजाचे काही ठोके चुकल्याशिवाय राहत नाहीत. आपल्या तान्हुल्याचे जावळ कुरवाळणारी सस्मित माता ही वत्सल सौंदर्याची परमावधी नव्हे काय ? आपल्या वृद्ध पित्याच्या मुद्रेवर समाधानी हास्याचा शिडकावा झाला की तो आपल्या मनाला नवी आशा देऊन जातो. हास्य हे जीवनाच्या जिवंतपणाचे आणि मनाच्या तारुण्याचे, दु:खावरही मात करण्याच्या वृत्तीचे एक सुंदर प्रतीक आहे.

# ३

# अजून यौवनात मी

तारुण्य म्हणजे जीवनाच्या वृक्षाला आलेला सुवासिक मोहोर! हा एकदाच येतो. पण जेव्हा येतो तेव्हा नवचैतन्याची पालवी फुटते. रस-भावनांची फुलं फुलून येतात. उन्मादाचा गंध दरवळायला लागतो. कित्येक स्वप्नांचे कांचनमृग दृष्टीसमोर उभे राहतात. अशा वेळी सुखे तर हवीशी वाटतातच, पण दु:खांनाही आमंत्रण द्यावं आणि त्यांना प्रेमभरानं कुरवाळावं असं वाटायला लागतं. पण हा मोहोर गळून पडल्यावर त्याचा मागमूसही राहत नाही. म्हातारपणाच्या निष्पर्ण फांद्या आणि काटक्या, मात्र गेलेल्या तारुण्याची केविलवाणी साक्ष देत उभ्या असतात. पण खरं तर वार्धक्यही यौवनाइतकंच नैसर्गिक नाही का? ते केव्हातरी येणारच असतं. त्यातही जीवनाचं काही सौंदर्य असतं. पिकलेल्या फळाला जशी एक रुची असते तसं पिकलेलं जीवनही रुचिर आणि प्रसन्न असायला हरकत नाही. तृप्ती आणि विरक्ती यांचं छानदार मिश्रण म्हणजे म्हातारपण असं म्हणता येईल. म्हातारा होईपर्यंत जगणं हे एक भाग्याचं लक्षण मानलं जात होतं. 'म्हातारा हो!' असा आशीर्वाद दिला जायचा. पण माणसे वार्धक्याला घाबरतात. ते येऊ लागलं की त्याची वाट अडविण्याचा प्रयत्न करतात. केसांना कलप लावून आपण केसाइतकेही म्हातारे झालो नाही असं भासवतात. एखाद्या सुगंधी द्रव्याचा लेप लावून गालावरच्या सुरकुत्या लपविण्याची धडपड सुरू होते. याचा उपयोग होतो काय? कित्येक स्त्रिया आपलं वय वर्षानुवर्षे चोरीत राहातात. माझ्या

महितीतल्या एका ' तरुणीनं ' आपला पंचविसावा वाढदिवस दहाबारा वर्षं साजरा केला. कदाचित पुढचे आकडे बिचारीला माहीत नसावेत. पण यात तिचं चुकलं असं मात्र मला मुळीच वाटत नाही. आपण अखंड तरुण आहोत असं मानून वार्धक्याला नकार देणारं तिचं मन जीवनाच्या उत्साहानं ओथंबलेलं आहे, असंच म्हटलं पाहिजे. चिरतारुण्याच्या कल्पनेत जगणारी माणसं आशावादी असतात. हातातून निसटून जाणारं तारुण्याचं कबुतर यथाशक्ति धरून ठेवण्याचा प्रयत्न फसत असला तरी तो प्रत्येकानंच करायला हवा.

आपण केव्हातरी म्हातारे होणार ( जर मध्येच देवाज्ञा झाली नाही तर ! ) हे सर्वांनाच माहीत असते. पण ही अवस्था कुणालाच आवडत नाही. एक गमतीदार संस्कृत श्लोक मला आठवतो. त्याचा आशय असा आहे : ' मला म्हातारपणाची भीती वाटत नाही. दात पडून गेले तरी चालतील. केस पांढरे-शुभ्र झाले आणि कानांनी संप पुकारला तरी माझी हरकत नाही; पण सुंदर सुंदर तरुणी मला ' आजोबा ' म्हणून हाक मारतील याचं मात्र मनस्वी दु:ख वाटतं.' सुंदर स्त्रियांच्या आदराचा विषय होणे कोणाला आवडेल ? वृद्ध माणसांना त्यांच्या वयामुळे आदरणीय मानतात. असला आदर आपल्याविषयी सुंदर स्त्रीनं दाखवावा याहून दुसरे दुर्भाग्य कोणते ? पण निसर्गाजवळ पक्षपात नसतो. बालपणानंतर तारुण्य आणि तारुण्यानंतर वार्धक्य हे रहाटगाडगं निरंतर चालूच राहणार आहे. काळाची ही गती अजून तरी अगतिक माणसाला थांबवता आलेली नाही. कुणी सांगावं ? उद्या एखादा शास्त्रज्ञ असाही शोध लावील की यौवनाला कधीही वार्धक्याचं ग्रहण लागणार नाही. जवानीची सळसळ आयुष्याच्या अखेरपर्यंत अनुभवता येईल. प्रमत्त तारुण्याच्या मोहकतेची पिसे मग कधीच गळणार नाहीत. असे घडले तर काय बहार होईल ! आयुष्याच्या कुपीत निसर्गानं भरलेलं तारुण्याचं अत्तर कधी आटणार नाही. जीवनातल्या दु:खांना मन कधीच विटणार नाही. असं घडलं तर अमावास्येच्या अंधारालासुद्धा पौर्णिमेची चंद्रिका मधुर आलिंगन देईल, उत्साहाचे झरे खळखळत राहतील. गुलाबाला काटे उरणार नाहीत. तरुण-तरुणींचा वसंतोत्सव कधी संपणार नाही. मग कुणालाच म्हातारपणीच्या पेन्शनची चिंताही उरणार नाही. खरेच, आंतरराष्ट्रीय युवा-वर्षाच्या निमित्तानं परमेश्वरानं चिरंजीव तारुण्याची देणगी माणसाला दिली तर माणूस सुखी होईल का ? हा प्रश्न मी एका तरुणाला विचारला. तरुणालाच शोभेल अशा उतावळेपणानं तो मला म्हणाला,

' तारुण्य म्हणजे सुख. तारुण्याच्या ताटात सुखाच्या पक्वान्नांची रेलचेल असते. तरुण असणं हीच माझ्या दृष्टीनं सुखाची परमावधी आहे. तुम्ही म्हणता त्याप्रमाणं म्हातारपण नाहीसं झालं तर चिरतरुण राहणारा मनुष्य सुखी-समाधानी झाल्याशिवाय राहणार नाही. ' त्याच्या युक्तिवादाचे मला हसू आले. तर्कशून्य विधानाचा एक चांगला नमुना म्हणूनच त्याच्या बोलण्याचं मी स्वागत केलं. मी त्याला म्हणालो,

' भल्या गृहस्था, तुझ्या निष्कर्षाला कोणता आधार आहे ? तारुण्य हे सुखाचं एक साधन आहे. पण त्यामुळे हुकमी सुख मिळतं असा जर तुझा समज असेल तर तो निव्वळ गैरसमज आहे. तारुण्यामुळं मनुष्य सुखी होत असता तर तरुणांच्या आत्महत्यांची बातमीही कानावर आली नसती. जगातली आकडेवारी काढली तर असं आढळेल की, वृद्धांपेक्षा तरुणच अधिकांशाने आत्महत्या करतात. ज्या तारुण्याला विवेकाचं आणि संयमाचं सूत्र नसतं ते तारुण्य कुठंही भरकटत जातं आणि अखेर नष्ट होतं. तारुण्य म्हणजे सुख आणि आनंद हे समीकरण तर्कशुद्ध नाही. पण कोणत्याही सुखाचा आणि आनंदाचा उत्कट रसिकतेनं उपभोग घेण्याची शक्ती तारुण्यातच असते. महाभारतातला ययाती पुन्हा पुन्हा तरुण होत होता, आणि संयमाला लाथाडून लंपटपणाच्या विळख्यात, वासनांच्या मगरमिठीत अडकत होता. अनेक वेळा तारुण्य मिळूनही तो दु:खीच झाला. पुराणातल्या कथांचा दाखला कदाचित तुला आवडणार नाही. पण बाईच्या आणि बाटलीच्या नादानं आपलं तारुण्य उधळून टाकणाऱ्या माणसांना 'तुम्ही सुखी झालात का ?' हा प्रश्न विचारा. मला वाटतं प्रामाणिकपणानं उत्तर द्यायचं झालं तर ते असंच म्हणतील की, ' स्वैर उधळलेल्या आमच्या तारुण्यानं साऱ्या आयुष्याचा प्याला विषारी करून टाकला. आमच्या जवळ तारुण्य होतं, पण रसिकतेनं सुख उपभोगण्याचा शहाणपणा नव्हता. आता पुन्हा तारुण्य मिळालं तर अशी चूक होणार नाही.' आयुष्याचा खेळ गमतीदार असतो. ' रम्य ते बालपण ' म्हणून कितीही स्तुतिस्तोत्रं गायिली तरी बालपण एकदाच मिळतं, यौवनाची कितीही पूजा बांधली तरी ते एकदाच वाट्याला येतं. वृद्धावस्थाही अशी एकदाच येते. जीवनही आणि मृत्यूही एकदाच भेटू शकतो. जीवनाच्या गाण्याला ' वन्स मोअर ' नाही. सृष्टीचा कायदा, सम्राट असो की सामान्य माणूस असो, साऱ्यांना एकच न्याय देतो; म्हणून तर हा जीवनाचा खेळ अत्यंत आकर्षक बनला आहे.

येथे मला एक चमत्कारिक प्रश्न विचारायचा आहे. 'तारुण्यातली दुःखं तुम्हाला आवडतील की म्हातारपणची सुखं तुम्हाला अधिक मानवतील ?' मला खात्री आहे की बहुसंख्य माणसं हात उंचावून म्हणतील, 'म्हातारपणातल्या शिळपट सुखापेक्षा आम्हाला तारुण्यातली दुःखं शतपटीनं अधिक स्वीकार्य वाटतील. तारुण्याच्या अद्भुत स्पर्शानं त्या दुःखांचंही रूप आम्ही बदलून टाकू.' हा विचार मात्र खरोखरच मजेदार आहे. वार्धक्य कदाचित सुखी समाधानी असेलही, पण ते निष्क्रिय आहे. त्याला आता नवनिर्मिती करता येईल का ? वाऱ्या-वादळाला तोंड देण्याची त्याच्यात आता हिंमत असणंच शक्य नाही. पण ताज्या रसरशीत तारुण्याचे नेत्र दूरवर पसरलेल्या क्षितिजांकडे लागलेले असतात. ज्या जमिनीवर ते उभे असते ती जमीन त्याला फार काळ संतुष्ट करू शकत नाही. अस्मानात भराऱ्या घेण्याची रग तरुण रक्तात असते. नवनवीन विचारांचा, मूल्यांचा, स्वप्नांचा मोह तरुणांना पडतो आणि त्यातून या नव्या जगाची निर्मिती होते. नवी साहसे, नवे पराक्रम जन्माला येतात. एके दिवशी जोतिबा फुले नावाचा एक तरुण आपल्या गुरूकडे गेला. त्याला दुःखाचा अन् आश्चर्याचा धक्काच बसला. गुरूची नऊ वर्षांची कन्या धाय मोकलून रडत होती. तिच्या मस्तकावरचे सारे केस वस्तऱ्याने काढून टाकले होते. हातातल्या बांगड्या फोडल्या होत्या. मुद्रेवर जणू जगातलं सारं दैन्य गोळा झालं होतं. विधवा झालेल्या नऊ वर्षांच्या निष्पाप पोरीला धर्माच्या नावाखाली परंपरा नावाच्या एका शक्तीने विद्रूप केले होते. जोतिबा फुल्यांच्या तरुण मनात ठिणगी पडली. ते पेटून उठले. ज्या रूढीने स्त्रीच्या गळ्याभोवती फास टाकला होता त्या रूढीवर फुल्यांनी आपल्या तरुण हातांनी घावामागून घाव घातले आणि तिचा चेंदामेंदा केला. स्वतंत्र अन् सुखी स्त्रीची प्रतिमा घडण्यात फुल्यांच्या ध्येयवादी तारुण्याचा फार मोठा वाटा आहे. असली भव्य स्वप्ने तरुणच पाहू शकतात. तरुणच त्यांना साकार करू शकतात.

माझी ही व्याख्यानबाजी ऐकून माझा मित्र म्हणाला, 'हा गंभीर विचार बाजूला ठेव बरं. नेहमी काय 'सामाजिक अन् सांस्कृतिक' वगैरे निरर्थक बोलत असतोस ! हे असलं प्रवचन बस्स झालं. तारुण्यात काय असलीच साहसं करायची असतात ? काही रंगेल पराक्रम केवळ तरुण वयातच घडतात आणि माणसाचं सारं आयुष्यच बदलून जातं.'

मी म्हटलं, ' खरं आहे. साहस, महत्त्वाकांक्षा, पराक्रम, स्वप्न, मोह आणि उत्कट भावना हे तारुण्याचेच विषय आहेत. धर्म आणि समाज असल्या गोष्टींची कदर न करता बाजीरावानं मस्तानीला बिनदिक्कत आपल्या जिवाची जिवलग बनवली आणि तिच्या पायांतील घुंगरांच्या संगीतात तो स्वतःला हरवून बसला. याचं श्रेय त्याच्या तारुण्यालाच आहे. तरुण वृत्तीनंच त्याला देशासाठी लढवय्याही बनवलं आणि त्याच्या उन्मादी जवानीनं मस्तानीच्या रूपसौंदर्याला ओवाळलं. जो तरुण पराक्रमी असतो त्यालाच मर्दाचा शृंगार साजरा करता येतो. ज्या तरुणाला साहसाची भीती वाटते, काही तरी दिव्य करून दाखवावं असं वाटतं नाही त्याला तरुण म्हणणं ही चेष्टाच ठरेल.'

आता माझ्या मित्राला थोडं बरं वाटलं. तो म्हणाला, ' शृंगार आणि प्रेम हे तारुण्याचे माझ्या मते तरी मुख्य गुणधर्म आहेत. ज्याला शृंगाराबद्दल आकर्षण वाटत नाही तो कसला तरुण ? मला तर कृष्णचरित्रातली शृंगाराची प्रकरणं मनापासून आवडतात. कृष्ण हा रसिकराज होता. रुक्मिणीचं प्रेमपत्र हातात पडायचा अवकाश की सगळं राजकारण बाजूला सारून, आपल्या रथातून तो तिच्या नगराकडं दौडत निघाला. तारुण्याचा हा धर्म सुंदर नाही का ? ' मी उत्तरलो, ' नाही कोण म्हणेल ? पण शृंगारप्रिय कृष्ण अन्याय आणि अधर्म यांच्यावर तुटून पडण्यासाठी अर्जुनाचा सारथी होतो हे रूपही मला तितकंच सुंदर वाटतं. सर्व रसांत तो रंगला, मनसोक्त डुंबला. आमच्या हिशेबी निर्वाणापर्यंत कृष्ण हा तरुणच राहिला. कारण त्याचे सारे भाव, साऱ्या प्रवृत्ती ताज्यातरुणच राहिल्या. अवतारसमाप्तीपर्यंत–जीवन कसं जगायचं आणि कसं भोगायचं आणि एक दिवस ते कसं त्यागायचं याचा जणू आदर्शच त्यानं जगापुढे ठेवला. मला तरी कृष्ण हे अभंग तारुण्याचं आणि रसिकतेचं कधी न कोमजणारं दर्शन आहे असंच वाटतं. याचा अर्थ तारुण्य हे केवळ वयावर अवलंबून नाही. '

या माझ्या विधानाला मात्र त्यानं विरोध केला. त्यानं मला टोचून विचारलं, ' म्हणजे आता कमालच झाली ! आपण ऐशी वर्षांच्या म्हाताऱ्याला देखील तरणाबांड समजणार काय ? ' मी म्हणालो, ' होय ! बरोबर आहे. सिंहगडावर लढणारा शेलारमामा हा ऐंशी वर्षांचा युवक होता. वयाच्या ऐन पंचविशीतच कपाळाला हात लावून बसलेला, जीवनातली आव्हानं न स्वीकारणारा तथाकथित तरुण माझ्या दृष्टीने पंचवीस वर्षांचा म्हाताराच आहे. असे म्हातारे आपल्या

देशात सध्या पुष्कळ आहेत. खरं सांगू, वय हा काही तारुण्याचा विश्वसनीय पुरावा होऊ शकत नाही. तो केवळ देखावा आहे. पंचाहत्तरी ओलांडली तरी रवींद्रनाथांचं मन बहरलेलं होतं. त्यांना उषःकालाचं लावण्य भुलवीत होतं. सूर्योदयाचं दृश्य पाहून ते मोहरून येत असत. झाडावरच्या पाखरांची किलबिल त्यांच्या अंतःकरणाच्या कोमल तारा छेडीत असे. वाऱ्याच्या झुळकी, निर्झरांचा खळखळाट, पानांची सळसळ त्यांचं तरुण मन सहज टिपून घेत होतं. त्यांच्या ओठांतून निसर्गाच्या अद्भुत लावण्याची गीतं ओघळत असतं. रवींद्रनाथ तरुणच राहिले. म्हातारे व्हायचं विसरूनच गेले. अरे, तारुण्य हा आयुष्यातील काळ नव्हे, ती एक मनाची अवस्था आहे. शरीराची नव्हे. कवी ब्राऊनिंगनं म्हटलं आहे. ' यूथ मीन्स लव्ह' 'यौवन म्हणजेच प्रेम'. पण हे प्रेम साऱ्या जीवनावरचं साऱ्या सृष्टीवरचं आणि मानव्यावरचं असावं. कवी अनिलांच्या त्या सुंदर ओळी मला आठवतात.

> अजून ऊन रक्त हे भरे नसा-नसांतुनी
> तसाच रोमहर्ष आणि अंग ये थरारूनी
> विरक्ति ? छे ! सदानुरक्ति ! भक्ति ! प्रेमभक्त मी
> तरंग उर्मि प्रीतीच्या अजून यौवनात मी !

जीवनाकडे पाठ फिरवितो तो कसला तरुण ? जो सदैव अनुरक्त आहे, जो स्वतःच्या आणि जगाच्या प्रेमात पूर्ण रंगला आहे, ज्याच्या रोमारोमांतून सुंदर आसक्तीचं गाणं ऐकायला येत आहे त्याचंच खरं तारुण्य !

# ४

## महापुरुष आणि पुतळे

कित्येक श्रेष्ठ व्यक्तींच्या चरित्राची पाहणी करताना असे जाणवते की, या व्यक्तींच्या वाट्याला जिवंतपणी केवळ उपेक्षा, हेटाळणी आणि विटंबनाच आली. त्यांच्या ठायी असलेल्या कर्तृत्वाची कोणाला फारशी ओळख पटली नाही. रसग्रहण जाऊ द्या, पण साधे सहानुभूतीचे शब्दसुद्धा अशा व्यक्तींच्या पदरात समाजाने टाकले नाहीत. लोकनिंदेचे घाव सहन करीत, आपल्या निष्ठांचा जिवापाड सांभाळ करीत या व्यक्ती जगल्या पण समकालीन समाजाला त्यांचा मोठेपणा कधी समजला नाही. समजून घेण्याची त्याने तयारीही दाखवली नाही. ही ध्येयवादी, श्रेष्ठ माणसे जेव्हा जगातून नाहीशी झाली तेव्हा काही वर्षांनी या मुर्दाड समाजाला शोध लागतो की, ‘ अरे ! आपल्यात एक युगंधर महात्मा होऊन गेला. इतके दिवस आपल्याला त्याची गंधवार्ताही नव्हती. चला उठा ! नगारे वाजवून या झोपलेल्या जगाला गर्जून सांगा की, एक महापुरुष आपल्यात कित्येक वर्षे वावरत होता, तो आपल्या उद्धारासाठी अखेरपर्यंत धडपडत होता. आपण त्याला विक्षिप्त समजलो. वेडा म्हणालो. चुकलंच ते ! पण निदान आता तरी ती घोडचूक दुरुस्त करू. ’ जिवंत असताना ज्याच्या फाटक्या झोळीत केवळ काटेकुटेच नियमाने पडत होते त्याच्या भव्य मूर्तीवर आता फुलांचा वर्षाव होऊ लागतो. कवी काव्ये लिहू लागतात. त्यांच्या लेखण्यांना एकदम पान्हा फुटतो. वक्त्यांच्या रसवंतीला बहर येतो. जयजयकाराचे

आणि पूजनाचे सारे सोहळे सुरू होतात. जिवंतपणी ' नगण्य ' असलेल्या त्या व्यक्तीला देवत्वाच्या मखरात यथाविधि बसविले जाते. असे का व्हावे ? माणसाच्या मोठेपणाचा साक्षात्कार त्याच्या मरणानंतरच समाजाला व्हावा हा काय चमत्कार आहे ! महान होण्यासाठी मरणाचे मोल देण्याची आवश्यकता आहे काय ?

माझा हा प्रश्न ऐकून एकजण म्हणाला,

' जो मनुष्य आपल्याजवळ असतो त्याचे गुण आपल्याला नीट दिसत नाहीत. दोष मात्र नको तितक्या ढळढळीतपणे पाहण्याची शक्ती आपल्यात असते. नसलेले दोषसुद्धा आपल्या छिद्रान्वेषक सूक्ष्म दृष्टीला दिसतात. मानवधर्माचा अखंड प्रचार करणारा येशू ख्रिस्त समकालीन समाजाला धर्मद्रोही वाटला. ' ही कारणमीमांसा मला तरी सयुक्तिक वाटते. जवळचे लोक आपल्याला योग्य त्या संदर्भात समजून घेत नाहीत. अज्ञान, गैरसमज, मत्सर, ईर्षा, पूर्वग्रह आणि अहंकार अशी अनेक कारणे असू शकतात. आपला शेजारी बहुधा निंदक असतो अशीच आपणही समजूत करून घेतलेली असते. त्यामुळे कोणीच कोणाला नीटसपणे ओळखत नाही. दुसऱ्याचा मोठेपणा जाणवायला आणि तो मान्य करायलासुद्धा मन उदार, गुणग्राहक असावे लागते. पण बहुसंख्य माणसं इतकी क्षुद्र व मत्सरी असतात की, दुसऱ्याची निंदा करण्यात त्यांना एक प्रकारचे विकृत समाधान वाटते. कोणाला तरी श्रेष्ठ म्हटले म्हणजे आपण कनिष्ठ ठरू, अशी त्यांना भीती वाटत असते. एकदा एका अभिनेत्याला मी म्हणालो,

' अहो ती कर्णाची भूमिका करणारा तो कोण नट हो ? काय सुरेख भूमिका वठवली त्यानं. मूर्तिमंत कर्ण त्यानं आपल्या डोळ्यांसमोर उभा केला. इतक्या कलात्मकतेने, समरसतेनं आणि संयमानं आपली भूमिका पार पाडणारा असा नट क्वचितच दिसतो. ' त्या अभिनेत्याला माझं मत पटलं नाही. कर्णाची भूमिका करणाऱ्या नटाची मी स्तुती करावी हे त्याला आवडलं नाही. कपाळावर आठ्या चढवून तो म्हणाला,

' कसली कलात्मकता आणि समरसता घेऊन बसलात ? पाठ केलेली वाक्यं धडाधडा बोलून दाखवणारा तो एक पोपटपंची करणारा सामान्य नट आहे. नाटक कशाशी खातात हे कळायला त्याला आणखी सात जन्म घ्यावे लागतील. उगीच तुमच्यासारखे लोक त्याचं चारचौघांत कौतुक करतात त्यामुळं तो हल्ली चेकाळला आहे. कर्णाची भूमिका या लंबकर्णाला जमणंच शक्य नाही. ' एवढे बोलून

आपण कसल्यातरी घाईत आहोत, असे भासवून ते ज्येष्ठ अभिनेते निघून गेले. त्यांना हा विषय वाढवायचा नव्हता. ते निघून गेल्यावर माझ्या लक्षात आले की, एका नटाची स्तुती दुसऱ्या नटासमोर करणे हा व्यवहारदृष्ट्या वेडेपणा आहे. असले तारतम्य मला कधी ठेवताच आले नाही. एकदा मी चुकून एका सुंदर स्त्रीच्या सौंदर्याचे शाब्दिक रसग्रहण माझ्या बायकोच्या उपस्थितीत बेसावधपणे केले होते. ती स्त्री खरोखरच लावण्यवती होती. कलावतीही होती. त्यामुळेच सत्य बोलण्याचा घोर अपराध माझ्या हातून घडला. पण या अपराधाचे प्रायश्चित पुढे कित्येक दिवस मला मिळत राहिले. माझ्यासारखी चूक ज्यांच्या हातून घडली असेल त्यांनाच माझ्या दु:खाची कल्पना येईल. यातील विनोदाचा भाग सोडून देऊ. पण आपल्यापेक्षा कुणीतरी सरस आहे, अधिक गुणवान आहे हे मान्य करण्याचा खिलाडूपणा फारच थोड्या व्यक्तींत असतो. न्यायमूर्ती मा. गो. रानडे आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे राजकीय मतभेद होते व त्यांचे वादविवाद होत असत हे सर्वांना माहीत आहे. पण टिळकांच्या लोकोत्तर धैर्याबद्दल रानडे यांना अत्यंत आदर होता. टिळक फारच जहाल लिहितात, अशी कोणीतरी तक्रार केल्यावर रानडे त्याला म्हणाले,

' बळवंतरावांच्या मनगटात जोर आहे म्हणून ते असे लिहितात. आमच्यात असा मर्द पुरुष दुसरा कोण आहे ? सरकारशी आम्ही कारणापेक्षा जास्त संबंध ठेवतो. हा खरोखर आमचाच कमकुवतपणा आहे. तो मनुष्य मर्द आहे त्यास हे स्वाभाविकच आवडत नाही. ' टिळकांच्या निर्भीडपणाबद्दल व मर्दुमकीबद्दल त्यांच्या विरोधकानं दाखवलेली ही गुणज्ञता मनाला प्रसन्न करणारी आहे यात शंका नाही. पण रानडे हे सहिष्णू, संयमी व गुणांचे चाहते होते. असले लोक समाजात दुर्मिळ असतात. व्यक्तिगत मत्सर आणि ईर्षा यांच्यावर मात करणारी अभिजात सुसंस्कृत मनोवृत्ती माणसांच्या स्वार्थी बाजारात क्वचितच कुठेतरी सापडते.

समकालीनांकडून गुणवंतांची उपेक्षा किंवा टवाळी होते याचे कारण वस्तुनिष्ठ मूल्यमापनासाठी ज्या ' दूरत्वाची ' जरुरी असते तेच त्यांना साधत नाही. त्यामुळेच जवळची व्यक्ती किंवा वस्तू दूर गेल्यानंतर तिची महती लक्षात येऊ लागते. तुकोबा नावाचा पलीकडच्या गल्लीत राहणारा एक सामान्य वाणी अभंगरचना करून वेदान्तावर भाष्य करतो या घटनेवर विश्वास ठेवायला देहूचे लोक एकेकाळी तयार नव्हते. तुकारामांसारख्या श्रेष्ठ वंदनीय संतकवीची ओळख

बहुधा तो वैकुंठाला गेल्यानंतरच देहूकरांना झाली. पण जिवंतपणी मात्र तुकोबांच्या अभंगांची गाथा इंद्रायणीत बुडवून टाकण्यापर्यंत समकालीन पंडितांची आणि धर्ममार्तंडांची मजल गेली होती. अशाच कर्मठांनी निवृत्ती आणि ज्ञानदेवादी भावंडांना प्रायश्चित्त घेण्यास भाग पाडले. आज या संतांच्या समाधीवर भक्तिभावाने फुले उधळणाऱ्या भाविकांच्या पूर्वजांनी त्या जित्या जागत्या संतांची अक्षम्य हेटाळणी केली नव्हती काय ? कदाचित ज्ञानेश्वर, तुकाराम त्यांना फार जवळचे होते, अतिपरिचयाचे होते आणि म्हणूनच त्यांचे मूल्यमापन त्या काळातल्या समाजाला करता आले नाही. काही चित्रे ज्याप्रमाणे जवळून नीट दिसत नाहीत, त्यांचे सौंदर्य पाहाण्यासाठी काहीशा दूर अंतरावर उभे राहावे लागते त्याप्रमाणे कोणत्याही क्षेत्रातल्या थोर व्यक्तीचे व्यक्तित्व यथोचितपणे जाणून घेण्यासाठी काळाच्या विशिष्ट टप्प्यावर उभे राहणे आवश्यक असते. सावलीचे सुख समजण्यासाठी थोडा वेळ उन्हात उभे राहावे लागते तसे. एका संस्कृत सुभाषिताची येथे आठवण होते. चंदनाच्या लाकडाची तुम्हा-आम्हाला अपूर्वाई वाटली तरी मलयगिरीवर राहाणाऱ्या लोकांना त्याचे काय ? दररोजच्या जळणासाठी तेथील स्त्रिया चंदनाचा उपयोग करीत असतात. ताजमहालाची महती आग्रा शहरातील लोकांना किती दिवस वाटेल ? दूरदूरचे रसिक ही ' बिल्डिंग ' पाहण्यासाठी वेड्यासारखे गर्दी करतात याचे कदाचित ताजमहालच्या देखरेखीसाठी ठेवलेल्या सेवकांना हसूही येत असेल. अतिपरिचय झाल्यामुळे व्यक्तीची काय किंवा कलाकृतीची काय अवज्ञा होत असावी. नेहमी एकत्र राहणाऱ्या पतिपत्नीतसुद्धा ' अतिनिकटत्वामुळे ' गैरसमजाचे धुके निर्माण होते. जवळपणामुळेच त्यांच्यातली ' जवळीक ' ओसरायला लागते. अशा वेळी काही दिवस तरी त्यांनी परस्परांपासून दूर राहण्याचा प्रयोग करून पाहावा. ' माहेरी निघून जाईन ' अशी दररोज चार वेळा धमक्या देणाऱ्या गृहिणीची पतिदेव कदर करीत नाहीत. पण एखाद्या दिवशी खरोखरच तिने प्रयाण केले की, त्यांच्या विरहावस्थेला सुरुवात होते. 'गृहिणीवाचून घर म्हणजे मूर्तिमंत अरण्य' असल्या सुभाषितावर त्यांचा विश्वास बसायला लागतो. ही सगळी मीमांसा शांतपणे ऐकल्यावर माझा मित्र म्हणाला, ' साऱ्याच थोर पुरुषांना न समजण्याची आणि त्यांची क्रूर उपेक्षा करण्याची भयानक चूक समकालीन समाज करतो. त्यामुळे मनुष्यजातीचंच नुकसान होतं. ते कसं टाळता येईल ? यावर काहीच उपाय

नाही काय ?' हा प्रश्न अवघड आहे. पण मी म्हणालो,

'कित्येक तत्त्ववेत्ते, संत, धर्मसंस्थापक, क्रांतिकारक आणि प्रतिभावंत समकालीनच काय पण उत्तरकालीन समाजाच्याही पचनी पडणं कठीण आहे. त्यांच्या प्रतिभेची झेप विलक्षण असते. त्यांनी चितारलेली स्वप्ने भव्य असतात. एका उत्तुंग आदर्शाकडे समाजाला घेऊन जाण्याचा त्यांचा अट्टाहास असतो. पण सामान्य कुवतीच्या समाजाला हा प्रचंड वेग सहन होत नाही. समजतही नाही. अंथरूण पाहून पाय पसरणारे हिशेबी वृत्तीचे स्वप्नहीन लोक आपल्या ठरलेल्या चाकोरीतूनच संथपणानं चालत राहणं पसंत करतात. मग त्यांना नवनवीन स्वप्नं पाहणारे प्रतिभावंत वेडे, व्यवहारशून्य वाटायला लागतात. आपल्या संथ जीवनाला आव्हान देणाऱ्या या वेड्यांना ते उचलून समाजाबाहेर फेकून देतात. जुनाट झालेल्या परंपरेवर प्रहार करणाऱ्या साऱ्याच समाजसुधारकांचा समाजानं छळ केला याचं कारण हेच आहे.'

माझं हे विश्लेषण कदाचित त्याला पटलं असावं. पण या 'पांडित्यपूर्ण' विवेचनावर आक्षेप घेऊन तो मला म्हणाला,

'तुम्हा प्राध्यापक मंडळींना मोठमोठ्या जाडजूड शब्दांतून बोलण्याचं एक व्यसनच लागलेलं असतं. अरे हाच मुद्दा अगदी सोप्या शब्दांमधून एकदोन उदाहरणं घेऊन तुला सांगता आला नसता का?' मी म्हटलं, 'भल्या गृहस्था, ही आमची जित्याची खोड आहे. ती अशी जाणार नाही. पण आता अधिक सरळ शब्दांत सांगण्याचा प्रयत्न करतो. 'एकेकाळच्या समाजात क्रांतिकारकांचा छळ झाला. जोतिबा फुले, गोपाळराव आगरकर, बाबासाहेब आंबेडकर यांना छळणारा समाज आज त्यांची पूजा करताना दिसतो. पण पूजा करणाऱ्यालाही ते क्रांतिकारक समजले असं म्हणता येईल काय? फुले यांच्या पुतळ्याला हार घालणारे आणि आंबेडकरांवर मैदानी भाषणं ठोकणारे लोक अजूनही अस्पृश्यता पाळताना दिसतातच की! आगरकर, महर्षी कर्वे यांची स्तुतिस्तोत्रं गाणारे घरात स्त्रीचा छळ करीतच असतात. महात्मा गांधींच्या नावानं टाहो फोडणाऱ्या आजच्या कित्येक गांधीभक्तांचे हात भ्रष्टाचारानं बरबटून निघालेले आहेत. भगवान महावीरांचा जप करणाऱ्या कित्येक 'अहिंसक' भक्तांच्या तिजोरीत दोन नंबरचा काळा पैसा कुजत पडलेला असतो. पूजनात आणि जयघोषात रममाण झालेली ही ढोंगी माणसं खऱ्या अर्थानं कधीच अनुयायी किंवा भक्त होऊ शकत नाहीत.

आपल्या ढोंगाला संरक्षण देणारा एखाद्या क्रांतिकारकाचा पुतळा त्यांना हवा असतो. त्यांना केवळ घोषणा करून धूळफेक करायची असते. यासाठी महापुरुषांच्या नावाचा ते व्यापार करीत राहतात. दुर्दैव असं की, महापुरुष येतात, ते आपल्या साऱ्या सामर्थ्यानिशी आयुष्याची मशाल पेटवून समाजाला प्रकाश देण्याचा प्रयत्न करतात. धूर्त लोक याच प्रकाशाचं भांडवल करून आपल्या स्वार्थाचा बाजार भरवीत राहतात. हे असंच चालायचं! पण याचा अर्थ या थोर व्यक्तींनी समाज मुळीच बदलला नाही, असं समजणं चुकीचं ठरेल. समाज कसा बदलत नाही ते मी पाहीन अशीच प्रतिज्ञा जणू या महान व्यक्तींची असते. अत्यंत मंद गतीने का होईना समाज बदलत चालला आहे, असं मला वाटतं. तो बदलण्यासाठी आत्मार्पण करणाऱ्या महापुरुषांच्या पुतळ्यांची पूजा-अर्चा करीत बसण्यात मात्र अर्थ नाही. आम्हाला नुसते पूजक नकोत. या पूजकांनीच महापुरुषांना केवळ शोभेचे पुतळे बनवून ठेवलं आहे.'

## ५

# स्त्री : पिंजऱ्यातली मैना !

स्त्री-स्वातंत्र्याची चळवळ करणाऱ्या एका बंडखोर तरुणीच्या तावडीत मी अपघातानं सापडलो. स्त्रीकडं पाहण्याचा पुरुषी दृष्टिकोण कसा विकृत असतो या विषयावर ती उसळून बोलत होती. तिचा आवाज वाढत होता. समस्त पुरुष-जातीच्या अन्यायी प्रवृत्तीचा मी प्रतिनिधी आहे असे समजून ही विदुषी माझ्याशी वाद करू लागली. खरं तर मला तिच्याशी कसलाही वाद करायचा नव्हता. स्त्रियांशी वाद करणं मला कधी जमलंच नाही. स्त्री हा वादाचा विषय नव्हे तर संवादाचा एक चांगला विषय आहे, असं मी कधी कधी गमतीनं म्हणतो. दुसरं असं की, कोणत्याही स्त्रीशी वाद झालाच तर त्यात पुरुषांचा हटकून पराभव होतो. परिणामकारण वक्तृत्व हा स्त्रियांचा जन्मजात गुण असतो. त्याच्या जोडीला 'स्त्रीहट्ट' नावाचा एक थोर सद्‌गुणही निसर्गानं त्यांना बहाल केलेला आहे. अशा परिस्थितीत मुखदुर्बल पुरुषांनी वादाचा प्रसंग आलाच तर ताबडतोब 'दे हाता या शरणागता' असं म्हणून वादाचा निर्विवाद शेवट करावा असा माझा अनुभवी सल्ला आहे. पण काही पुरुष बेअक्कल असतात. ते बिनदिक्कत वाद-विवाद करायला पुढे सरसावतात आणि अखेर स्त्रीच्या वक्तृत्वशक्तीपुढे नामोहरम होतात. कदाचित मिल्टनने यासाठीच म्हटलं असेल, 'वन् टंग इज इनफ फॉर ए वुमन' (एका स्त्रीला एकच जीभ (भाषा) पुरे झाली.) पण जाऊ द्या. हे विषयांतर झालं. ती बंडखोर अबला–चुकलो प्रबला–पुरुषजातीचा अधिक्षेप

करीत आक्रमक शैलीने म्हणाली,

'तुम्हा पुरुषांचा दृष्टिकोण स्त्रियांच्या बाबतीत नेहमीच बिघडलेला असतो. स्त्रीच्या शरीर-सौंदर्यापलीकडं तुम्ही काही पाहूच शकत नाही. स्त्री आणि तिचं सौंदर्य हा काय बाजारी विषय आहे? बहुतेक दिवाळी अंकांवर बायकांची भडक चित्रं छापली जातात. साबण, तेल, पावडर फार काय सिगरेटची जाहिरात– कुठल्याही वस्तूचं विज्ञापन स्त्रीचा चेहरा दाखविल्याशिवाय तुम्हाला करता येऊ नये हा काय सुसंस्कृतपणा झाला? तुम्हा पुरुषांनी कथा-कादंबऱ्यांतून आणि नाटकांतून स्त्रीची सारी प्रतिमाच विकृत करून ठेवली आहे, असा माझा आरोप आहे. यावर तुमचं काय म्हणणं आहे? मला सरळ आणि स्पष्ट उत्तर पाहिजे. तुमच्या नेहमीच्या तिरकस पद्धतीचं विनोदी उत्तर नको आहे.'

मी नेहमीच तिरकस बोलतो असा तिरकस गैरसमज या भगिनीनं का करून घ्यावा हे मला समजलं नाही. कधी कधी विनोदाच्या मोहानं असं मी बोलतही असेन. पण गंभीर स्वरूपाची चर्चा करताना विनोदाचा उपयोग नसतो हे मला माहीत आहे. आता जो आक्षेप त्या भगिनीने पुरुषांवर घेतला होता त्यात बरेच तथ्य होते. ते मला नाकारायचे नाहीच मुळी! स्त्रीच्या शरीराचं प्रदर्शन व्यापारी हेतूनं मांडलं जावं आणि स्त्री हा केवळ भडक जाहिरातीचा विषय व्हावा हे सामाजिक अभिरुचीच्या दृष्टीनं फारसं चांगलं नाही हा तिचा मुद्दा अगदी योग्य वाटला. पानाच्या दुकानात, हेअर कटिंग सलून्समध्ये, हॉटेलात, ऑफिसात सर्व ठिकाणी स्त्रीदेहाच्या प्रदर्शनाची चित्रं कधी सौम्य पण बहुधा भडक स्वरूपात टांगलेली असतात. त्यात तशी कलात्मकता ही फारशी नसते. परवा तर तंबाखूच्या जाहिरातीत, दाढीच्या साबणावरही स्त्रीची छबी मला आढळली. स्त्री हा कसा सार्वभौम, सार्वत्रिक विषय आहे, याची मला जाणीव झाली. या जाहिरातीत एक तर औचित्य नव्हते. पण अनौचित्याचा दोष पत्करून सुद्धा ती जाहिरात निदान कलेच्या दृष्टीने सुंदर असायला हरकत नव्हती. बाईच्या अंगोपांगांचे ढोबळ दर्शन एवढाच रोगट हेतू त्यात दिसत होता. या संदर्भात लोकाभिरुचीचा अध:पात कोणत्या थरापर्यंत जातो याची अनेक उदाहरणे देता येतील. त्या भगिनीचा मुद्दा बरोबर असला तरी केवळ तिला डिवचण्यासाठी म्हणून मी म्हणालो,

'बाईसाहेब, स्त्रीचं सौंदर्य हा एक चिरंतन आकर्षणाचा विषय वाटतो पुरुषांना. सौंदर्यपूजक वृत्तीनं त्यांनी स्त्रीची प्रतिमा शक्य त्या त्या ठिकाणी

बसवली तर त्यात बिघडलं कुठं? उगीच वैराग्याचं ढोंग करण्यात काय अर्थ आहे? आम्ही पुरुषांनी काही अंगाला राख फासली नाही. आम्हाला संन्यास घ्यायचा नाही. संन्याशालासुद्धा स्त्रीच्या लावण्यानं कसं जाळ्यात अडकवलं याची उदाहरणे पुष्कळ सापडतील. स्त्रीचं सौंदर्य हा खरं तर आनंदाचा अन् अभिमानाचा विषय नाही काय? आपण सुंदर दिसावं अशी धडपड स्त्रिया करतात की नाही? मग त्यांच्या देखणेपणाचं कौतुक म्हणून त्यांची चित्रं ठिकठिकाणी लावली तर त्याबद्दल तुम्ही तक्रार का करता? स्त्रीचा हा सन्मानच नव्हे का?'

माझ्या या प्रश्नाने ती विदुषी आता अधिकच रागावली. समोरच्या टेबलावर तिनं आपली मूठ आवेशानं आदळून म्हटलं, 'कशाला हे दांभिक समर्थन करता? पुरुषांची ही वृत्ती सौंदर्याची पूजा करणारी नसून ती सौंदर्यावर तुटून पडणाऱ्या हिंस्र पशूचीच आहे हे तुम्हाला चांगलं माहीत आहे. स्त्री ही आपली खाजगी मालमत्ता आहे, तिची सुंदरता हा आपल्या उपभोगाचाच विषय आहे असंच मानलं जातं. सौंदर्यापुढं मान लववणारी रसिकता वेगळी आणि सौंदर्यावर झडप घालू पाहणारी लंपटता वेगळी. तुम्हाला स्त्री ही केवळ रमणी रूपातच का पाहावीशी वाटते? ती जशी कामसहचरी आहे, तशीच किंबहुना त्यापेक्षा किती तरी पटीनं अधिक तिच्यात वत्सल आई आहे, प्रेमळ बहीण आहे आणि तुमच्या वात्सल्याला भरतं आणणारी तुमची कन्याही आहे. पण स्त्रीचं चित्र केवळ एकाच भडक रंगात बुचकळून का रेखाटलं जातं? सिनेमा-नाटकांच्या पोस्टर्सबद्दल तर विचारायलाच नको! अर्धनग्न किंवा पूर्ण नग्न पोस्टर्स लावली की नाटक, सिनेमाचा धंदा किफायतशीर चालतो हाच हिशोब केला जातो. यात स्त्री-सौंदर्याचा कसला गौरव आहे? माझं तर असं मत आहे की, स्त्रीच्या अंगो-पांगांचं बाजारी उत्तान प्रदर्शन धंदेवाईक हेतूनं करणाऱ्या या लोकांच्या पाठीवर भर चौकात फटके मारले पाहिजेत.'

त्या भगिनीचं हे आवेशयुक्त भाषण मला मनापासून आवडलं. ती खरोखरच सात्त्विक संतापानं फणफणत होती. तिच्या बोलण्यातलं कडवट सत्य माझ्या मित्राला चांगलंच झोंबलं. भारतीय परंपरेचा अभिमान त्याच्या रोमरोमातून लहरत असल्या-मुळे कोणत्याही वादविषयात 'भारताची प्राचीन आणि पवित्र परंपरा', 'भारताची तत्त्वधारा', 'भारतीय संस्कृतीचा अमृतबिंदू' वगैरे विशेषणयुक्त भाषेतून आपले विचार मांडण्याची त्याला सवय जडलेली होती. 'भारतीय पुरुषांवर' एका

स्वातंत्र्यवादी स्त्रीनं असा निष्ठुर हल्ला चढवावा हे त्याला आवडलं नाही. खरं तर मला त्या स्त्रीचे विचार ऐकून घ्यायचे होते. म्हणूनच मी मुद्दाम विरोध करून तिला बोलायला भाग पाडीत होतो. पण आमच्या ' महा-भारतीय ' मित्राला एवढं शहाणपण नव्हतं. तो उसळून म्हणाला,

' स्त्रीकडं पाहण्याची आपल्या देशातली परंपरा खरं म्हटलं तर अत्यंत आदर्श आहे. स्त्रीला आम्ही देवता मानतो. ती एक पवित्र शक्ती आहे आणि तिच्याच सामर्थ्यानं जगाला पावित्र्य व सौंदर्य प्राप्त होते असंच भारताची प्राचीन संस्कृती सांगते. जिथे स्त्रियांची पूजा केली जाते तिथेच देवतांचा निवास असतो. प्राचीन काळापासून स्त्रीला मूर्तीमंत देवता मानणारी आमची ही भूमी आहे हे आम्ही जगाला दाखवून दिलं आहे.'

माझ्या मित्राची ही पोपटपंची ऐकून ती विदुषी जास्तच भडकली. काहीतरी जळजळीत उत्तर देऊन ही ' भारतीय देवता ' माझ्या भारतीय मित्राला तोंडघशी पाडणार अशी चिन्हं मला दिसू लागली. प्रसंग बाका होता. मी चटकन न्यायाधीशाची भूमिका घेऊन उभय पक्षांना शांत केलं. पण माझ्या मित्राचा युक्तिवाद निश्चितच केविलवाणा होता. मी त्याला म्हणालो,

' सद्गृहस्था ! मलाही प्राचीन भारतीय संस्कृतीची ओळख आहे आणि आवश्यक तितका अभिमानही आहे. या संस्कृतीत जे सुंदर आणि उदात्त आहे ते मला आवडतं. पण जे जे प्राचीन आणि भारतीय ते सारंच आदर्श आहे असं कसं म्हणतोस ? स्त्रीला आपलं पावित्र्य सिद्ध करण्यासाठी आगीत उडी घ्यावी लागणं ही परंपरा स्त्रीचा अवमान करणारी नाही का ? आपलं पावित्र्य सिद्ध करण्याची जबाबदारी पुरुषांवर का नव्हती ? पुरुष म्हणजे पावित्र्याचा अमरपट्टा घेऊन आलेला पुण्यवान पुतळा होता काय ? जुगार खेळताना आपली बायको-देखील पणाला लावण्याचा अधिकार पुरुषाला कोणत्या परंपरेनं दिला ? असले उल्लेख अपवादात्मक आहेत म्हणून सोडून देता येत नाहीत. कारण या उदा-हरणांवरून पूर्वीच्या काळी स्त्री म्हणजे केवळ मालमत्ता होती हेच सिद्ध होत नाही का ? तिला देवता म्हणण्याचा पराक्रम कदाचित एखाद्या कवीनं फार तर आपल्या काव्यात केला असेल. आजही काव्य-नाटकांतून स्त्रीची पूजा करणारे काही लेखणीबहाद्दर घरात आपल्या बायकोशी कसे वागतात हे पाहण्यासारखं आहे. कालची स्त्रीसुद्धा दासीच होती. कदाचित दासी हा शब्द तुम्हाला आव-

डणार नाही. म्हणून आपण तिला सेविका म्हणू. आपल्या पुरुषाची सेवा हाच तिचा परम, एकमेव धर्म आहे असं सांगणारे काही 'सुसंस्कृत' लोक आजही भेटतात. देवता म्हणून तिला दासी करणारे लोकसुद्धा आजच्या 'बाजारी' दृष्टीच्या पुरुषांपेक्षा फारसे चांगले ठरत नाहीत.'

ती स्वातंत्र्यवादी 'देवता' आता प्रसन्नपणानं हसली. तिचा राग मावळला. तिच्या अंत:करणातल्या मृदु भावनांचा झरा आता जणू खळखळून वाहू लागला. आनंदानं तिनं पुन्हा टेबलावर मूठ आपटली. माझ्या मित्राकडं पाहून तिनं म्हटलं,

'ऐका ! ऐका ! मला तरी यापेक्षा काय वेगळं सांगायचं आहे ! माझं म्हणणं इतकंच आहे की, स्त्रीला समाजाचा एक स्वतंत्र घटक मानलं पाहिजे. तिला काही तिचं स्वत:चं व्यक्तित्व आहे की नाही ? का पुरुषाच्या करमणुकीचं एक साधन इतकाच तिच्या आयुष्याला अर्थ आहे ? तिचं स्थान जर असं दुय्यम, तिय्यम राहणार असेल तर संस्कृतीबद्दल बोलण्याचा तुम्हाला काहीच अधिकार उरणार नाही.'

सध्या आपण पुष्कळच सुधारलो, सुसंस्कृत झालो असं कानावर येतं. वस्त्र-प्रावरणं बदलली. घरंदारं आधुनिक सुसज्ज झाली. आमच्या घरात नव्या युगाची सर्वच उपकरणं आली. पण स्त्रीकडं पाहण्याचा मध्ययुगीन दृष्टिकोण अजून तरी बदलला नाही. स्त्री ही पळवून नेण्याची, अत्याचार करण्याची वस्तू किंवा घराच्या सोनेरी पिंजऱ्यात ठेवण्याची सुंदर मैना हे दोनच दृष्टिकोन आजही समाजात रुजून बसलेले दिसतात. पूर्वीच्या समाजातही स्त्रीकडे रसिकतेने, सुसंस्कृत अभिरुचीने पाहणारी मने मुळीच नव्हती असे अतिशयोक्तिपूर्ण विधान मला करायचे नाही. कालिदासासारख्या प्रतिभाप्रभूने अजराजाच्या तोंडी इंदुमतीबद्दल जे उद्‌गार घातले आहेत ते मला तरी मननीय वाटतात. 'गृहिणी, सचिव: सखीमित्र: प्रियशिष्या, ललिते कलाविधौ' मला वाटतं स्त्री ही पुरुषाची नुसतीच गृहिणी किंवा पत्नी नाही. ती त्याची प्रेयसी आहे. त्याच्या जीवनात सामर्थ्य आणि सौंदर्य यांचं संगीत ओतणारी ती एक आगळीच शक्ती आहे. ती त्याची नुसती शिष्या नसून गुरूही आहे. प्रसंगविशेषी त्याला फटका मारून जबरदस्तीनं मार्गदर्शनही ती करू शकते. पुरुषाच्या व्यक्तित्वात आपलं सारं व्यक्तित्व विलीन करून टाकणारी समर्पणशील स्त्री खऱ्या अर्थानं स्वतंत्र होईल काय हा प्रश्नच

आहे. आपण अखेर सर्व दृष्टींनी पुरुषांवर अवलंबून आहोत म्हणूनच त्याची मर्जी राखण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे असं स्त्रीला शतकानुशतकं वाटत आलं आहे. तिला तसंच वाटायला हवं अशी परिस्थिती पुरुषानं तिच्याभोवती निर्माण केली आणि ही व्यवस्था म्हणजे आपली आचार्यप्रणीत संस्कृती आहे, असा एक देखावाही तयार केला. याचा परिणाम असा झाला की सौंदर्य हेच स्त्रीचं मुख्य किंवा एकमेव भांडवल मानलं गेलं.

मी हे विचार व्यक्त केल्यावर माझा मित्र म्हणाला, 'आपल्याला ही तुझी तात्त्विक मीमांसा जरी खोडून टाकता आली नाही तरी स्त्री म्हटल्यावर तिनं सुंदर असावं, सुंदर दिसावं अशी अपेक्षा करण्यात काही चूक आहे काय? सुंदर स्त्री पाहिल्यावर तुला आनंद होत नाही का?' मी म्हटलं, 'फारच अवघड प्रश्न विचारलास. स्त्रीच्या सौंदर्याचा मोह ज्याला कधीच पडत नाही त्याच्या मुकाट्यानं पाया पडावं आणि म्हणावं, 'हा मुक्त तरी आहे किंवा पशू तरी आहे.' अरे, स्त्रीच्या रूपाचे वर्णन करताना कवींनाही शब्द सुचत नाहीत. एका लेखकानं म्हटलं आहे, 'जेव्हा सुंदर स्त्री आपली इच्छा व्यक्त करते तेव्हा प्रत्यक्ष ईश्वराला देखील तिला नकार देणे शक्य नसते.' पण स्त्री काय किंवा पुरुष काय, बाह्य रूपापेक्षा त्यांच्या गुणांनाच महत्त्व असते. स्त्रीचं खरं सौंदर्य तिच्या प्रेमळपणात, वात्सल्यात, त्यागात आणि सहनशीलतेत आहे. निसर्गानं तिला पुरुषापेक्षा अधिक संवेदनाक्षम बनवलं आहे, पण म्हणून तिनं पुरुषाच्या कडक निर्बंधातच राहिलं पाहिजे असं कुणी प्रतिपादन करू लागला तर ते चुकीचंच आहे. तिचं आयुष्य केवळ पतीच्या किंवा कुटुंबाच्या कल्याणासाठी स्वतःचा होम करीत राहण्यामुळंच कृतार्थ होतं असला विचार आज तरी चालणार नाही. तिला कुटुंबापलीकडे स्वतःच काही जीवन असतं की नाही? कौटुंबिक घाण्याला जन्मभर जुंपून घ्यायचं आणि त्याच त्याच वर्तुळात फिरत राहण्यात धन्यता मानायची हे स्त्रीचं जीवनध्येय आहे काय?"

माझ्या अपेक्षेप्रमाणं माझ्या विचारांचा विपर्यास करण्याची संधी माझ्या मित्रानं सोडली नाही. आपल्याला बहुधा असेच मित्र भेटत असतात. त्यानं विचारलं 'कुटुंबाची बंधनं झुगारून देऊन स्वातंत्र्याच्या नावाखाली स्त्रीनं मोकाट सुटावं असं तुला सुचवायचं आहे का?' आता असल्या अडाणी प्रश्नाला काय उत्तर द्यायचं? अडाणीपणाचं सामर्थ्य एवढं असतं की ते कधी कधी शहाणपणालाही

मोडून काढता येत नाही. अशा प्रकारच्या विक्षिप्त प्रश्नाला तसंच तऱ्हेवाईक उत्तर द्यावं लागतं. मी म्हणालो, ' मोकाट सुटण्याचं स्वातंत्र्य केवळ पुरुषांनाच असलं पाहिजे असं तुला म्हणायचं आहे? सुसंस्कृतपणाची बंधनं सर्वांनीच मानली पाहिजेत. पण स्त्रीला मात्र जखडून टाकायचं आणि पुरुषानं पुरुषी अहंकारानं चौखुर उधळायचं हा जर स्वातंत्र्याचा तुझा अर्थ असेल तर हे स्वातंत्र्य स्त्रीलासुद्धा असतं हे लक्षात ठेव. अखेर इतकंच सांगतो की, स्त्री ही देवत नाही की पिंजऱ्यातली पाळीव मैनाही नाही. ती आहे एक माणूस. तिला माणूस मानण्याइतकी सामाजिक प्रगती व्हावी, यापेक्षा अधिक काय सांगू? '

# ६

# खरंच जग सुंदर आहे

परवा वादविवादाच्या अभिनिवेशात माझा मित्र म्हणाला, ' जगाच्या सौंदर्याचे पोवाडे भाबडेपणाने गात बसणारे तुम्ही महामूर्ख लोक आहात. तुम्हाला जग मोठं सुंदर वाटतं. माणूस म्हणजे निरागसतेचा आणि निष्पाप वृत्तीचा पुतळा वाटतो. तुम्ही या जगाकडं कल्पनेच्या काव्यमय डोळ्यांनी पाहता म्हणूनच तुम्हाला वाटतं की, देवा तू निर्माण केलेलं जग बरं चाललं आहे. कठोर वास्तवाच्या प्रकाशात या, जगाचं एकदा तटस्थपणानं दर्शन घ्या म्हणजे तुमच्या कल्पनेचा मोहोर झडून जाईल. साऱ्या काव्याच्या सृष्टीला जाळून टाकणारं एक दाहक, विदारक सत्य तुमच्या दृष्टीला पडेल. दुरून साजऱ्या दिसणाऱ्या डोंगराप्रमाणे हे जगदेखील दुरून मोठं लोभस, गोजिरवाणं दिसतं. सगळीकडं हिरवळ पसरली आहे, असं वाटतं. पण या हिरवळीतून चालताना जेव्हा पावलोपावली काटे बोचतील आणि गवताखाली दडलेल्या काही सापांचे फूत्कार ऐकायला मिळतील तेव्हाच तुमचा वेडा कल्पनाविलास संपेल. जग सुंदर तर नाहीच, पण ते कुरूप, दुष्ट आणि भयानक आहे, असं माझं स्पष्ट मत बनलं आहे.'

माझ्या मित्राच्या प्रतिपादनाला प्रामाणिक आवेश होता. केवळ वादासाठी एक बाजू घ्यायची म्हणून तो बोलत होता, असं मात्र मला वाटलं नाही. पण तो फार कडवटपणानं बोलला. त्याच्या युक्तिवादात काही प्रमाणात सत्य असेल तर ते मला नाकारायचं नाही. उगीच सत्याकडे पाठ फिरवून बसण्यात काही शहाण-

पणा नसतो. सुंदरता ही जगाची एक बाजू असेल. कुरूपता सौंदर्यालाच अनेक वेळा वेटोळे घालून बसते. ज्याला वस्तूंचं यथार्थ दर्शन घ्यायचं आहे त्यानं सौंदर्य आणि सुगंध यांच्याबरोबरच विद्रूपता आणि दुर्गंध यांचीही दखल घेतलीच पाहिजे. ती टाळण्याचा प्रयत्न कशाला करायचा? जीवनाचं कोडकौतुक करताना मरणाचीही जाणीव मनात ठेवणं हे सुजाणपणाचं लक्षण नाही काय? माझ्या मित्रानं काढलेला निष्कर्ष थोडासा बरोबर होता आणि बराचसा चुकीचाही होता, असं माझं मत असल्यामुळं मी त्याला काहीसं खोचून विचारलं,

' महाशय! सॉक्रेटिसाच्या बापाचा आव आणून बोलताना आपण एक महान तत्त्वज्ञान सांगत आहोत, अशी आपली समजूत झालेली दिसते. आम्ही काव्य आणि कल्पना यांच्या चष्म्यातून जगाकडे पाहतो, असं आपलं म्हणणं आहे. ठीक आहे. पण तुम्हाला जगाचा असा काय सखोल अनुभव आला आहे? कधी तुम्हाला या जगाचं उग्र रूप दिसलं, कधी त्याच्या वणव्यात तुम्ही होरपळलात ते तरी सांगाल? सुंदराला सुंदर म्हणायलासुद्धा मनाची उदारता लागते. रसिकता लागते. सौंदर्याचं रसग्रहण करायला हळुवार, प्रेमळ मन असावं लागतं. उगीच वास्तवता, तटस्थता, विदारकता असले शब्द माझ्या अंगावर फेकून तू आपल्या अरसिकपणाचं मात्र प्रदर्शन केलंस. एखाद्या सुंदर प्रमदेकडं पाहून रोमांचित होण्यातला आनंद घेण्याऐवजी तू तिचं सुंदर, पुष्ट शरीर म्हणजे मांस, चर्म आणि अस्थी यांचा समन्वय आहे, असा भलताच वास्तववादी निष्कर्ष काढशील; अशी मला भीती वाटते.

मी काहीशा उपहासानं बोललो असलो तरी वास्तवतेचा अवास्तव अतिरेक करणारी काही माणसं असतातच. आपल्या लहान मुलाला एखादं रंगीबेरंगी खेळणं आवडलं तर ते त्याला घेऊन देतानासुद्धा त्यांचा ठराविक शेरा असतोच.

' करायचं काय असलं नाजूक खेळणं घेऊन? पाच मिनिटांत मोडून जाणार. ते खेळणं लवकरच मोडून जातं हे काही खोटं नाही. पण ते अखेर खेळणं आहे. त्यानं काही वेळ बालकाला आनंद दिला की, त्याचं कार्य संपलं. बालकाचा आनंद महत्त्वाचा की खेळण्याचा नाजूकपणा? कशाला महत्त्व द्यायचं हे आपल्या दृष्टिकोणावर अवलंबून असतं. काही महान पालक तर उत्तमोत्तम, छानदार खेळणी काचेच्या कपाटात बंदोबस्तानं ठेवून टाकतात. घरातल्या मुलांनी त्या बंद कपाटाकडे पाहून, आपली खेळण्याची तहान भागवावी, अशी त्या

पालकांची तात्त्विक भूमिका असते. या योजनेमुळं खेळणी युगानुयुगे सुरक्षित राहतील यात वाद नाही. पण खेळणी हातात घेऊन त्यांच्याशी स्वैरपणाने खेळण्याचा आनंद मुलांना कसा मिळणार? वास्तवदृष्टीची मी उपेक्षा करीत नाही. पण साऱ्या जीवनाचं मोजमाप वास्तवतेच्या मापानं करू लागलो किंवा नको तितक्या कोरड्या मनानं जीवन न्याहाळू लागलो तर माझा मित्र म्हणाला त्याप्रमाणं जीवन ही एक भयानक, कुरूप, अशी बिसंगती आहे असाच निष्कर्ष काढावा लागेल. एका कुशल चित्रकाराने आपल्या डॉक्टर मित्राला एक चित्र दाखवले. झऱ्याच्या झुळझुळत्या प्रवाहात आपले गोरेपान गोंडस पाय सोडून एक तरुणी खेळकरपणे बसली होती असे ते चित्र होते. तिच्या अंगावर अपुरी वस्त्रे होती. त्यामुळं तिच्या अंगप्रत्यंगांची सुडौल ठेवण लक्षात यावी असं चित्रण करण्यात आलं होतं. तिच्या पाठीवर रुळणारा मुक्त केशसंभार, मुखावरचं प्रसन्न उत्साही हास्य, आजूबाजूची वनश्री यांचं कलापूर्ण मोहक चित्र होतं ते. डॉक्टर महाशयांनी थोडा वेळ बारकाईनं ते चित्र पाहिलं. चित्रकार रसग्रहणाची अपेक्षा करीत होता. डॉक्टरसाहेब गंभीर चेहऱ्यानं म्हणाले, ' अशा थंडगार वातावरणात ही बाई आणखी काही वेळ बसून राहिली तर तिला निश्चितच सर्दी आणि ताप यांचा त्रास होईल. तिनं घरी जाऊन अंगात गरम कपडे घालावेत म्हणजे तिची प्रकृती बिघडणार नाही.' डॉक्टरांच्या या अभिजात रसिक अभिप्रायानं या चित्रकाराची मात्र प्रकृती बिघडली. वास्तववादी दृष्टीनं चिकित्सा करणारे डॉक्टर चुकीचं मत सांगत नव्हते. पण चित्रातल्या सौंदर्याचा मोह त्यांना पडावा आणि त्या कलाकृतीकडं त्यांनी रसास्वादी दृष्टीनं पाहावं, अशी चित्रकाराची अपेक्षा होती. जगात कुरूपता आणि भीषणता नाही, असं कोण म्हणेल? पण याच काळ्या रंगानं जगाचं चित्र आपण आपल्या मनात रेखाटायचं का असा माझा सवाल आहे.

माझ्या या सवालानं माझा मित्र चिडला. काहीशा संतप्त स्वरात तो बोलू लागला,

' जगातल्या अन्यायांकडं, अत्याचाराकडं पाठ फिरवून जग म्हणजे सुखसौंदर्यानं नटलेलं एक नंदनवन आहे, असं म्हणणारे लोक निर्बुद्ध तरी असावेत किंवा निष्ठुर तरी, कसल्या स्वप्नात मश्गूल झाला आहात? कुठल्याशा राजाची गोष्ट सांगतात ना? लोकांना खायला भाकरी मिळत नाही, असं त्याला सांगितल्यावर हा राजा म्हणाला, ' मग त्यांना शिरापुरी खायला सांगा. यात एवढं तक्रार करण्या-

सारखं काय आहे ? तुम्ही सौंदर्यवादी लोक त्या राजापेक्षा दुसरं काय करीत आहात ? '

हा मात्र माझ्यावर एक चुकीचा आरोप करण्यात येत होता. जगाच्या आणि जीवनाच्या सौंदर्यावर प्रेम करणाऱ्या रसिकांना जगातल्या अन्यायांनी दु:ख होत नाही, असं थोडंच आहे ? फार पूर्वीपासून माणसं कुठल्यातरी क्षुद्र कारणासाठी रक्तपात करतात. आजही जगाच्या पाठीवर अनेक ठिकाणी निरपराध माणसाचं रक्त पाण्यासारखं वाहात आहे याची आम्हाला चीड येते. पण आमच्या चिडण्याला तसा काय अर्थ आहे ? जोपर्यंत निष्पाप रक्ताने बरबटलेले दुष्टाचे हात मुळापासून उखडून टाकण्याची ताकद आमच्यात येत नाही तोपर्यंत रडत बसण्यापलीकडं आपण काय करू शकणार ? माझ्या मित्राच्या म्हणण्यात अर्धसत्य निश्चित आहे. जगाच्या सौंदर्याला अनेक ठिकाणी भयानक तडे पडले आहेत हे आम्ही नाकारत नाही. पण प्रत्येक कालखंडात काहीतरी भीषण समस्या आपले विक्राळ काटेरी हात पसरून जगासमोर उभ्याच असतात. रात्रंदिवस त्यांचाच विचार करू लागलो तर जगतासुद्धा येणार नाही. मी त्याला म्हणालो, 'जगात अनेक प्रकारची असह्य दु:खं आहेत, मनुष्य मनुष्याचं शोषण करीत आहे हे आम्ही पाहतो आणि अनुभवतो. प्रश्न असा आहे की, ही दु:खं आणि अन्याय आपल्या कुवतीप्रमाणं आपण कमी करण्याचा प्रयत्न करतो काय ? तुमच्यासारखे हळवे लोक केवळ जगाच्या विकृतीवर बोट ठेवतात. सुस्कारे सोडतात. आणि फार तर अश्रू गाळतात. पेटलेल्या अन्यायाचे वणवे डोळ्यांतल्या अश्रूंनी विझू शकत नाहीत. त्यासाठी अन्यायी, प्रवृत्तींशी झुंज द्यावी लागते. सौंदर्यवादी म्हणून तुम्ही आम्हाला हिणवता. पण सौंदर्यवाद्यालाच जगातली वैगुण्यं जास्त खुपतात हे विसरू नका.'

जग हे अनंत प्रवृत्तींनी भरलेलं आहे. म्हणून त्याच्यासंबंधी एकच एक निदान करणं चुकीचं आहे. 'ऑल वर्ल्ड इज ए स्टेज' हे शेक्सपिअरचं मत या दृष्टीनं विचारात घेतलं पाहिजे. जगाच्या रंगभूमीवर सर्व प्रकारचे रंग आणि ढंग आहेत. सगळ्या गंधांचं, साऱ्या रसांचं, सर्व प्रकारच्या स्पर्शांचं एक बिलक्षण चमत्कारिक रसायन म्हणजे हे जग आणि जीवन आहे. इथं सुगंध देणारा चंदन वृक्षहीं आहे, आणि विषारी फुत्कार टाकणारे भुजंगही त्याच चंदनाला विळखा घालून बसले आहेत. भडकलेल्या ज्वालांतही हसणारं चांदणं इथं भेटू शकतं.

इथं जवळचा मित्र माणुसकी सोडून पाठीत खंजीर खुपसतो आणि दारातलं इमानी कुत्रं आपल्यावर प्रेम करीत राहातं, काय गमतीदार आहे हे जगाचं दर्शन !

माझा मित्र आता अंतर्मुख होऊन विचार करू लागला होता. त्याचा आवेश मावळला होता. जगाचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न मोठमोठ्या दार्शनिकांनी, तत्ववेत्त्यांनी कमी केलेला नाही. पण तरीही हे जग म्हणजे एक चमत्कारिक गूढ, असं आव्हान होऊन राहिलेलं आहे. जग म्हणजे केवळ एक बुडबुडा आहे या मतापासून जग म्हणजे चिरंतन सौंदर्यानं फुलवलेली फुलबाग आहे या निष्कर्षापर्यंत अनेक प्रकारचे विचार आतापर्यंत लोकांनी सांगितले आहेत. जगातले काटे गृहीत धरूनसुद्धा फुलांबद्दल आपण विचार करू नये काय ? हा माझा तुम्हाला प्रश्न आहे. जगाला एक क्षणभुंगर स्वप्न म्हणणाऱ्या तत्त्वज्ञांना मी विचारणार आहे, 'भल्या गृहस्थांनो, स्वप्नही आम्हांला चालेल. स्वप्नातलं प्रेम आणि सौंदर्य आम्हाला आनंद देऊ शकतं. कशासाठी आम्ही स्वप्नाकडं पाठ फिरवायची ? आम्ही आमची स्वप्नं आमच्या छातीशी उत्कटतेनं कवटाळून धरू.' ब्रह्म तेवढं सत्य, जग केवळ मिथ्या आहे, असं आपल्या शिष्याला गंभीरपणे शिकविणाऱ्या एका महापंडिताच्या अंगावर हत्ती चालून गेल्याची गोष्ट मी ऐकली आहे. पंडित महाराजांचे धाबेच दणाणले. ते कसेबसे घाईगर्दीने एका झाडावर चढून बसले. थोड्या वेळाने खाली उतरले तेव्हा चतुर शिष्याने पहिला प्रश्न विचारला, 'गुरुजी, जग मिथ्या आहे असं तुम्ही मला अनेक वेळा सांगितलं. जग जर खोटं, आभासात्मक असेल तर हत्तीसुद्धा खोटाच नव्हता काय ? मग असल्या मिथ्या हत्तीला भिऊन तुम्ही पळून का गेलात ?' शिष्याचा सवाल खोचक आणि बिनतोड होता. पण गुरूही बारा गावचं पाणी प्यायलेले होते. असल्या किरकोळ प्रश्नाला त्यांनी सहज झटकून टाकलं. ते म्हणाले, 'जग मिथ्या आहे हा माझा सिद्धांत बरोबरच आहे. हत्ती जसा खोटा होता तसं माझं पळून जाणं आणि झाडावर चढून बसणंही खोटंच होतं. तुला ते नीट कळलं नाही त्याला काय करायचं ?'

भर्तृहरीचा एक संस्कृत श्लोक मला याप्रसंगी आठवतो. त्या श्लोकाचा आशय मराठीतून सांगतो. सध्या 'सुसंस्कृत' कोणी नसल्यामुळं 'प्राकृत' बोलणंच बरं. भर्तृहरीनं जगाबद्दल आपलं मत प्रकट केलं आहे. जगाचा

त्याला परस्परविरोधी रहस्यमय अनुभव आला होता. जिच्यावर तो प्रेम करीत होता ती मात्र दुसऱ्यावर अनुरक्त होती. पण तो दुसरा तिसऱ्याच कोणा स्त्रीच्या प्रेमपाशात गुरफटला होता आणि ती तिसरी मात्र भर्तृहरीवर नितांत प्रेम करीत होती. प्रेमाचं हे असलं विचित्र त्रांगडं पाहिल्यावर तो विषण्णतेनं हसला, विरक्त झाला आणि म्हणाला, ' कोठे वीणावादन ऐकू येत आहे तर कोठे हाहा:कार कानांवर पडत आहे. कोठे विद्वानांचा वाद आणि संवाद ऐकायला मिळतो तर कुठे दारूबाजांची बेताल बडबड कानावर आदळते. एखाद्या ठिकाणी सुंदर युवतीचं दर्शन होतं तर तिथंच म्हातारपणानं जर्जर झालेली विकलांग वृद्धाही दिसते. कसं आहे या जगाचं स्वरूप ? हे जग अमृतमय आहे की विषमय आहे काहीच कळत नाही. ' जग कळत नाही एवढं मात्र भर्तृहरीला कळलं होतं. गौतम बुद्धानंही एकदा प्रवचनाच्या वेळी झाडाच्या खाली आलेल्या फांदीची काही पानं मुठीत घेऊन म्हटलं होतं, ' जितकी पानं माझ्या हाती आली त्यापेक्षा कितीतरी पटीनं अधिक पानं या झाडावर आहेत. त्याप्रमाणं जगासंबंधी विश्वासंबंधीची असंख्य पानं आपल्या हातात कधीच ठेवता येत नाहीत.' साऱ्या जीविताचं आणि जगाचं सर्वांगीण, सर्वस्पर्शी दर्शन कुणालाच घेता येत नाही. पण जेवढं कळतं आणि जेवढं दिसतं, जेवढं आपण जगतो आणि अनुभवतो तेवढ्यावरून आपली काही मते आपण बनवू शकतो. जशी दृष्टी तशी सृष्टी. कोणा विरक्ताला तरुण स्त्री म्हणजे अध्यात्म मार्गातील धोंड वाटते, तर कोणा प्रेमिकाला आपलं जीवन रसरंगानं बहरून टाकणारी एक मोहक, सुंदर संजीवनी वाटते. दोन्ही मतं खरीही असतील आणि खोटीही असतील. काय खरं नि काय खोटं याबद्दल अंतिम निर्णय देणारं सुप्रीम कोर्ट या जगात तरी अजून अस्तित्वात आलेलं नाही.

आपल्या अंत:करण प्रवृत्तीला कौल लावल्यावर जो निर्णय मिळतो तो खरा मानावा म्हणून मी मित्राला म्हणालो,

' अरे, तू काहीही म्हण. हे जग सुंदर आहे. आपण जिच्यावर मनोभावाने प्रेम करतो तिच्यात काही दोष असतातच. पण तरीही ती प्रेयसी असते. म्हणून ती सुंदरच असते. ती आपल्या हृदयाला नेहमीच सुंदर वाटते. तसंच ज्या जगात मी जगतो ना, त्याच्यातल्या वैगुण्यांची मला जाणीव आहे. ते काही अंशी कुरूप आणि दुष्टही आहे. पण याच जगात दररोज सूर्य उगवतो. आकाशात सूर्योदय

सूर्यास्ताच्या वेळी रंगपंचमी साजरी होते. याच जगातल्या बालकाच्या फुगीर गालांवर हास्याची फुलं फुलतात आणि आपण वात्सल्यानं हळुवार ओठांनी ती फुलं टिपून घेतो. मंदिरातल्या देवमूर्तीसमोर भक्तीचा नंदादीप तेवतो. एकतारीवर भक्तीचे गीत छेडलं जातं. याच जगात रुग्णाची जखम बांधणारे सहानुभूतीचे हात आहेत. कुणाचं तरुण मन कुणाला तरी भेटण्यासाठी उत्सुक आहे. हात हातात घेताना कुठंतरी कंकणांचा नाजूक किणकिणाट होत आहे. रात्रीच्या शांत वातावरणात कुठून तरी भजनाचे सूर ऐकायला येत आहेत. आणखी कितीतरी मनोज्ञ सौंदर्यांनी जग नटलं आहे. तू काहीही म्हण... तत्त्वज्ञ काहीही म्हणू देत. खरंच जग सुंदर आहे!'

७

# पतिव्रतेच्या गळ्यात धोंडा

'पतिव्रतेच्या गळ्यात धोंडा, वेश्येला मणिहार.' एका कवीच्या भावगीतातल्या या शब्दांतून जीवनातलं एक विसंगत आणि विदारक सत्य प्रगट झालं आहे. हे दुर्दैवी दाहक सत्य कालातीत आहे. जगाची तऱ्हाच मोठी चमत्कारिक म्हटली पाहिजे. पतिव्रतेला दारिद्र्यात जन्मभर खितपत पडावं लागतं, पण वेश्या मात्र रत्नहार घालून मिरवत राहाते. याच्या मागे काही नियम आहे का? कुणी केले हे अतर्क्य नियम?

पतीचे प्राण परत मागण्यासाठी साबित्रीने यमाचा पाठलाग केल्याची कथा पुराणात आहेच. असल्या एकनिष्ठ पतिव्रता आजच्या जगात 'फॅडिस्ट', व्यवहारशून्य आणि हास्यास्पद ठरतील अशी भीती वाटते. 'जन्मोजन्मी हाच पती मिळू दे' अशी मनोभावाने प्रार्थना करीत झाडाभोवती प्रदक्षिणा घालणारी स्त्री हे आज तरी अज्ञानाचेच उदाहरण मानले जाईल. एकाच जन्मी अनेकांवर आपल्या प्रेमाची फुले 'रसिकतेने' उधळणारी स्त्री 'मॉडर्न' आहे, 'प्रोग्रेसिव्ह' आहे असे म्हणणारे काही विचारवंत मी पाहिले आहेत. पतिनिष्ठ स्त्री आपल्या पातिव्रत्यामुळेच जेव्हा संकटात सापडते आणि वेश्येला जेव्हा आपल्या 'व्यापारी' वृत्तीमुळेच मणिहार मिळतो तेव्हा एखाद्या कवीला असले गीत सुचणे शक्य आहे. कुणीतरी सहज विचारील, 'पतिव्रता होऊन गळ्यात धोंडाच पडणार असेल तर पातिव्रत्याचे ढोल कशासाठी वाजवायचे? त्यापेक्षा रत्नहार मिळणार

असेल तर वेश्या होणे काय चुकीचे आहे? हा प्रश्न मात्र केवळ व्यवहारवादी माणसालाच सुचणे संभवनीय आहे. एक जुनी म्हण मला आठवते, 'सतीच्या घरी नाही बत्ती आणि शिंदळीच्या दारी झुलतो हत्ती'. जन्मभर अंधारात रखडणारे सतीत्व आणि शिंदळकीला प्रसन्न होणारी गजान्त–लक्ष्मी यांतले आपण काय स्वीकाराल असा प्रश्न केला तर बहुसंख्य माणसे आदर्शाकडे पाठ फिरवून वास्तवाला जवळ करतील यात शंका नाही. पातिव्रत्य आणि वेश्यावृत्ती हे शब्द म्हणजे दोन प्रतीके आहेत. सत् आणि असत् यांची ती रूपे आहेत. चांगल्या मार्गाने जाणाऱ्याच्या पदरात काटे पडतात. वाकड्या चालीने चालणाऱ्याच्या परडीत मात्र नियती फुले टाकते. या कर्माला काय म्हणावे?

परवा एका स्वातंत्र्य सैनिकाकडे गेलो होतो. आज तो पंचाहत्तरीच्या घरात आहे. ऐन तारुण्यात त्याने स्वातंत्र्याच्या पेटलेल्या संग्रामात बेफामपणे उडी घेतली होती. हातात तिरंगी झेंडा घेऊन स्वातंत्र्याचा गगनभेदी जयघोष करताना त्याच्या मस्तकावर पोलिसांच्या लाठ्या बसत होत्या. पण राष्ट्रभक्तीची, स्वातंत्र्य-भावनेची एक नशाच त्याला चढली होती. तुरुंगातल्या अंधार–कोठडीत तो ढकलला गेला. पोलिसी अत्याचारामुळे त्याच्या एका पायाला जबरदस्त इजा झाली. मोडलेले हाड पुन्हा दुरुस्त झालेच नाही. पण तो पुन्हा पुन्हा सत्याग्रह करीत होता आणि तुरुंगाची वारी त्याला घडत होती. स्वतंत्र भारताची वैभव-शाली चित्रे तो मनात रंगवीत राहिला. आपल्या बरोबरच्या कैद्यांना तो म्हणायचा, 'थोडे थांबा. थोडा धीर धरा. वनवासाचे दिवस संपत आले आहेत. गांधीजींचे रामराज्य लवकरच येणार आहे' पण आश्चर्याची गोष्ट अशी की, रामाच्या राज्यातच पतिव्रता सीतेला पुन्हा वनवासात जावे लागले. रामाच्या आज्ञेनेच सीतेला निर्वासित करण्यात आले. अंधार–कोठडीतल्या भिंतीवर स्वातंत्र्याचे स्वप्न ज्यांनी चितारले होते ते देशभक्त स्वातंत्र्य आल्यानंतर दूर कोठेतरी फेकले गेले. देवदर्शनासाठी तळमळणारे भक्त मंदिराबाहेरच राहिले. बाजारबुणगे मात्र बेधडक आत घुसले.

तो स्वातंत्र्य सैनिक सात्त्विक संतापाने मला म्हणाला, "पतिव्रतेच्या गळ्यात धोंडा पडतो तो असा. आम्ही झगडत असताना जे इंग्रजांना मदत करीत होते ते मात्र आज देशभक्त म्हणून मिरवीत आहेत. गांधी, नेहरूंच्या बरोबरीने आम्ही–ही आमचा संसार उधळून वणवण भटकत होतो, तेव्हा आजचे 'टोयाटो'

गाडीतून फिरणारे ' टिनोपाल पुढारी ' कुठे होते? महात्मा गांधींचे संपूर्ण नावसुद्धा त्यांना सांगता येणार नाही. ही त्यांची अक्कल. यांचे बंगले जसे एअरकंडिशन्ड तशीच यांची मनेही एअरकंडिशन्ड झाली आहेत. सत्तेच्या सिंहासनावर बसण्यासाठी आम्ही साम्राज्यवाद्यांशी लढलो नाही. आम्हाला हवे होते केवळ या देशाचे स्वातंत्र्य. सामान्य माणूस उपाशीपोटी राहू नये, तो सुखासमाधानाने जगावा हीच आमची कल्पना होती. तेवढ्यासाठीच रक्त सांडताना आम्हाला अभिमान वाटला. आज तुम्ही ज्याला स्वातंत्र्य म्हणता तसले भ्रष्ट लज्जास्पद वातावरण स्वप्नातसुद्धा आम्हाला नको होते. आमच्या हातांनी आम्ही आमच्या संसारावर कशासाठी निखारे ठेवले? स्वदेश आणि स्वातंत्र्य यांचा जप करणारी पण परदेशाला आपल्या देशाची गुपिते विकणारी बड्या बड्या अधिकाऱ्यांची टोळकी या जमिनीत निपजावीत याची शरम वाटते. ही मंडळी म्हणे दारूच्या बाटलीसाठी आपला देश गहाण टाकतात आणि असेही वाचले की, गेली अनेक वर्षे यांचा हा उद्योग ' रामराज्यात ' बिनदिक्कत चालू आहे. देशासाठी जिंदगी गहाण टाकणारे जिंदगीभर तडफडत राहिले आणि एका रात्रीसाठी, दारूच्या बाटलीसाठी देशाच्या नरडीला नख लावणारा बडा माणूस मात्र कुणाच्या तरी मिठीत आपली रंगेल रात्र साजरी करीत राहतो. तुम्ही स्वतःला लेखणीबहादद्दर समजता. आषुक–माषुकांच्या चावट गोष्टींचे रतीब घालून पैसे मिळविता. पण असल्या भ्रष्ट निर्लज्ज प्रवृत्तीवर तुमची लेखणी आग का ओकीत नाही? गुळगुळीत कविता लिहिता, शिळ्या आणि बुळ्या कल्पना घेऊन रवंथ करीत बसलेल्या तुमच्यासारख्या नेभळ्या लेखकांना आमच्या काळ-जात काय जळतं आहे हे कसं समजणार? "

संतापाने थरथरणाऱ्या आणि स्वातंत्र्याच्या चळवळीत एक पाय आणि आपली सारी जवानी गमावून बसलेल्या त्या आदर्श स्वातंत्र्य सैनिकाला मी एक प्रश्न विचारला, " पण आपल्या देशात लोकशाही आहे, स्वातंत्र्य आहे, हळूहळू पण निश्चितपणे आपली प्रगती होत आहे. उद्योगधंदे, कारखाने वाढले, शाळा-कॉलेजे वाढली, विद्यापीठे निघाली; घरोघरी फ्रीज आले; टी. व्ही. आले; या प्रचंड प्रगतीबद्दल तुम्हाला काय म्हणायचे आहे? "

माझ्या प्रश्नाने तो म्हातारा आता चांगलाच खवळला. ज्या त्याच्या डोळ्यांनी एकेकाळी समृद्ध आणि स्वतंत्र भारताचे स्वप्नचित्र पाहिले होते त्या डोळ्यांत आता

जणू ठिणग्या पेटल्या होत्या. उसळून तो म्हणाला, ' तुमच्या तांत्रिक आणि यांत्रिक प्रगतीला घेऊन काय करायचे आहे ? या स्वतंत्र भारतातला माणूस देशावर प्रेम करतो का ? एखादा फुटकळ आमदार किंवा जिल्हा परिषदेचा सदस्य आपल्या खुर्चीच्या बळावर दहापाच लाख रुपये वर्ष दोन वर्षांत गिळून टाकतो. बाकीच्या लोकांबद्दल बोला कशाला ? पैसे खाण्याच्या बाबतीत बायकादेखील मागे राहिल्या नाहीत; काल परवाची यमी किंवा ठमी अधिकारावर आली की, बाईसाहेब होते आणि दोन-चार वर्षांत पिढ्यांची तरतूद करून ठेवते, या गोष्टीला देशाची प्रगती म्हणायचे का ? लाच खाणाऱ्या लोकांनी कोणताही देश मोठा होत नाही, होत नसतो; लहानमोठ्या खुर्चीवर बसणारी माणसे आपल्या खुर्चीखाली पैसा कसा जमा होईल या चिंतेतच आहेत: सत्तेचा, अधिकाराचा आणि पैशाचा माज चढलेल्या या लोकांना राष्ट्रीय स्वातंत्र्य, संस्कृती हे शब्द तरी उच्चारण्याचा अधिकार आहे काय ? लाचलुचपतीने आमचा देश गल्लीपासून दिल्लीपर्यंत पोखरला गेला आहे. गेली चाळीस वर्षे मी उघड्या डोळ्यांनी पाहतो आहे. आमच्या राजकीय आणि सामाजिक जीवनात भ्रष्टाचाराचे गलिच्छ पाट भरभरून वाहत आहेत. जातीच्या नावावर, पैशाच्या शक्तीवर आणि गुंडगिरीवर निवडणूक जिंकली म्हणजे लोकशाही विजयी झाली अशी आरोळी ठोकणारे तुमच्यासारखे मूर्ख थोडे नाहीत. गांधी–नेहरूंचा आदर्श आज कुठे सापडतो आहे का ? शिवाजीचे नाव घेऊन बुद्धिभेद करणारे मी पुष्कळ पाहिले आहेत. व्यापारी असो, कारखानदार असो, इंजिनिअर असो, पोलिस अधिकारी असो, वकील असो की प्रोफेसर असो, सगळ्यांनी फक्त मुखवटे घेतले आहेत देशभक्तांचे. सामान्य माणसांसाठी आम्ही काम करीत आहोत असे चौपदरी गळा काढून सारेच रडत असतात, पण या लोकांच्या पंजात सापडलेल्या आमच्या राष्ट्राचे काय होणार ते मला समजत नाही. दररोज वर्तमानपत्र उघडले की, आमच्या देशाच्या भवितव्याची मला काळजी वाटू लागते. लाचलुचपतीने आणि चारित्र्यहीनतेने बरबटलेल्या हातांनी हा देश घडविला जाणार नाही. यंत्रे वाढून देश मोठा होत नाही. मने वाढली पाहिजेत. जगण्यासाठी आणि जगविण्यासाठी नुसत्या भाकरीचा उपयोग होत नाही. काहीतरी बळकट तत्त्वज्ञान नसेल तर कितीही विद्यापीठे निघाली तरी त्याचा काही उपयोग नाही. मी फार दुःखी आहे. आम्हा जुन्या पिढीतल्या वेड्या माणसांची दुःखे तुम्हा पुस्तकी शहाण्यांना कशी कळणार ? ''

मी आता दुखावलो गेलो होतो. त्या निष्ठावान स्वातंत्र्य सैनिकाबद्दल माझ्या मनात फार फार आदर आहे. पण निराश झाल्यामुळे तो साऱ्यांना एकजात भ्रष्ट समजत होता. म्हणून मी काहीसा रागावून म्हणालो, " बाबा, तुम्ही म्हणता तशी काही अंशी परिस्थिती असली तरी आमच्या नव्या पिढीतही निदान पाच दहा टक्के चांगली माणसे निश्चित आहेत. जिकडे तिकडे बाजारबसव्यांचीच जत्रा भरली आहे, असे समजू नका. गळ्यात धोंडा पडला तरी आपले पातिव्रत्य न सोडणाऱ्या सीतासावित्री आजही काही ठिकाणी आहेत. त्या मणिहाराकडे ढुंकूनही पाहात नाहीत. गळ्यातल्या धोंड्याला त्या अलंकार मानतात. तुम्ही या देशासाठी आपल्या आयुष्याची राखरांगोळी केली. पण या राखेचे पवित्र भस्म आम्ही आमच्या कपाळाला लावून तुमच्या पावलांवर पावले टाकायला तयार आहेत. तुमचा त्याग हा काही जणांनी कुचेष्टेचा विषय केला असेल. काही लोक आज आयत्या बिळात नागोबा होऊन बसले असतील. त्यांची आज चलती असेल. त्यांच्या घरापुढे आज हत्ती झुलत असतील. पण खरे सांगू ? एक दिवस या हत्तीच्याच पायी ते चिरडून जातील. तुमच्या गळ्यातला धोंडा मात्र देशाच्या स्वातंत्र्याचा आणि स्वाभिमानाचा शिलालेख आहे. उद्याचा इतिहास त्यालाच वंदन करील. सीता वनवासात राहिली तरी ती सीताच असते. आणि एखादी वेश्या राजवाड्यातल्या मंचकावर लोळली तरी ती तीच राहते. आमचा देश अगदीच वाया गेला, असे समजू नका. भांगेतही तुळस उपजते. अंधारातूनच उद्याचा प्रकाश उमलणार आहे. तुमच्यासारख्या पतिव्रतेच्या गळ्यातला धोंडा उद्याच्या प्रगतीचा आधारस्तंभ होणार आहे ! "

त्या म्हाताऱ्या स्वातंत्र्य सैनिकाच्या डोळ्यांत नकळत अश्रू जमा झाले. आपल्या सुरकुतलेल्या हातांनी माझ्या पाठीवर थोपटीत तो म्हणाला, " अंधार लवकर संपायला हवा. पतिव्रतांच्या गळ्यातले धोंडे दूर करा, वेश्यांना प्रतिष्ठा देण्याची परंपरा आता बदला. मला माझा देश मोठा व्हायला हवा आहे. मी लहान असलो आणि लहानच राहिलो तरी चालेल. पण हा गांधीजींचा, जवाहरलालजींचा देश मात्र मोठा झाला पाहिजे. प्रामाणिक कष्ट करणाऱ्या माणसाला भाकरी मिळत राहावी आणि त्याची प्रतिष्ठा वाढावी याहून मला अधिक काहीच अपेक्षा नाही."

८

# पुस्तके बुडवून टाकली तर....

एका जिल्ह्याच्या गावी व्याख्यानाच्या निमित्ताने मी नुकताच गेलो होतो. माझ्या निवासाची व्यवस्था एका बड्या सेवानिवृत्त इंजिनिअरने आपल्या आलीशान बंगल्यात केली होती. बंगल्याचं आवार प्रशस्त होतं. वास्तू शोभिवंत होती. सुसज्ज दिवाणखाना, वातानुकूलित खोल्या आणि एकंदर सारी व्यवस्था अगदी अप टु डेट होती. बंगला कसा पॉश होता. उंची फर्निचर, कलर टी. व्ही., मऊ मऊ गाद्या असलेल्या गुबगुबीत खुर्च्या आणि कोच, गुळगुळीत भिंतींना दिलेला फिकट निळसर, आकर्षक रंग. आणि त्या भिंतीवर सौम्य प्रकाश–स्रोत टाकणारे वेगवेगळ्या आकारांचे वीजगोलक. मी तर दिपूनच गेलो. पोर्चमध्ये टोयाटो गाडी डौलात उभी होती. या धनाढ्य, हौशी अधिकाऱ्याच्या दिवाण-खान्यातील प्रत्येक वस्तू परदेशी बनावटीची दिसत होती. भिंतीवर लावलेलं सुंदर चौकोनी घड्याळ जर्मनीत तयार झालं होतं. टी. व्ही. आणि रेकॉर्ड प्लेअर जपानमधून आयात केले होते. खोल्यातलं फर्निचरसुद्धा भारतीय छापांचं नव्हतं. फक्त ते इंजिनिअर साहेब भारतीय असावेत असं त्यांच्या रंगावरून जाणवत होतं. त्यांनी आपल्या सौभाग्यवतीशी परिचय करून दिला, तेव्हा त्या ' स्वदेशी 'च आहेत, ' इम्पोर्टेड ' नाहीत हे पाहून मला समाधान वाटलं. साहेबांनी मोठ्या कौतुकानं तो भव्य बंगला मला अंतर्बाह्य दाखवला. त्याच्या उभारणीसाठी लागणारे दगड आपण कोठून मिळवले, खिडक्यांचा काचा

कोणकोणत्या देशांतून मागवल्या याची साग्रसंगीत सुरस कथा त्यांनी मला आवर्जून ऐकवली. स्वदेशी वस्तूपेक्षा त्यांचा भर परदेशी मालावरच अधिकांशाने होता. बंगल्याचं नावसुद्धा चक्क ' ब्ल्यू मॅन्शन ' असं आंग्ल भाषेतलंच ठेवलं होतं. एकूण या साहेबांना जे जे पाश्चात्य, जे जे परदेशी ते ते मनापासून प्रिय होतं असं दिसलं. बोलताना मधून मधून चुकीचे इंग्रजी बिनचूक बोलण्यात त्यांचा हातखंडा होता. बायकोनं चहाचा कप त्यांच्या हाती दिल्यावर ते तिला तत्परतेनं ' थँक्यू ' म्हणाले. मी थोडा गांगरूनच गेलो. कारण चुकीचं बोलण्याची सफाई मला जमण्यासारखी नव्हती आणि दुसरं असं की संभाषण करणाऱ्या दोन्ही व्यक्तींची मातृभाषा मराठीच असताना त्यांनी सातसमुद्राच्या पलीकडच्या इंग्रजीचे हाल का करावेत ? आपल्या आईच्या भाषेतून बोलण्याची शरम वाटावी यासारखी दुसरी शरमेची गोष्ट कोणती असेल ? पण सध्या मातृभाषेला विचारतो कोण ? माझ्या माहितीतील एक 'मॉडर्न' विदुषी आपल्या पाच वर्षांच्या मुलाला वात्सल्यभराने समजावून सांगत होती,

' बरं का रे दिनेश, मला आई म्हणायचं नाही, मम्मी म्हणत जा. मम्मी म्हटल्यावर कसं फ्रेश वाटतं. ' आई पेक्षा ' मम्मी ' बरी वाटावी या कर्माला काय म्हणावं ? एकूण काय सांप्रत ' आईला ' वाईट दिवस आले आहेत. डॅडी मम्मीच्या या राज्यात ' ब्ल्यू मॅन्शन ' लाच दोष देण्यात काय अर्थ आहे ? आपल्या अस्मितेच्या साऱ्या खुणा पुसट होत चालल्या आहेत हेच खरे. आपली भाषा ही आपल्या अस्तित्वाची आणि संस्कृतीची एक ठळक आठवण असते. पण जाऊ द्या हा विषय. आपल्या बंगल्यासंबंधीची रसभरित माहिती सांगितल्यानंतर ओठातला पाईप पेटवीत इंजिनिअरसाहेब आपल्या स्टायलिश, इंग्रजी मिश्रित भाषेतून म्हणाले,

' बाय द बाय, कशी काय वाटली गरीबाची झोपडी ?' मी म्हणालो, ' असली गरीब झोपडी मी सुद्धा बिनतक्रार स्वीकारीन. खरोखरच ही वास्तू म्हणजे तुमच्या रसिकतेचं आणि सौंदर्यदृष्टीचं एक सुंदर प्रतीक आहे. ' माझ्या या अभिप्रायावर साहेब खूष झाले. ' थँक्यू फॉर युवर कॉम्प्लिमेंट्स. पण कुठे काही कमतरता जाणवत असेल तर फ्रँकली सांगा. '

बंगल्याच्या भव्यतेबद्दल, रचनासौंदर्याबद्दल, प्रतिकूल बोलण्यासारखं काहीच नव्हतं. पण एवढ्या प्रशस्त दिवाणखान्यात आणि वेगवेगळ्या खोल्यांत मला

पुस्तकांचं एखादं लहानसं शेल्फही कुठंच दिसलं नाही. या सुशिक्षित श्रीमंताच्या वैभवशाली बंगल्यात एखाद्या कोपऱ्यात देखील मला पुस्तकं आढळू नयेत हा काय चमत्कार आहे? साहेबांचा मुलगा इंजिनिअरिंग कॉलेजात शिकत होता. त्याच्या टेबलावर मात्र त्या विषयाचे दोनतीन ग्रंथ मला दिसले. पण या व्यतिरिक्त पुस्तकांचं दर्शन काही घडलं नाही. उलट्या सुलट्या इंग्रजीतून दोनचार शब्द उच्चारणाऱ्या साहेबांच्या दिवाणखान्यात तरी शेक्सपिअर, शेली, कीट्स, इलियट, सॉमरसेट मॉम निदान जेम्स हॅडली चेस यांची पुस्तके सुद्धा असू नयेत म्हणजे काय? काही बाजारी, उत्तान चित्रं असलेली चार-सहा मासिकं सोडली तर इतर साहित्य आढळलं नाही. मी आश्चर्याने थक्क झालो. पंधरा–वीस लाखांचा बंगला बांधणाऱ्या सुशिक्षित श्रीमंताने मराठी, इंग्रजीतले आठ–दहा नामांकित ग्रंथही आपल्या संग्रहात ठेवू नयेत ही घटना मला फार क्लेशकारक वाटली. यांच्या सुखी जीवनाच्या कल्पनेत सोफासेट आहे, टी. व्ही. आहे. यांच्या अंगावर परदेशी कापडाचा झुळझुळीत सूट आहे. दररोजच्या धूम्रपानासाठी दहावीस रुपयांचा धूर काढताना यांना संकोच वाटत नाही. इंग्रजी मद्याच्या बाटलीसाठी दोनतीनशे रुपये सहज खर्च करण्याची 'सुसंस्कृत' शक्ती यांच्यापाशी असते. पण मग श्रेष्ठ लेखक–कवीचे निवडक साहित्य आपल्या संग्रही ठेवण्याची यांना का आवश्यकता वाटत नाही? पुस्तकांचा स्पर्श यांना इतका नकोसा वाटतो? खरे तर पुस्तकांशिवाय प्रतिष्ठित, सुसंस्कृत माणसे बिनबोभाटपणे कशी जगू शकतात हेच कळत नाही. 'अंगात जुना कोट असला तरी चालेल पण नवे पुस्तक खरेदी करा' असे एका विचारवंताने म्हटल्याचे मला आठवले. साहेबांनी कदाचित आपला पुस्तकसंग्रह स्वतःच्या खोलीत ठेवला असेल म्हणून मी त्यांना म्हणालो, 'आपली लायब्ररी दाखवा ना! तुमच्याकडं उत्कृष्ट पुस्तकं असतील. मागच्या वर्षी एका शिक्षकाच्या घरी मला त्याच्या तीनचारशे पुस्तकांचा उत्तम संग्रह पहायला मिळाला. प्रत्येक पुस्तक त्यानं परिश्रमानं मिळवलं होतं. तेच त्याचं धन होतं. इंग्रजी–मराठीतल्या काही दुर्मिळ झालेल्या सुंदर साहित्यकृतींची आणि माझी तिथं भेट झाली.'

साहेब खदखदून हसले आणि म्हणाले, "पुस्तकं जमविण्याचा आणि वाचण्याचा रिकामटेकडा छंद मी कधीच जोपासला नाही. त्यात काय अर्थ आहे? वेळ आणि पैसा उधळण्यापलीकडं त्यातून काहीच निष्पन्न होत नाही.

एकदा एखादं पुस्तक वाचून काढलं की ते निरुपयोगी होतं. जन्मभर त्याचं लोढणं कशाला बाळगायचं ? सम हाऊ प्रोफेसरसाहेब, आय हॅव नो लायकिंग फॉर बुक्स. पुस्तकं बुडवून टाकली तरी जगाचं काय नुकसान होणार ? "

साहेबांचे हे 'ज्ञानयुक्त' बोल ऐकताना त्या वातानुकूलित दिवाणखान्यातही मला उकडायला लागले. पुस्तकांबद्दल एवढी उदासीनता, एवढी तुच्छता बाळगणारे सुशिक्षित लोक जगात आहेत तर ? पुस्तकांचा उपयोग काय ? असे विचारणारे महाभाग पाहिल्यानंतर आता त्यांच्याशी प्रत्यक्ष बृहस्पती तरी काय बोलू शकणार ? साहेबमजकुरांचा मुद्दा बरोबरच होता. त्यांचं प्रेम पैशावरच होतं. पैसा मिळविण्यासाठी आपण धडपडावं, कोणत्याही मार्गानं तो मिळवावा असं त्यांचं साधं सरळ तत्त्वज्ञान होतं. म्हणून तर भौतिक आनंद देणारी सारी सुखसमाधाने त्यांच्यासमोर हात जोडून उभी होती. माणसाला आणखी काय हवे असते ? वाचन करणे, काव्य–नाटकाचा आस्वाद घेणे, विविध विषयांवरील पुस्तकांतून मांडलेल्या विचारांवर चर्चा करणे, साहित्याच्या आनंदात रममाण होणे हे सगळे रिकामटेकडे पोरखेळ आहेत असं त्यांना वाटत होतं. यातून कसला कपाळाचा आनंद मिळणार ? पुस्तकाचं वेड म्हणजे करंटेपणा. एकदा माझी एक श्रीमंत विद्यार्थिनी एक पाठ्यपुस्तक मागण्याकरता माझ्याकडं आली. परीक्षेसाठी असलेलं आठदहा रुपयाचं पुस्तक तिला काही दिवसांसाठी हवं होतं. ते विकत न घेण्यामागं तिचा हाच युक्तिवाद होता की, 'परीक्षेनंतर त्याचा काय उपयोग आहे ?' पायातल्या चपलेवर शंभर सव्वाशे रुपये सहज खर्च करणाऱ्या या लोकांना पुस्तक विकत घेणं हा शुद्ध मूर्खपणा वाटतो.

साहित्याच्या वाचनातला आणि चिंतनातला आगळा अवीट आनंद ज्यांना घेता येत नाही– ज्या सुशिक्षितांनीही त्याच्याकडं पाठ फिरवली आहे त्यांच्या अरसिकतेला त्रिवार वंदन असो. आपला एखादा आवडता ग्रंथकार किंवा कवी, त्याच्या साहित्याच्या रूपानं आपल्याजवळ सदैव ठेवण्यातली गोडी यांना कधीच कळत नाही, आपण पुस्तकी किडे होऊ नये, जीवनातला आनंद चाखावा हे मला मान्य आहे. पण पुस्तकांच्या शब्दांत जीवनाचा अर्क साठवलेला असतो ना ! चांगलं पुस्तक हे चैनीचं सामान्य साधन नसून ती आपल्या मनाला उजळवणारी एक सुगंधित शक्ती असते. उत्तम साहित्य वाचणे म्हणजे प्रतिभावंताच्या व्यापक, सुंदर दृष्टीने जीवनाचे, सौंदर्य न्याहाळणे, साहित्य म्हणजे

शब्दांचे निष्फळ बुडबुडे नव्हेत. विश्वमोहिनी शारदेच्या कलामधुर नर्तनाची आणि संगीताची ती रंगभूमी आहे. संपन्न मनाच्या विचारवंतांचे चिंतन, सुगंधी शब्दांच्या कुप्यांतून आपल्याला साहित्याच्या रूपाने मिळत असते. पुस्तकांतून मिळणाऱ्या धुंद रसायनाची नशा जन्मभर उतरत नाही. हे विधान मी श्रेष्ठ वाङ्मयाबद्दल करतो आहे. केवळ विकारांच्या दुर्गंधीत लेखणी बुडविणाऱ्या लेखणी मजुरांच्या बाजारी चोपड्यांबद्दल मला या वेळी बोलायचे नाही. 'आनंदाच्या डोहीचे आनंद तरंग' अनुभवणारा तुकोबा आपल्या निर्मळ संतवाणीने जेव्हा आपल्याशी बोलू लागतो तेव्हा वाणीचा सुवास आपल्या आत्म्याला मिठी मारतो. अशावेळी पायी रुतलेल्या काट्यांचीही फुलं होतात. डोळ्यांतल्या अश्रूंना गंगायमुनेच्या पावित्र्याचा स्पर्श होतो. तांबे, गडकरी, शेली, कीट्स यांच्यासारख्या भावप्रभूंच्या कविता वाचताना स्त्रीच्या प्रेमातली गाढता आणि गूढता आपल्याला भारून टाकते. वैचारिक ग्रंथातही एक खानदानी सौंदर्य असते. मी त्या इंजिनिअर महाशयांना काहीशा तीव्रतेनं म्हणालो,

'तुमच्याशी सहमत होणं मला तरी शक्य नाही. ज्याला उत्तम साहित्य आवडत नाही त्याच्या अंत:करणात-मानव्यात काहीतरी उणीव राहून गेली आहे असं मला वाटतं. क्षमा करा, आपला उपमर्द करण्यासाठी मी बोलत नाही. मंदिर सुबकपणानं बांधलेलं असावं पण देव्हारा मात्र रिकामा असावा हे जसं चमत्कारिक दिसेल तसं मला घरात दोनचार ग्रंथ दिसले नाहीत तर विसंगत वाटतं. सुशिक्षितांच्या घरात पुस्तकं नसणं म्हणजे सुवासिनीच्या कपाळी कुंकुम-तिलक नसण्यासारखं नव्हे काय? खरं सांगू, चांगलं पुस्तक वाचून झालं की कसं अभ्यंगस्नान केल्यासारखं वाटतं. जगण्यातल्या सुखदु:खांचा अर्थ चांगल्या साहित्यातून आपल्यासमोर येतो. माणूस नुसत्या भाकरीवर आणि भाकरीसाठीच जगत नाही आणि जगूही शकत नाही. पोटासाठी जशी भाकरी तशी मनासाठी पुस्तकं हवीत.'

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांची एक गमतीदार गोष्ट मला इथं आठवते. हापूसचा आंबा त्यांना फार आवडायचा. एकदा त्यांच्या पत्नीनं तीनचार आंब्यांच्या फोडी करून त्यांच्यासमोर ठेवल्या आणि ती काही कामासाठी स्वयंपाकघरात निघून गेली. रानड्यांनी एक फोड चाखून पाहिली नि मग ती बशी दूर सारली. त्यावेळी त्यांच्या हातात एक ग्रंथ होता. थोड्या वेळानं अभ्यासिकेत येऊन

त्यांच्या पत्नीनं पाहिलं, तिला मोठं आश्चर्य वाटलं. ती नाराजीनं म्हणाली, ' हे काय ? साऱ्या फोडी तशाच पडून आहेत. तुमच्या आवडीचे म्हणून मुद्दाम हे आंबे मागवले होते.' रानडे थोडेसे हसले आणि म्हणाले, ' एक फोड मी चाखून पाहिली. उत्तम स्वाद आहे. पण मग लगेच लक्षात आलं की एका फोडीसारखीच ही दुसरी फोड असणार. स्वादात काही बदल होणं शक्य नाही. पण माझ्या हातात जो ग्रंथ आहे त्यातल्या प्रत्येक पानाची रुची वेगळी आणि विलक्षण आहे. यातला प्रत्येक शब्द, प्रत्येक विधान नवनवीन चवीनं माखलेलं आहे. अशावेळी आंब्याच्या फोडी चाखत बसायला मला वेळ नाही. ' रानड्यांचें हे उत्तर मला तरी अत्यंत रसिकतेचे वाटते. वाङ्मयातला रस जिभेने चाखायचा असतो, डोळ्यांनी, कानांनी अनुभवायचा असतो, बुद्धीने आणि हृदयाने तो ओरपायचा असतो. हीच खरी रसानुभूती. पण ज्यांना ही आवडच नाही असे असंख्य लोक जगात आहेत. त्यांच्याबद्दल मी इतकेच म्हणेन की ते बिचारे अभिरुचिसंपन्न जीवनाला खरोखरच मुकले. एखादं सुगंधी फुल आपल्याला हुंगायला मिळालं नाही तर त्यात फुलाचं काय नुकसान आहे ? वसंताचा स्पर्श होऊनही काही करंट्या झुडुपांना पालवी फुटत नाही. यात त्या वसंतऋतूचा काय अपराध ? सौंदर्याच्या स्पर्शानं पुलकित होण्याची रसवेडी वृत्ती आपल्यात आपणच पेरायची असते. जोपासायची असते. माझ्या एका मित्रानं मला एकदा असं विचारलं होतं की, ' कोणत्या प्रकारचं वाङ्मय आपण वाचावं, श्रेष्ठ-कनिष्ठ कसं ठरवावं ? ' मी म्हणालो, ' आनंदासाठी वाचावं. ' जे वाचताना आपल्याला जगत असल्याचा साक्षात्कार होतो ते वाचावं. खरं तर वाचनाच्या कुरणात एखाद्या बोकडासारखं चरावं. वाचता वाचताच बऱ्यावाईटाचा शोधबोध होत असतो आणि मग आपली अभिरुची घडत जाते. शितावरून भाताची परीक्षा करता येते. सारंच वाङ्मय चांगलं नसतं. पण काही पुस्तकं आपल्याला विलक्षण सुख आणि विलक्षण दुःख देऊ शकतात. शरदबाबूंच्या आणि हरिभाऊंच्या कादंबऱ्यांनी मला दिलेलं उच्च दुःख मी माझ्या हृदयात एखाद्या अमूल्य रत्नासारखं जपून ठेवलं आहे. जगण्यातली कडवट गोडी त्यातून मला समजली. शेक्सपिअरच्या काही शोकांतिका सोसाट्याच्या वाऱ्याप्रमाणे आहेत. मला नखशिखांत हालवून गेल्या. आयुष्याच्या भूमीवर माणूस कसा एखाद्या झाडासारखा उन्मळून पडतो, हेच त्या नाटकांनी मला सांगितलं. मेघदूतानं मला अखंड तारुण्य दिलं. यक्षाची विरहव्यथा खरं तर

माझी आणि तुमची नाही काय ? प्रणयिनीच्या विरहदु:खाचा चटका ज्याला कधीच बसत नाही त्याच्यासारखा दुसरा दुर्दैवी नाही. भवभूतीनं माझ्या मनात राम-सीतेच्या जीवनातलं कारुण्य आणि प्रेम पेरून ठेवलं आहे. तुम्ही काही म्हणा, माणसं भावनांवरच जगत असतात. सोफासेट आणि फ्रीज त्यांना जगवू शकत नाहीत. बंगले आणि मोटारी माणसाला माणुसकीचा अर्थ सांगू शकत नाहीत. बहिणाबाई चौधरी सारखी एखादी निरक्षर शेतकरीण आपल्या काव्यातून तो सहज सांगून जाते. बँकबुकांतून नाण्यांचा आवाज आला तरी हृदयाचं गाणं त्यातून झिरपत नाही. कवींचे आणि कलावंतांचे, विचारवंतांचे आणि तत्त्वचिंतकांचे श्वासोच्छ्वास त्यांच्या साहित्यातून नेहमी दरवळत असतात. त्यातला ऑक्सिजन आपल्याला जगवीत आणि जागवीत असतो.'

आमचे इंजिनिअर साहेब सातमजली हसून म्हणाले, 'वा प्रोफेसरसाहेब ! तुम्ही तर कॉलेजातलं लेक्चरच ठोकून दिलं. पण तुमच्या भाषणानं माझंही मत आता थोडंसं बदललंय. पुस्तकांशिवाय मी एज्युकेटेड आणि कल्चर्ड वाटत नसेन तर उद्याच दहा हजार रुपयांचे तुम्ही सांगाल ते ग्रंथ मागवतो. फॉरेन-हूनही पुस्तकं मागवीन. अहो, आहे काय त्यात ? तुम्ही सांगावं आणि आम्ही ऐकू नये असं कधी झालंय ? ' मला त्यांच्या विचाराचं हसू आलं. बंगले आणि मोटारीप्रमाणं पुस्तकंही खरेदी करता येतात यात कसलीच शंका नाही. पण पुस्तकांच्या हृदयातून दरवळणारा सुगंध मात्र पैशाने विकत घेता येत नाही. पुस्तकांच्या प्रेमात पडलेल्या अभिजात वेड्यालाच तो मिळू शकतो. सारी पुस्तकं बुडवून टाकली तरी जगाचं काही नुकसान होणार नाही असले स्टंट अभिप्राय केवळ हास्यास्पद आणि निरर्थक आहेत. ज्ञानाचा आणि वाङ्मयाचा द्वेष करणाऱ्या मनोवृत्तीलाच जलसमाधी दिली पाहिजे.

# १

# संत आणि चमत्कार

परवा एका सभेत संतांच्या सामाजिक आणि वाङ्मयीन कार्याबद्दल मी बोललो. भाषण संपल्यानंतर एक भाविक गृहस्थ तावातावानं व्यासपीठावर येऊन मला म्हणाले ' तुम्ही आमच्या भावना दुखावल्या आहेत. आमच्या श्रद्धास्थानांवर तुम्ही आघात केलेला आहे.' मी विचारलं, ' नेमकं काय झालं ते सांगाल काय ? ' तेव्हा अधिकच आवेशाने ते बोलू लागले, ' संतांनी कसलेच चमत्कार केले नाहीत असे सांगून तुम्ही संतांचं अवमूलन केलं आहे. आम्हा भक्तांच्या भावना दुखावण्याचं पातक तुम्ही करीत आहात. हे आम्ही सहन करणार नाही.' सद्‌गृहस्थ बरेच अस्वस्थ झालेले दिसले. पण खरं सांगायचं तर माझ्या संपूर्ण भाषणात कोणालाही खुपण्यासारखा किंवा कोणाचा अनादर करणारा असा विचार मुळीच नव्हता. माझ्या मते मी संतांच्या कार्याविषयी, त्यांच्या व्यक्तिमत्त्वा-विषयी आत्मीयतेनंच बोललो होतो. पण माझा दृष्टिकोण विभूतिपूजकाचा मात्र नव्हता. संत कार्याची चिकित्सा बुद्धिवादी भूमिकेवरूनच करण्याचा मी प्रयत्न केला होता. या भाविकांच्या भावना का दुखावल्या जाव्यात हे कोडे मला नीटसे उलगडले नाही. सध्या भावना दुखावल्या जाण्याचं प्रस्थ फारच वाढलेलं दिसतं. काहीतरी बोलायला जावं आणि कुणाच्या तरी अतिनाजूक भावनांना कळ यावी असा काळ आलेला आहे. लोकांची भावनिक प्रकृती अशी तोळामासा का बरं झाली असावी ? फार जपून बोलायला हवं.

' आजचा चहा चांगला झाला नाही ' असं मत नवऱ्यानं व्यक्त केलं की, बायकोच्या नाजूक भावना दुखावल्या जातात. म्हणून समस्त नवरेमंडळींना त्यांच्या हिताचा सल्ला देतो की, ' बंधूनो ! चहा वाईट असला तरी तो मुकाट्यानं प्रसन्न चेहऱ्यानं पिऊन टाका, खरं बोलण्याचा वेडेपणा करू नका. नाहीतर पत्नीच्या कोमल भावना एकदम दुखावतील बरं ! चहा बेचव झाला, अगदी कोयनेलसारखा लागला तरी काही आकाश कोसळून पडत नाही. सहन करायला शिका. नवऱ्याच्या जातीनं कसं सहनशील असायला हवं. काहीतरी फटकन बोलाल आणि चटकन् भावना दुखावून टाकाल.' हे थोडं विषयांतर झालं खरं.

संतांकडे चमत्कारांच्या चष्म्यातून न पाहता चिकित्सेच्या दृष्टीतून पाहा, अशा अर्थाच्या माझ्या विधानामुळं तो गृहस्थ माझ्यावर चिडला होता. आता या भाविकाशी कोणत्या पद्धतीनं वाद करायचा ? वादविवादाच्या आखाड्यात उतरून दोन हात करण्याची बौद्धिक मस्ती त्याच्यात मुळीच नव्हती. संतांविषयी परंपरेने चालत आलेल्या दंतकथा आणि आख्यायिका म्हणजे निखळ सत्य आहे, असे डोळे झाकून गृहीत धरणारा तो एक भोळसट श्रद्धाळू भक्त होता. साधूसंतांचं सामर्थ्य त्यांनी केलेल्या चमत्कारातच असतं याबद्दल त्याच्या मनात तिळमात्रही शंका नव्हती. असल्या निःशंक झालेल्या माणसाच्या हाडीमासी खिळून राहिलेल्या भ्रांतिष्ट कल्पना कुणालाच नाहीशा करता येणार नाहीत. इथं वाद करण्यात काहीच अर्थ नव्हता. वादसुद्धा कुणाशी आणि किती करावा याचे तारतम्य नसेल तर वादातून ' तत्त्वबोध होण्याऐवजी ' शीर्षभेद ' व्हायला वेळ लागत नाही. अशाच एका सभेत स्वतःला ' भगवान ' असे संबोधून घेणाऱ्या एका ' साधू 'चा उल्लेख मी ' आचार्य ' असा करताच त्या भगवानाचे दोन शिष्योत्तम तत्परतेने माझ्या अंगावर चालून आले, आणि आपल्या ' सात्त्विक ' आवाजात गुरगुरून म्हणाले,

' आचार्य नव्हे, भगवान म्हणा. आमचे गुरू साक्षात् भगवान आहेत. त्यांना आचार्य म्हणून तुम्ही आमच्या भावना दुखवीत आहात.' मीसुद्धा त्या थोर शिष्यांना माझ्या अतिसात्त्विक स्वरात ठणकावून सांगितलं, ' त्यांना तुम्ही भगवान म्हणा, नाहीतर परमेश्वर म्हणा ! मी त्यावर आक्षेप घेत नाही. पण मी मात्र त्यांना आचार्यच म्हणेन. आचार्य हा सुद्धा काही सामान्य शब्द नाही.

पुष्कळच बहुमानाचा द्योतक आहे. पण काय वाटेल ते झालं तरी ' भगवान ' मात्र म्हणणार नाही. मग तुमच्या मृदु मृदुल भावनांचा चोळामोळा झाला तरी मला पर्वा नाही.' माझ्या या नितांत सात्त्विक उत्तरामुळे ते शिष्यवर नाराज झाले. दुखावलेल्या भावनांवर फुंकर मारीत स्वस्थ बसून राहिले. साध्या, सरळ निरुपद्रवी अशा उल्लेखांमुळे देखील भावनेला चिमटा बसावा हा काय चमत्कार आहे ! याचा अर्थ कोणी आपली प्रामाणिक मते निर्भयपणे व्यक्त करूच नयेत काय ? की केवळ सांकेतिक सनातन विचारांचेच समाजाने अष्टौप्रहर रवंथ करीत बसावे ? असल्या चर्वितचर्वणातून कोणता रस निर्माण होणार आहे ? भिन्नभिन्न विचारांचे, कल्पनांचे स्वैर वारे समाजात मनमोकळेपणाने वाहत राहिले पाहिजेत. समाज म्हणजे जड, निर्जीव मने असलेल्या लोकांचा कळप नव्हे. जिवंत माणसांचा, स्वतंत्र इच्छाशक्ती असलेल्या सुबुद्ध लोकांचा समूह म्हणजे समाज. विचारांची आणि मतांची ठेकेदारी कोणा एका व्यक्तीकडे किंवा गटाकडे असूच शकत नाही. या भाविकाचे मन का दुखावले गेले ? पारंपरिक मत मी मांडले नाही म्हणूनच ना ! मी त्या वर उल्लेखिलेल्या सभेत म्हणालो होतो—

' संताच्या जयजयकारात रंगून गेलेल्या भक्तांनी संतांची रसमय श्रेष्ठ कविता कितपत वाचली आहे, याची मला कल्पना नाही. कित्येकांच्या घरी ' ज्ञानेश्वरी' असते, नामदेव–तुकारामाची गाथा असते. तिला दररोज फुले वाहून, हळद-कुंकू लावून तिची पूजा केली जाते. संतांची महती गाताना हे भाबडे लोक त्यांनी केलेल्या ऐकीव चमत्कारांची कथा सांगतात. संत काय जादुगार होते ? अहो, आमच्यासारखीच ही हाडामांसाची माणसं होती. सुख–दु:खांच्या भोवऱ्यात आमच्यासारखेच हे संतही एके काळी फिरत होते. आमच्यासारखाच त्यांनाही कित्येक वेळा आयुष्याचा वैताग आला असेल. आम्ही पावलोपावली वाट चुकतो, ठेचकाळतो. त्यांचीही वाट तशीच चुकली असेल. पण हरवलेल्या वाटा चिकाटीनं शोधण्याचं फार मोठं कार्य त्यांनी केलं आणि ती वाट आम्हाला दाखवली हाच खरा चमत्कार आहे. ' भिंत चालवणं ' किंवा ' सदेह वैकुंठाला जाणं ' असल्या गोष्टींचा चमत्कार कधी घडला की नाही या विचारांत कसलंही तथ्य नाही. भाबड्या लोकांच्या कल्पनाविलासात अद्भुतरम्यता असते. त्यात तर्कबुद्धीला अवसर नसतो. काहीतरी चमत्कार करून, नजरबंदी करून संतांना

लोकप्रियता मिळवायची नव्हती. लोकांच्या मागे आशाळभूतपणे धावणारे ते राजकारणी लोकनेते नव्हते. लोकांच्या मनांत आपल्या अनुभवांतून काही उदात्त निष्ठांची पेरणी करणारे ते विचारवंत होते. संत हा चमत्कार करणारा गारुडी नसतो. तो माणसाला माणुसकी शिकवणारा माणूस असतो.'

आता माझ्या या विधानात एखाद्या भाविकाच्या भावना दुखण्यासारखं खरोखर काही आहे का? पण त्या गृहस्थानं आपली नापसंती व्यक्त करून म्हटलं, 'तुम्ही शिकलेले लोक, स्वतःला फाजील शहाणे समजता. अरे, तुकोबारायाच्या अभंगांची वही तेरा दिवस इंद्रायणीच्या तळाशी भिजत पडली होती. प्रत्यक्ष परमेश्वरानं ती काढून दिली. म्हणून तर तुमच्यासारखे लोक आज तुकोबाचे अभंग वाचू शकतात. संत म्हणजे तुमच्या-आमच्यासारखी माणसं नव्हतीच मुळी. ते देवांचेच अवतार होते. तुमच्यासारख्यांची व्याख्यानं ऐकण्यापेक्षा भजन करीत बसणं चांगलं!' हा सद्गृहस्थ आता फारच व्याकुळ झाला होता. त्याच्या अभंग श्रद्धेला मी नकळत हात घातला होता. अखेर त्याची कशीबशी समजूत काढून मी त्याला म्हणालो,

'दुसऱ्याचं बोलणं आपल्याला पटलं नाही तर तसं सांगण्याचा आणि स्वतःचं म्हणणं मांडण्याचा तुम्हाला जरूर अधिकार आहे. पण आपल्याला न पटणारं दुसऱ्याचं मत शंभर टक्के चुकीचंच आहे हा आग्रह कशासाठी धरता? ज्या संतांवर तुमची श्रद्धा आहे त्या ज्ञानोबा-तुकोबांनीसुद्धा असला दुराग्रह कुठेच धरला नाही. तुकोबा तर चक्क सांगतात—'सत्य असत्यासी, मन केले ग्वाही। मानियले नाही बहुमता।' जे आपल्याला सत्य वाटलं ते त्यांनी मनःपूर्वक झडझडून सांगितलं. बहुमत आपल्या विरोधी आहे की काय याची त्यांनी कधीच कदर केली नाही. बहुमताच्या बुजगावण्याला भीक घालायला या संतांना एखादी निवडणूक लढवायची नव्हती. जे हृदयाला पटले ते फटकळपणानं सांगताना कुणाच्या भावना दुखतील म्हणून त्यांनी कधी माघार घेतली नाही. संतांच्या सांगण्यात नावीन्य होतं, बंडखोरी होती आणि सात्त्विक बुद्धी होती. आयुष्याच्या वणव्याचे त्यांनीही चटके सहन केले होते. त्यातूनच त्यांचं तत्त्वज्ञान तावून-सुलाखून बाहेर पडलं होतं. माझ्या दृष्टीनं संतांचं मोठेपण यातच सामावलं आहे.' माझं म्हणणं त्या भाविकाला पटेल अशी माझी अपेक्षाच नव्हती. काही माणसं केवळ रूढ झालेल्या, गतानुगतिक कल्पनांची पोपटपंची करीत बसतात. तो

भाविक मनुष्य कदाचित अशिक्षित असेल. पण सुशिक्षित लोकांतसुद्धा आत्यंतिक भाबडेपणाचे रोगट जंतू कमी असत नाहीत. सभेत बुद्धिवादावर विद्वत्ताप्रचुर व्याख्यान देऊन स्वत:ला बुद्धिवादाचा गड्डा समजणारा तथाकथित विचारवंत नित्यनेमाने अंगारे-धुपारे करताना दिसतो तेव्हा काय करायचे? याचा अर्थ त्यांना धड बुद्धीही नसते आणि धड अज्ञानी भोळसटपणाही नसतो. हे मध्येच कोठेतरी लोंबकळत असतात. माझा एक मित्र एका नामांकित कॉलेजात विज्ञानशास्त्राचा प्राध्यापक आहे. आपल्या आजारी पडलेल्या मुलाला डॉक्टरांचं औषध देताना कुठल्याशा बुवाच्या पायाचं तीर्थही भाविकपणानं पाजायचा. आता या सुशिक्षित मूर्खपणाला काय म्हणायचं? मी त्याला चिडून या कृत्याबद्दल जाब विचारला. हा महान प्राध्यापक माझ्या अज्ञानाची कीव करीत म्हणाला,

'तुझ्यासारख्या संशयात्म्याला हे कळणार नाही. साधु-पुरुषांच्या चरणोदकात एक दैवी सामर्थ्य असतं. डॉक्टराचं औषध गुणकारी असलं तरी संतमहंतांच्या आशीर्वादाशिवाय गुण येत नाही. मुलाच्या आजारावर मी दोन्ही बाजूंनी चढाईचा व्यूह रचला आहे. एका बाजूला डॉक्टर तर दुसऱ्या बाजूला आमचे पूज्य बुवा. आता यम आला तरी त्याच्या बापाची भीती नाही. बुवांच्या तीर्थात सर्व रोग नाहीसे करण्याची शक्ती आहे, अशी माझी श्रद्धा आहे. पण हे तुला अधार्मिकाला कसं रे कळायचं?' हा अजब युक्तिवाद ऐकून मी माझ्या कपाळावर हात मारून घेतला. अशा लोकांना उपदेश करण्याचा जो प्रयत्न करतो त्याच्यासारखा दीडशहाणा कोणी असेल का? 'नॉलेज कम्स, बट विजडम लिंगर्स'. ज्ञान लाभले तरी शहाणपणा यायला बराच वेळ लागतो, असं टेनिसन् कवीनं म्हटलं आहे याची या ठिकाणी मला आठवण झाली. पाय धुतलेल्या पाण्यात पावित्र्य आणि रोगनाशक शक्ती सामावलेली असते हा भयानक गैरसमज लाखो लोकांच्या डोक्यात आहे. तो कसा काढावा हेच समजत नाही. या पाण्यास 'तीर्थ' म्हणण्याचा वेडेपणा माझा हा प्राध्यापक मित्रही करीत होता. अशा स्थितीत मघाच्या त्या भाविक भक्ताला दोष तरी कसा द्यायचा? उगीच कुणाच्या भावना कशाला दुखवायच्या? भावना, श्रद्धा, संस्कृती, परंपरा वगैरे गुळगुळीत शब्दांचा नेमका अर्थ तरी काय करा-यचा हेच आताशा समजेनासे झाले आहे. माझ्या पदवीधर सुशिक्षित मित्रापेक्षा आमचा संत तुकोबा निश्चितच कमी शिकला होता. शाळा कॉलेजची पायरी

याला चढता आली नाही. पण ज्ञानाची आणि कवित्वाची उंच पायरी आपल्या अनुभवाच्या बळावर तो निर्विवादपणे चढून गेला. कळसावर जाऊन बसला. आपल्या तीर्थोदकावर, तीर्थयात्रांवर तो बुद्धिवादी कवी आणि संत तुटून पडला आहे. अंगारे-धुपारे देणाऱ्या बुवाबाजीवर त्याच्या तेजस्वी वाणीचा चाबूक कडाडला आहे. एका कीर्तनात तुकारामाची दिव्य वाणी बोलून गेली,

डोई वाढवूनि केश । भूते आणीती अंगास
तरी ते नव्हती संतजन । तेथे नाही आत्मखूण
मेळवूनि नरनारी । शकुन सांगती नाना परी
तुका म्हणे मैंद । नाही त्यापाशी गोविंद ॥

भोळी भाविकता कुणाच्याही पायावर लोटांगण घेते, कुणाच्याही पायावर डोके ठेवायला डोके लागत नाही. डोक्यात भरलेला अंध-श्रद्धेचा कचरा हेंच मुख्य भांडवल. ज्ञानेश्वर-तुकारामांसारखे संत असल्या निर्बुद्ध प्रवृत्तींवर वैचारिक हल्ले चढवतात व समाजाला नव्या वाटा दाखवतात यातच त्यांचं खरं संतत्व आणि महत्त्व साठवलेलं आहे. त्यांच्या चरित्राभोवती अतर्क्य, अशास्त्रीय चमत्काराचं जाळं विणीत बसण्याचं काहीच कारण नाही. आता राहिला मुद्दा भावना दुखविण्याचा. आपल्या अंत:करण प्रवृत्तीला जे प्रशस्त, हितकारक वाटतं ते बोलून दाखवण्याचा, लिहिण्याचा अधिकार जन्मदत्त आहे. अतिहळव्या लोकांनी वाटल्यास आपल्या भावनांचा विमा उतरवून घ्यावा. पण बुद्धीचा किरण एखाद्या भाबड्या भावनेच्या जिव्हारी घुसला तर त्यात हळहळण्याचं काहीच कारण नाही अज्ञानाची आणि अंधश्रद्धांची कात गळून पडावी यासाठीच विचारांची लढाई सामर्थ्य एकवटून लढायची असते. ती अखंड लढत राहिली पाहिजे. संस्कृतीच्या व ज्ञानाच्या प्रगतीचं रहस्य या लढाईतच आहे.

'दुरितांचे तिमिर जावो' याचा अर्थ अज्ञानाचा अंधार नाहीसा होऊन नव्या ज्ञानाचा, बुद्धिनिष्ठेचा प्रभाव पडत जावो, असाच करावा लागेल. कीर्तनाच्या रंगात देहभान हरपून नाचणारा नामदेव 'ज्ञानदीप लावू जगी' असंच म्हणतो. पंजाबपर्यंत जाऊन त्यानं ज्ञानाची पताका फडकावली. हा चमत्कार नव्हे का? पंढरीपासून पंजाबपर्यंत गेलेला हा नामा शिंपी ज्ञानभक्तीच्या सुईदोऱ्यानं समाजाचं फाटलेलं मन शिवत होता. त्याला टाके घालत होता. हा काय लहान

चमत्कार आहे? आपल्या आयुष्याचा माळ फुलावा, व्यर्थ वारीत वेळ दवडू नका असं म्हणणारा सावता माळी एक चमत्कारच करीत नव्हता काय? संतांनी केलेल्या याच चमत्कारांवर माझे प्रेम आहे. प्रत्येक युगातले खरे संत असेच चमत्कार करीत असतात. पण कशाला चमत्कार म्हणावं हे भल्याभल्यांना अजून समजत नाही याचाच मला चमत्कार वाटतो.

# १०

## पैशाला पासरी माणसे

' मायबापहो, पैसा हे सर्व अनर्थांचं मूळ आहे बरं! एकदा का माणूस पैशाच्या पाठीमागं लागला की त्याचं माकड झालं म्हणून समजावं. पैशाच्या नादानंच माणूस पशूहून पशू झाला. अरे, कशाला पाहिजेत तुम्हाला या हवेल्या आणि हे बंगले? मोटारगाड्या उडवताना, अंगावर झुळझुळीत कपडे घालताना, पंचपक्वान्नांची चंगळ करताना तुम्हाला सुख वाटत असेल. असल्या सुखासाठीच तुम्ही पैशाचा पाठलाग करता ना? तुमचं बँकबुक उद्या तुमच्याबरोबर स्मशानात येणार आहे काय? स्वर्गाच्या दारात उभ्या असलेल्या डोअरकीपरला हजार-पाचशे रुपयांचा चेक देऊन तुम्हाला स्वर्गात एन्ट्री मिळणार आहे का? नाही बरं बंधुभगिनींनो! थोडा विचार करा. रात्रंदिवस पैसा पैसा करून पैशाची गाठोडी बांधायची आणि एक दिवस मरून जायचं. त्यापेक्षा ईश्वरनामाचं गाठोडं बांधून घ्या. स्वर्गात चित्रगुप्तानं विचारलं तर त्याच्यासमोर प्रभुनामाचं ते गाठोडं अलगद ठेवून द्या. ते पाहताक्षणीच चित्रगुप्त तुम्हाला आदरानं सिंहासनाकडं घेऊन जाईल. अमृताचे प्याले हातात घेऊन रंभा, ऊर्वशी तुमच्या दोन्ही बाजूला उभ्या राहतील. तुमची बँक इथंच राहील. पैशाची थैली तुमच्यासोबत कशी येणार? म्हणूनच तुकाराम महाराज म्हणतात, ' धन मेळवून कोटी, सवे न ये रे लंगोटी'. इथं उंची साड्या घ्याल, दागदागिने घ्याल, सुटाबुटात मिरवाल पण ही सगळी माया आहे बरं! क्षुद्र पैशांपेक्षा त्या दयाघन परमेश्वराचं नामच

तुम्हाला तारणार आहे.'

कीर्तनकाराचे कीर्तन रंगत चालले होते. बुवांची वाणी प्रासादिक होती, आवाज बऱ्यापैकी होता. थोडीफार विनोदबुद्धीही होती. मंदिराचे आवार श्रोत्यांनी खचाखच भरून गेले होते. सारेच कीर्तन ऐकण्याचा सात्त्विक इच्छेने आले होते असे मी म्हणणार नाही. कारण बुवांच्या प्रतिपादनापेक्षा बऱ्याच तरुणांचे लक्ष कीर्तनासाठी आलेल्या महिलामंडळाकडे अधिक होते. चालायचेच! कनक आणि कांता यांचा मोह असायचाच! मधून मधून कथेकरी बुवादेखील स्त्री समुदायाकडे वाजवीपेक्षा जास्त रोखून पाहत असावेत असा संशय येत होता. कोणी एक गोरी-गोमटी, तरणी-ताठी मधून मधून डोळे झाकून नाम:स्मरणात रंगून जायची आणि आमचे कीर्तनकार प्रेमळ कौतुकाने तिच्याकडे पाहायचे. पण असले पापी संशय घेऊ नयेत. ते तिच्याकडे शुद्ध निर्विकार दृष्टीनेच पाहत असावेत असे समजून चालावे. काही का असेना, आता कीर्तनात रंग भरत चालला होता. मधून मधून बुवा ठराविक दृष्टांत घेऊन पैशामुळ माणसाचा कसा अध:पात होतो याचं परिणामकारक वर्णन करीत होते. जगज्जेता सिकंदर मरताना आपली सारी संपत्ती आपल्याला इथंच सोडून जावं लागणार म्हणून कसा ढसाढसा रडला याचा अभिनय देखील त्यांनी करून दाखवला.

कीर्तनाचा प्रभाव श्रोत्यांवर कितपत पडला कुणास ठाऊक! कीर्तनाच्या अखेरीला आरती फिरवणं सुरू झालं; मग मात्र श्रोते भराभर उठून जाऊ लागले. 'आरती झाल्याशिवाय कोणी जाऊ नये. रुपया-दोन रुपये तबकात टाका. पुण्य पदरी बांधून घ्या' असं बुवा कळवळ्यानं सांगत होते. पण बहुतेक जणांनी तिकडं दुर्लक्ष केलं. मीही काढता पाय घेण्याच्या बेतात होतो. तेवढ्यात माझ्यासमोर आरतीचे तबक आले. खिशातून निरुपायानं पंचवीस पैशाचं एक नाणं टाकून मी निघालो. बुवा किलकिल्या डोळ्यांनी ते सारं पाहात होते. तबकात पडणाऱ्या नाण्यांकडे आणि नोटांकडे ते बारकाईने बघत होते. अपेक्षेइतके पैसे आज आपल्याला मिळणार नाहीत या जाणिवेने ते बेचैन झाले होते. मी एक क्षुद्र नाणे तबकात टाकले हे दिसल्यावर काहीशा तिरीमिरीने पुढे येऊन मला म्हणाले,

'मिस्टर, देवकार्यासाठी पैसे देताना हात इतका का आखडावा? तुम्ही सुशिक्षित लोक नाटक-सिनेमाला जाता तेव्हा दहावीस रुपयांची तिकिटं घेताना तुम्हाला काही वाटत नाही. हॉटेलात खातापिताना पाचपन्नास रुपयांची तुम्ही

पर्वा करीत नाही. देवाला देताना मात्र तुमचा हात उचलत नाही. चार-आठ आणे टाकणं तुमच्या जिवावर येतं. अरेरे ! काय ही देशाची अधोगती ! परमेश्वरा, तुझ्या या राज्यात या अधार्मिकांचं पेव फुटलं आहे, धर्मस्थापना करण्यासाठी तुला पुन्हा अवतार घ्यावा लागणार. '

पैसा हेच साऱ्या अनर्थाचं मूळ आहे, म्हणून जेहेत्ते कालाचे ठायी मनुष्याने संपत्तीचा मोह मुळीच ठेवू नये असे पालुपद आपल्या कीर्तनात आळवून आणि घोळवून सांगणारा हा कीर्तनकार त्याच्या तबकात कमी पैसे पडले म्हणून आता चिडला होता. थोड्याच वेळापूर्वी सांगितलेले ब्रह्मज्ञान विसरून आता तो पदरातल्या पैशांची मोजदाद करू लागला होता. धर्मनिष्ठ कीर्तनकाराचा मुखवटा आता गळून पडला होता आणि एका सामान्य द्रव्यलोभी, व्यवहारी, हिशोबी माणसाचं दर्शन मला घडत होतं. कीर्तनकाराचा हा ' डबलरोल ' पाहून मला मोठी गंमत वाटली. आपल्या प्रवचनात लोभ, मोह, कनक आणि कामिनी यांच्यावर चौफेर टीका करायची आणि प्रवचन संपले की पैशाचा धूर्तपणाने हिशोब करायचा हा प्रकार जितका मनोरंजक तितकाच चीड आणणारा वाटला. मी पंचवीस पैशांचे नाणे टाकले म्हणून त्याने माझा उपहास करून म्हटले होते, –देवाला पैसे द्यायचे म्हटल्यावर तुमचा हात उचलत नाही. त्याला खवचट उत्तर देण्याची मलाही लहर आली. मी म्हणालो,

' बुवा पैशाचा लोभ किती वाईट हे तुम्हीच आता सांगितलं ना ? तुमच्या ताटात टाकलेले पैसे देवाला कसे पोचतात ? त्याला तुम्ही इथून ड्राफ्ट पाठवता का ? सरळ सांगा ना की कीर्तन-प्रवचन हा माझा धंदा आहे. मी पोटासाठी कीर्तने करतो. कीर्तनातून जे सांगतो त्याचा माझ्या जीवनाशी काही संबंध नाही. देवाचे नाव उगीच कशाला घेता ? '

आता बुवा अधिकच रागावले. ' तुमच्यासारख्या धर्मशून्य माणसापुढे गीता वाचण्याची मी चूक केली– ' असे म्हणून मिळालेले पैसे त्यांनी व्यवस्थितपणे आपल्या उपरण्यात बांधले आणि माझ्याकडे एक रागाचा जळजळीत कटाक्ष टाकून ते निघून गेले.

पैसा हे साऱ्या अनर्थाचे मूळ आहे हे मत मला तरी पूर्णपणे चुकीचे वाटते. खरे तर पैशांच्या बळावर आपल्याला कित्येक सुखे विकत मिळतात. आमचे कीर्तनकार, हरिदास, पुराणिक आणि शास्त्री-पंडित संपत्तीवर इतकी अतिरेकी

विपरीत टीका का करतात तेच कळत नाही. मनुष्याच्या पुरुषार्थाला चालना देणारी संपत्ती ही एक शक्ती नव्हे काय? कोणी काही म्हटले तरी सांसारिक सुखाचे साधन म्हणजे लक्ष्मी. तिची उपासना करण्यासाठी परिश्रमाची पराकाष्ठा करण्यात काय चूक आहे? पण अर्थशास्त्राला अनर्थशास्त्र म्हणण्याची एक फॅशनच आहे. संसार सोडलेल्या साधुसंतांनी लक्ष्मीपासून अलिप्त राहण्यात धन्यता मानावी हे एकवेळ समजण्यासारखं आहे. पण समाजाच्या आणि देशाच्या-व्यक्तीच्या उत्कर्षाला संपत्ती हवीच. देवाचे दर्शनसुद्धा पैशांशिवाय मिळत नाही हा पैशांचा महिमा आहे. काही दिवसांपूर्वी पुरीच्या त्या प्रसिद्ध जगन्नाथ मंदिरात गेलो होतो. देवाच्या मूर्तीसमोर एक पडदा ओढून ठेवला होता. मला पाहताच एका पुजाऱ्याने म्हटले, 'अब भगवान सो रहे हैं, यह विश्राम का समय है। अब दरसन नही होगा.' मी काहीसा नाराजीने मागे फिरलो. तसा तो ढेरपोट्या पुजारी माझ्या मागे आला आणि म्हणाला, 'महानुभाव, यद्यपी जगन्नाथजी सो रहे है, मै उनका दरसन आपको दे सकता हुँ। मगर कुछ...' त्याच्या मुद्रेवर ओशट हास्य चमकले. खिशातून पाच रुपयांची नोट मी बाहेर काढली तेव्हा तो काहीशा मुजोरपणे म्हणाला, 'क्यां इतनेमे जगन्नाथजी दरसन दे सकते है? और एक नोट निकालो महानुभाव.' दहाच्या नोटेची किमया अशी की मूर्तीसमोरील पडदा बाजूला सरकला. देवाची झोप उडवू शकण्याची शक्ती अखेर लक्ष्मीतच आहे. प्रत्यक्षात लक्ष्मी नारायणाचे पाय चेपीत असली तरी नारायणापेक्षा लक्ष्मीलाच अधिक महत्त्व आहे हे नाकारण्यात काय अर्थ आहे? 'जोडोनिया धन उत्तम वेव्हारे' असा संदेश तुकारामानी उगीच दिला नाही. संपत्ती किती मिळवावी आणि कशी मिळवावी याचे तारतम्य नसलेल्या माणसाचा अध:पात होतो. पण तो संपत्तीमुळे झाला असे म्हणणे अगदीच हास्यास्पद आहे. माझ्या ओळखीचे एक श्रीमंत गृहस्थ पैशावर जिवापाड प्रेम करतात. घरदार, शेती, बंगला, मोटार सर्व मिळवून सुद्धा आता वयाच्या ऐंशीव्या वर्षी देखील दोन्ही हातांनी पैसा गोळा करण्याचा हव्यास बाळगून आहेत. पण यात संपत्तीचा काय दोष आहे? संपत्ती माणसाच्या प्रवृत्तिविचाराला आणि पुरुषार्थाला चालना देत असते. श्रमातून आणि घामातून निर्माण होणारा पैसा हा माणसाच्या पुरुषार्थाचा पुरावा आहे.

माझ्या या युक्तिवादाला विरोध करून माझा मित्र म्हणाला, 'पण माणसाच्या

अध:पाताचे कारण बहुतेक वेळा पैसा हेच असते. दारूची नशा काही वेळाने उतरते. पैशाची धुंदी मात्र माणसाला मरेपर्यंत सोबत करते. अरे माणसं पैशासाठीच वेडी होतात. अनेक प्रकारच्या पापांची वाट पैशाच्या मोहातूनच फुटते.' त्याच्या या विधानात काहीसे तथ्य होते पण ते पूर्ण सत्य मात्र नव्हते. पैशांकडे मुळातच पाठ फिरवणे आणि सदैव पैशाच्याच तालावर नाचत राहणे ही दोन अतिरेकी टोके आहेत. ही टाळून सुवर्णमध्य साधता येईल की नाही? आपल्या प्रामाणिक कष्टातून जे मिळेल त्यावर समाधान मानणारा माणूस आज दुर्मिळ झाला आहे. पूर्वीही तो सहज सापडत नव्हता. पण आज मात्र अशा माणसांचा फार दुष्काळ पडला आहे. एका वीस वर्षांच्या कोवळ्या तरुणाने बँकेवर दरोडा घालण्याचा प्रयत्न केला. तिथल्या रखवालदाराला ठार मारून तो नोटा गोळा करू लागला. न्यायालयात त्यानं जबानी दिली,

'मी गरीब स्थितीतला तरुण. मला एकदम श्रीमंत व्हायचं होतं. जगातली सगळी सुखं, सगळ्या मौजा पैशानं आपसुख मिळतात. चोरी करताना मी दुर्दैवाने सापडलो. आता मला तुरुंगात खडी फोडत बसावं लागेल, पण माझा दरोडा राजरोस होता. साळसूदपणानं दरोडे घालणारे कित्येक दरोडेखोर तुम्हाला सापडत तरी नाहीत, किंवा ते माहीत असूनही त्यांना शिक्षा करण्याची तुम्हाला हिंमत नाही.' त्या तरुणाची जबानी ऐकून न्यायाधीश काय म्हणाले हे मला माहीत नाही. पण त्याच्या जीवनात जशी चीड होती :तसेच सत्यही होते. पैशाच्या पायाशी सगळी सुखे लोळण घेऊ शकतात हे मात्र मला कधीच पटणार नाही. पण म्हणून माणसाला वाकवण्याचं आणि त्याला भुईसपाट करण्याचं विनाशक सामर्थ्य पैशात पुरेपूर भरलं आहे हे मात्र मानावं लागेल.

नाण्यांचा झंकार कानावर आला की भली भली माणसं खुळावतात. नाणी खुळखुळल्यावर नर्तकीच्या पायातले पैंजण बोलू लागतात. कामिनीच्या कपोलावर आनंदाची खुलावट होते तर कलावंतिणीच्या डोळ्यांत नवी चमक येते. पैसा मिळतो म्हणून माणसं कोणत्याही बाजारात स्वत:ला विकून घेताना आढळतात. 'तुला तुझं तत्त्व पाहिजे का गडगंज लक्ष्मी पाहिजे?' असा प्रश्न एखाद्या तत्त्वज्ञान्याला विचारला तर तो देखील गडबडून जाईल आणि लक्ष्मीपुढे लांगूलचालन करण्यात आनंद मानील. पैशानं पांडित्य विकत घेता येतं आणि आपल्या दावणीला बिनबोभाट बांधता येतं; म्हणून तर जगातले सत्ताधीश आपल्या पदरी

काही निवडक पंडित 'ठेवून' टाकतात. हे 'ठेवलेले' बुद्धिमंत अन्यायाची तळी इमानीपणे उचलून धरतात. मी मित्राला म्हणालो,

'तू म्हणतोस ते अगदीच खोटं नाही. धर्म आणि नीती यांचे ठेकेदार मानले जाणारे भीष्म आणि द्रोण द्रौपदीच्या निरीला दु:शासनाने हात घातला तेव्हा भर दरबारात डोळे मिटून बसले होते. 'हे पाप तुम्हाला दिसत नाही का?' असं द्रौपदीनं धि:कार करून विचारल्यानंतर ते क्षीण आवाजात म्हणाले, 'अर्थस्य पुरुषो दास:' दुर्योधनाच्या पैशांनी मिंधे बनलेले आचार्य केवळ महाभारत काळातच होते असे नाही. ते आजही आहेत. आणि म्हणूनच आजही द्रौपदीचं राजरोसपणानं वस्त्रहरण चालू आहे. सारी सुखं पैशातूनच मिळतात हे खरं असतं तर जगातले सगळे श्रीमंत एकजात सुखी झाले नसते का? काही भौतिक सुखं विकत मिळतील. पण माणसाला काय केवळ शरीरच असतं? मन, बुद्धी आणि आत्मा यांच्या सुखासाठी रुपया किंवा डॉलर उपयोगी पडेल काय? ही सुखे कोणत्या बाजारपेठेत मिळतील? तुला एक गंमत सांगतो. फाईव्ह स्टार हॉटेलातल्या मऊ कोचावर बसून मद्याचे चषक पोटात रिचवणारा एक लक्ष्मीपुत्र मला वैतागानं म्हणाला, "माझ्याजवळ गजांत लक्ष्मी आहे. त्या लक्ष्मीसाठी माझ्यावर प्रेम करण्याचं नाटक करणारे बरेच मित्र आहेत. मैत्रिणी आहेत. पण केवळ माझ्यावर मात्र कोणाचं प्रेम नाही. इतका पैसा असून मी काही समाधानी झालो नाही. या जगाला मला ओरडून सांगावसं वाटतं की पैशासाठी माणूस नाही. माणसासाठी पैसा आहे."

मद्य पितानाही तो लक्ष्मीपुत्र सुसंगत बोलत होता. शहाणपणाचं तत्त्व सांगत होता. त्याला मद्याचीही नशा चढली नव्हती, आणि श्रीमंतीचीही धुंदी आली नव्हती. पैशाची वास्तविक किंमत किती हे तो ओळखून होता. पण एखाद्या क्षुद्र माणसाला कल्पनेच्या बाहेर एकदम पैसा मिळाला की त्याला मस्ती येते. त्या नशेत तो स्वत:ला परमेश्वर तरी समजतो किंवा पैसा हाच परमेश्वर आहे असे मानायला लागतो. पैशाच्या मोबदल्यात माणुसकी गहाण टाकणारी माणसे आज पैशाला पासरी मिळतात हीच माणसांची शोकांतिका आहे.

## ११

# ' संवाद ' ज्ञानेश्वराशी

हे संत ज्ञानेश्वरा ! सातशे वर्षांपूर्वी चांगदेव नावाच्या एका ज्येष्ठ योग्यानं तुला एक पत्र पाठवलं होतं. पत्र लिहिण्यासाठी त्यानं हातात लेखणी घेतली मात्र, तुला नमस्कार लिहावा की आशीर्वाद लिहावा हेच त्याला कळेना. कारण वयाने तू लहान होतास पण ज्ञानाने मात्र चांगदेवापेक्षा कितीतरी मोठा होतास. अखेर या गोंधळात त्याने तुला एकही अक्षर न लिहिता कोरं पत्र पाठवलं. त्या कोऱ्या पत्रालासुद्धा तू आत्मीयतेनं उत्तर पाठवलंस. मीही आज तुला एक पत्र लिहिणार आहे. नमस्कार आणि आशीर्वाद असल्या उपचारात मला वेळ घालवायचा नाही. आज तुझी पुण्यस्मृती सर्वत्र साजरी होत असताना तुझ्या-सारख्या एका महान संताशी आणि कवीशी थोडासा वादसंवाद करण्याचा आनंद मला घ्यायचा आहे. माझा तो अधिकार नाही. पण तरी देखील तुला पत्र लिहायला मी बैठक मारून बसलो आहे. तुझ्यासारख्या आदरणीय संताला मी ' अहोजाहो 'च्या शिष्ट भाषेत मात्र लिहिणार नाही. प्रिय व्यक्तीलाही औपचारिक आदराच्या कृत्रिम शब्दातून संबोधणं मला मंजूर नाही. ' अरे-कारे 'च्या निःशंक आपुलकीच्या पातळीवर राहून तुझ्याशी बोललो तर तू मुळीच रागावणार नाहीस याची मला खात्री आहे. राग आणि लोभ, घाणेरडा मत्सर आणि हिंस्र द्वेष यांचे दुर्गंधी लेप आमच्या क्षुद्र मनावर चढलेले आहेत. तू खरे तर वीतराग आहेस. द्वेषमत्सराचा तर वारासुद्धा तुझ्या दिशेनं वाहू शकत नाही. अमृताच्या चुळा भरीत

आणि कल्पवेलींच्या फुलांचा सुगंध आपल्या शब्दांत भरून तू आम्हाला आत्मीयतेनं इतकं मोलाचं सांगितलं आहेस की आता तुझ्याशी बोलताना शिष्टमान्य उपचाराची भाषाच माझ्या तोंडी येऊ शकत नाही. ज्ञानदेवा, अरे तुझ्या रूपानं मराठी सारस्वताला एक सुंदर स्वप्न पडलं. महाराष्ट्राच्या संस्कृतीला तुझ्याच रूपानं एक कलावंत शिल्पकार लाभला. तू लिहिलेली प्रत्येक ओवी आमच्या उरात सौंदर्य आणि सामर्थ्याची वेल होऊन रुजावी आणि तिला भावफुलं यावीत आणि आमच्या जीवनाचा मोगरा रसरसून फुलावा ही इच्छा आहे. पण तुला खरं सांगायला हरकत नाही. आम्ही कपाळकरंटे आणि कर्मदरिद्री लोक आहोत. आम्ही तर इथं एकमेकाना ओरबाडून रक्तबंबाळ करण्याच्या महान ऐतिहासिक कार्यात गुरफटून गेलो आहोत. तुझी पुण्यतिथी असली तरी आम्हाला त्याची कदर नाही. आम्ही केवळ कदर करतो आमच्या स्वार्थाची. अशा परिस्थितीत तुला पत्र लिहिताना माझं मन कमालीचं विषण्ण होऊन गेलं आहे. पण तुझ्याशी संवाद करताना मनाला काहीतरी आश्वासन मिळेल म्हणूनच हे साहस आज करणार आहे.

ज्ञानराजा ! एक प्रश्न तुला विचारू ? ' संन्याशाची पोरं ' म्हणून तुझी आणि तुझ्या भावंडांची त्यांवेळच्या ' हितचिंतकांनी ' आणि ' मित्रांनी ' भयानक हेटाळणी केली नाही काय ? तू जिथं जिथं गेलास तिथं तिथं तुझ्याविषयी पद्धतशीर विषारी प्रचार करणारे धर्ममार्तंड, नीतिविशारद हजर होतेच. ' तू अशुद्ध आहेस तुझ्या भावंडांचा जन्म म्हणजे अनीती आहे' असा हंबरडा त्यावेळच्या संस्कृतीच्या ठेकेदारांनी फोडला नव्हता काय ? तू एवढा विचारांचा स्वामी, प्रतिभेचा सम्राट, तत्त्वज्ञानाचा अभ्यासक, माणुसकीचा मेरुमणी पण तुला आणि तुझ्या भावंडांना क्षुद्रात्म्यांनी ' नको हे जीवन ' असा वैताग निश्चितच आणला होता. 'अवघाची संसार सुखाचा करीन, आनंदे भरीन तिन्ही लोक ' अशी प्रतिज्ञा करणारा तुझ्यासारखा आनंदी, आशावादी कलावंत आणि संत वयाच्या अवघ्या एकविसाव्या वर्षी जीवनाच्या फुलत्या वेलीवरून आपल्या आयुष्याचं फूल स्वतःच्या हातांनी का खुडून टाकतो तेच समजत नाही. तुझ्यासारख्या ' ज्ञानेश्वराला ' मानसिक दृष्टया जगणं असह्य आणि अशक्य करून टाकणारे ' अज्ञानेश्वर ' त्या काळात एका अर्थानं यशस्वी झाले असंच म्हटलं पाहिजे. का कुणास ठाऊक, पण तुझ्यानंतर सातशे वर्षांत अजूनही ते दुरिताचं तिमिर निरसून गेलं नाही.

ज्यांच्यावर तू उपकार केलेस, ज्यांच्यासाठी तू आपल्या अमोल आयुष्यातला प्रत्येक क्षण निरपेक्ष भावनेनं दिलास त्यातल्या कित्येकांनी तुझा व्यक्तित्वाची आणि चारित्र्याची हत्या करण्याचा विडाच उचलला होता. ते तुझ्या ज्ञानाचा, तुझ्या कवित्वाचा, तुझ्या संतत्वाचा मनातून सारखा द्वेष करीत होते. रोगट मत्सरानं त्यांचा मेंदू अनेक विकृतींच्या आहारी गेला होता. तुला या लोकांचा कधीच वीट आला नाही म्हणतोस? महापुरुषाच्या पायाशी लीन होण्याचं नाटक करून एखादा वळवळणारा साप जेव्हा त्याला दंश करतो तेव्हा त्या महात्म्याच्या मनाची नेमकी काय स्थिती होते? मला वाटलं तुझ्या हजारो ओव्यांतून आणि शेकडो अभंगांतून निदान एखाद्यातरी ठिकाणी तुझ्या व्याकुळ, निराश मन:स्थितीचं दर्शन घडेल. पण तुझे सारे शब्द तुझ्या मनातल्या अमृताचा आणि अलौकिक शांतीचा स्पर्श घेऊन तुझ्या कवितेतून अपूर्व उत्साहात एका भव्य आनंदयात्रेत सामील झालेले दिसतात. काळजाला झालेली जखम आपल्या तत्त्वज्ञानाच्या मलमपट्टीनं बांधून जगापासून ती झाकून ठेवण्याचं तुझं कौशल्य आम्हाला का साधू नये? आम्ही तर स्वत:ला विद्वान म्हणवून घेतो. इतरांनी आम्हाला ज्ञानवंत म्हणावं अशी तरतूद करून ठेवतो. आमच्या नावामागे आणि पुढं भल्याबुऱ्या मार्गांनी मिळवलेल्या पदव्यांची मिरवणूक काढतो. ती छापून यावी म्हणून मुत्सद्दीपणानं धडपड करीत राहतो. सध्या छापण्याची सोय असल्यामुळं आणि शिव्या देण्याचं अपूर्व सामर्थ्य आम्ही मिळवलेलं असल्यामुळं आमच्या खऱ्याखोट्या यातना आम्ही अक्षरात बांधून ठेवतो. असा देखावा करतो की आमच्यासारखे फक्त आम्हीच! अरे संन्याशाच्या पोरा, तुझा हा निष्पाप, निरामय स्वभाव आम्हा पामरांना कधी आत्मसात करता येईल? उदंड लिहून सुद्धा स्वत:च्या दु:खाविषयी, छळाविषयी अवाक्षरही न लिहिणारा आणि साऱ्या मानवजातीवर आपल्या मायेचा पदर घालणारा तुझ्यासारखा कोवळा पोरगा आठवला म्हणजे आमची मान क्षणभर शरमेनं खाली जाते. ज्ञानेश्वरा, तू महान आहेस हे सांगायला आमच्यासारख्या अतिसामान्य विद्यापीठीय विद्वानाची सर्टिफिकिटं नको आहेत. तुझ्या ज्ञानापेक्षाही तुझी शांत वृत्ती खरोखरच अधिक सुंदर, अधिक तेजस्वी आणि संपन्न आहे. हे सामर्थ्य अंशत: तरी आमच्यात येऊ दे.

हे शांती सागरा! तुझ्या मनात, दृष्टीत, शब्दांत आणि व्यक्तित्वात अलौकिक

शांतीचा रस ओतप्रोत भरलेला असला तरी तू कधीच रागावला नसशील. अस्वस्थ झाला नसशील असं मात्र मला वाटत नाही. तू महामानव असलास तरी अखेर माणूसच होतास. तुझ्या चरित्रातली ती एक नाट्यपूर्ण घटना मला आठवते. दुर्जनांच्या आणि कुटाळांच्या कारवायांना भीक घालण्याइतका तू कधीच लेचापेचा नव्हतास. शांती आणि सहनशीलता हे तुझ्या भात्यातले अमोघ बाण होते. पण काय असेल ते असो. महात्म्यांच्या आयुष्यातही एखादा क्षण असा येऊन जातो की, त्याच्या स्पर्शानं ते अंतर्बाह्य घायाळ होतात. दुराग्रही कर्मठांच्या आणि दुष्टबुद्धी निंदकांच्या कारवायांनी तू त्या क्षणी विलक्षण निराश झालास. खरं तर चंदनालाच सर्पांचा विळखा असतो, हे तुला माहीत नव्हतं अशातला भाग नाही. पण वैफल्याच्या त्या ठिणगीनं तुझ्या थोर अंत:करणाला एक जखम केली. त्या आवेगात आपल्या ताटीचं दार बंद करून समाजाकडं पाठ फिरवून तू बसला होतास. कोणता समाज ? निंदेचं मोहोळ उठवतो तो समाज ? सत्पुरुषांच्या तोंडावर थुंकण्याचा मूर्ख उद्योग करतो तो समाज ? सीतेच्या धवल चारित्र्याचा पंचनामा करण्याचं घाणेरडं धाडस करतो तो समाज ? समाज, समाज म्हणतात तो जर असाच असेल तर असल्या कृतघ्न समाजाचं मी काय देणं लागतो ? कशासाठी मी माझ्या आयुष्याची अशी परवड करून घ्यायची ? हे माझ्या मनाचं आणि ताटीचं दार बंद करून घेतो. ज्ञानदेवा, हीच होती ना तुझ्या हृदयाची असीम वेदना ? पण जित्याची म्हणून काही तरी खोड असतेच ती कशी जाणार ? तूच म्हटलं आहेस ना !

जो खांडावेया घावो घाली
का लावणी जेणे केली ।
दोघां येकिचि साऊली
वृक्ष जैसा ।।

ज्यानं झाडाची लावणी केली. खतपाणी घालून जोपासना केली आणि ज्यानं झाडावर घाव घातले. त्या दोघांनाही ते झाड सावली देत असतं. तू म्हणजे क्षमेचे, उदारतेचे, मन:शांतीचे, अखंड आनंदाचे एक भावसंपन्न झाड आहेस. तुझा मूळ स्वभाव का लोपणार आहे ? तुझ्या धाकट्या बहिणीची प्रार्थना तू ऐकलीस. ती म्हणाली, ' ज्ञानेश्वरा, माझ्यावर दया करा. ही ताटी उघडा. विश्वात

आग पसरली तर संतांच्या मुखातून शीतल पाण्याचा वर्षाव व्हावा. ताटी उघडा ज्ञानेश्वरा ' हे बोल ऐकताच तू दार उघडलंस आपल्या मनाचं. अनंत कृपेचा वर्षाव करून समाज मनात नव्या विचारांची हिरवळ फुलवण्याचा आपल्या अल्प आयुष्यात प्रयत्न केलास. पण तू काही म्हण ज्ञानेश्वरा, अरे इतक्या लवकर समाधी घेऊन जगाला पोरकं करण्याचा अधिकार तुला कोणत्या परमेश्वरानं दिला? ज्यानी ताबडतोब मरावं अशा योग्यतेची असंख्य माणसं या जगात सत्तर ऐंशी वर्षे आपला काळा संसार उजळ माथ्याने निर्लज्जपणाने करीत राहतात. त्यांच्यामुळे सारं वातवरण सडून जातं. तुझ्यासारख्या आनंदवादी कवीनं पंचविशीच्या आत जीवनयात्रा संपवायला नकोच होती. राहून राहून याच विचाराच्या गांधीलमाशा काळजाला डसत राहतात.

हे कवीश्वरा! हे वागीश्वरा! हे शब्दसृष्टीच्या परमेश्वरा! हे कल्पनेच्या कुहरात अक्षरांची लेणी खोदणाऱ्या शिल्पकारा! तत्वविचारांच्या गाभ्यातून नवरसांचे इंद्रधनुष्य निर्माण करणाऱ्या कुशल चित्रकारा! विश्वात्मक देवाला प्रसन्न करण्यासाठी आपल्या प्रतिभेची धवल पौर्णिमा साजरी करणाऱ्या ज्ञानचंद्रा, तू मराठी भाषेला केवढं अपूर्व वरदान देऊन गेलास याची तुला कल्पना आहे का? बहुधा नसावी. तू ओवीमागून ओवी लिहीत गेलास आणि मराठी साहित्याची चंद्रकला चढत वाढत गेली. तू शब्दांनी कधी लिहिलेच नाहीस. अमृताच्या शाईत भिजलेली तुझी लेखणी जणू सौंदर्यवान कुंचलीने अभिनव चित्रे रेखाटीत राहिली. तुझ्या साहित्यामुळे सामर्थ्याची शक्ति वाढली. सौंदर्याचा देखणेपणा दुणावला. प्रकाशाला उज्ज्वलता आली. सुगंधाला एक नवा सुवास प्राप्त झाला. रुचीला अभिरुचीची कळा आली. तुला वाटेल की मी अतिशयोक्ती करतो आहे. पण खरं सांगायचं तर अतिशयोक्तीही इथं अल्पोक्तीच ठरणार आहे. मी तुझ्या तत्त्वज्ञानापेक्षा तुझ्या रससंपन्न कवित्वावर मनापासून प्रेम करतो. सहज मनात असा विचार येतो की, तू हातात लेखणीच धरली नसती तर आज माझी ' माय मराठी ' वनवासातच राहिली असती. मराठी काव्याला आणि भाषेला तुझ्या ओवी अभंगांनी जो सुबक आकार दिला त्याबद्दल आम्ही मराठ्यांनी सदैव तुझ्यासमोर कृतज्ञतेनंच मस्तक वाकवलं पाहिजे.

हे साहित्य श्रीमंतीच्या कुबेरा! अरे तुझी कविता विलक्षण ' लावण्यवती ' आहे. एखादी किशोरी जेव्हा नवतारुण्यात पहिलं पाऊल टाकते. तेव्हा हळूहळू

तिच्या अंगोपांगावर यौवन रूपाची आगळीच नव्हाळी खुलू लागते. ( ही सुद्धा तूच योजलेली प्रतिमा ) तसंच तुझ्या कवितेचं प्रसन्न रूप आहे. मला आश्चर्य वाटतं ते हे की, इतक्या यातनांच्या वणव्यात, लोकनिंदेच्या आचीत होरपळत असतानाही तुझ्या मनातली लालित्याची, कवितेची, रसवैभवाची, भावस्नेहाची वेल इतकी ताजी टवटवीत राहिलीच कशी ? तुझी कविता म्हणजे भावविचारांच्या उत्तुंग लाटांचा कल्लोळ आहे. शब्दांच्या प्याल्यात तू भावनेच्या चांदण्याचा रस ओतून त्यात आपल्या व्यक्तित्वाचं मोहक तारुण्य सहजपणानं मिसळून दिलं आहे. तुझ्या प्रतिभेचा मोगरा असा फुली फुलून आला आहे की, शब्द वाचला की, त्याचा विशिष्ट सुवास हृदयात दरवळायला लागतो. एखादं दृश्य का सुंदर दिसतं ? एखादी वस्तू आपल्याला नेमक्या कोणत्या· गुणांमुळं मोहिनी घालते ? या प्रश्नांची उत्तरं कदाचित तर्कबुद्धीच्या आधारानं देता येतील. पण तुझी कविता रसिकांना सातशे वर्षे का वेढून बसली आहे. तिच्या तारुण्याचं रहस्य काय या प्रश्नाचं मात्र मला उत्तर सापडत नाही. उत्तर शोधण्याचा मी प्रयत्न करीत आहे. शोधण्यातला मला फक्त आनंद घ्यायचा आहे.

चिरंजीव ज्ञानेश्वरा ! कवितेतलं सौंदर्य हे अखेर अंत:करणाच्या थोरपणावरच अवलंबून असतं असं मला वाटायला लागलं आहे. तू साहित्याचं शास्त्र शिकला होतास. पण नामदेव, तुकाराम आणि चोखामेळा काही तुझ्यासारखे साहित्यपंडित नव्हते. पण या कवींचीही कविता महाराष्ट्राच्या मनाला शेकडो वर्षे जीवनाचा रस देत राहिली आहे. म्हणूनच मी म्हणतो की, उदार मनाच्या मातीतच साहित्य सौंदर्याची वेल फोफावते. तू महान माणूस आहेस म्हणूनच तुझ्या काव्याला गगनाची उंची आणि सागराची खोली आहे. तुझं ' पसायदान ' म्हणजे तूच आहेस. सृष्टीतल्या साऱ्या साऱ्या जीवांशी समरस होण्याची प्रगाढ मानव्य शक्ति हीच खऱ्या काव्याची प्रेरणा असते नाही का? तू म्हणालास ' हे विश्वची माझे घर ' आम्हाला आमचं घर हेच विश्व असतं. मग तुझं नि आमचं जमायचं कसं ?

ज्ञानेश्वरा ! तू सात शतकापूर्वी जे सांगितलंस त्यातलं अक्षर न् अक्षर आम्ही डोळे मिटून स्वीकारावं असं तू म्हणणार नाहीस. कारण तू ' ज्ञानेश्वर ' आहेस. काळाच्या ओघात तुझ्या विचाराला कुठं एखादी मर्यादा पडली असेल तर ती आम्ही समजून घेतली पाहिजे. पण तू आणि तुझं जिवंत, रसिक, उदार, माणूस-प्रेमी, निर्मत्सरी, निर्लोभी आणि गगनचुंबी मन आम्हाला हवं आहे. सदैव हवं

आहे. चिरंजीव ज्ञानेश्वरा, एवढयासाठीच हे लहानसं पत्र तुला मोठ्या आस्थेनं, आत्मीयतेनं पाठवलं आहे. तू कोरं पत्रही वाच शकतोस. माझं वेडवाकडं पत्र तुला वाचलंच पाहिजे. 'वेडेवाकुडे गाईन, परि तुझाच म्हणवीन' यापेक्षा अधिक काय सांगू? लोभ आहेच. वृद्धी व्हावी. आज तुझी पुण्यतिथी आहे, याची मला आठवण असल्यामुळंच तुला हे पत्र लिहिलं. आता माझं अस्वस्थ मन थोडं शांत झालं. तुझ्या सुरात जरी मला म्हणता आलं नाही तरी तुझ्या रुचिर, प्रभावी शब्दांत मीही म्हणतो.

जो जे वांछील तो ते लाहो । प्राणिजात ।।

# १२

# कविता आणि कोंबडीचे अंडे

स्वत:ला कवी समजणाऱ्या एका गद्यलेखकाची परवा भल्या सकाळी भेट झाली. सकाळच्या प्रहरीच हा ' शुभशकुन ' घडावा याचं मला आश्चर्य वाटलं. या कवीच्या काव्याबद्दल जरी मला फारसा आदर नसला तरी हा माझा एक चांगला मित्र होता. त्याच्याशी बोलताना, त्याला चिमटे काढताना आणि त्याच्या तथाकथित कवितेची टर उडवताना मला का कुणास ठाऊक बरं वाटायचं. खरं तर असल्या कुचाळक्या करण्यात आनंद मानू नये. तसा माझा स्वभावही नाही. पण या कवीची चेष्टामस्करी केल्याशिवाय मला राहवत नसे. माझा कविमित्रही खेळाडूपणानं माझी बोचरी टीकाटिप्पणी सहन करायचा. मी त्याला विचारलं,

' कसं काय कालिदास महाशय ! अलीकडं काही नवी प्रसूति ? तुमच्या नव्या अपत्याबद्दल गेल्या चार-पाच दिवसात काही ऐकायला मिळालं नाही. त्यामुळे कसं बेचैन वाटतंय. बसल्या बैठकीला डझन दोन डझन कविता लिहिण्याचा तुमचा लौकिक आहे. ऐकवा ना एखादी बऱ्यापैकी कविता ' माझ्या शब्दांतला उपरोध त्याला टोचत होता. पण हा कवी मुकाट्यानं हसतमुखानं ऐकत होता. माझ्या पाठीवर थाप मारून तो म्हणाला, ' आज सकाळीच तुझ्या तावडीत सापडलो. तुझ्या टीकेच्या वस्तऱ्याला तर नेहमीच धार असते. करा आमची बिनपाण्यानं.' ' आलीया भोगासी असावे सादर ' असे आमचे ज्येष्ठ बंधू तुकाराम म्हणतात. निंदकाचं घर शेजारी असावं असंही त्यांनी म्हटलं आहे.'

कवि महाशयांनी पिशवीतून एक पुस्तिका बाहेर काढून माझ्या हाती दिली. त्यांचा नवा काव्यसंग्रह होता तो. ' स्वप्नराणी ' असं मधुर गोंडस नाव दिलं होतं. मी त्याचं अभिनंदन करून म्हणालो,

' नुसत्या नावावरून तुझ्या काव्याला नावं ठेवण्यात काही अर्थ नाही. पण यात कोणत्या प्रकारचा मालमसाला तू भरला आहेस याची मात्र मी कल्पना करू शकतो. तुझ्या ' स्वप्नराणी'ला माझा विरोध नाही. प्रत्येकाच्या स्वप्नांची एखादी राणी असते आणि असावी. पण या दुबळ्या आणि किरट्या स्वप्नांच्या पलीकडं तू का जाऊ शकत नाहीस याची मला खंत आहे. झाडांची सारी पानं गळून पडली. उन्हाची तिरीप असह्य झाली तरी वेड्या पाखरानं भानावर न येता आपल्याच सामान्य स्वप्नात गुरफटून जावं तशी मला तुझी ही कविता वाटते. वास्तवाला सामोरे जाण्याची शक्ती नसलेली निष्क्रिय, रोगट प्रवृत्ती केवळ स्वप्नाचं स्तोम माजवीत असते. तुमच्यासारखे कवी आजच्या जगाला काय प्रेरणा देणार ? '

माझा हल्ला त्याला निर्दयपणाचा वाटला असावा. त्याच्या मुद्रेवरचा भावच सांगत होता. काहीशी तुटकपणानं तो म्हणाला,

' कुणाला प्रेरणा देण्यासाठी मी लिहीत नाही. मला जगाशी काय करायचंय ? मी फक्त माझ्या समाधानासाठी लिहितो. प्रेरणा वगैरे देणं हे पुढाऱ्यांचं काम आहे. नव्हे तो त्यांचा जन्मसिद्ध हक्कच आहे. आम्ही आपले शब्द जुळवणारे कवी आहोत आमच्या आनंदात आणि मस्तीत आम्ही मस्त आहोत. जगाचे बंध कोणाला ? जगाला बांधला त्याला. जगाची आणि तुमच्यासारख्या टीकाकारांची आम्हाला पर्वा नाही. खरा कवी हा स्वतंत्र असतो.' कवी आवेशानं बोलत होता. पण त्याचा युक्तिवाद मात्र अगदीच पोकळ होता. ' मी फक्त माझ्यासाठी लिहितो ' असं म्हणणारा लेखक आणि कवी पुस्तक छापलं जावं म्हणून अनेक प्रकारच्या लटपटी का करीत असतो ? टीकाकारांच्या अनुकूल अभिप्रायासाठी तो तळमळत असतो. मधून मधून त्यांना चहा पाजून आपलं काव्य इतर कवीपेक्षा अगदी महाकवीपेक्षाही कसं आगळं आणि अलौकिक आहे हे पटवून देण्याची व्यावहारिक धडपड करतो. इतरांच्या कविता उसन्या किंवा उष्ट्या कशा आहेत पण आपल्या काव्यातल्या प्रतिमा मात्र किती अभिनव आणि स्वतंत्र आहेत यावर भाष्य करीत राहतो. कुणी प्रतिकूल मत व्यक्त केलं की बिचाऱ्याला रात्री झोपही येत नाही त्याचं मन फारच कोवळं असतं ना ! स्वतःला मिल्टनचा बाप समज-

णारा एक ' कविश्रेष्ठ ' एकदा जॉर्ज बर्नार्ड शॉकडे काव्य वाचून दाखवण्यासाठी गेला. तो शॉला म्हणाला,

' तुम्हाला माझं एक महान काव्य वाचून दाखवतो. भव्य प्रतिभेच्या काही अतिदिव्य क्षणांचा मी त्यात आविष्कार केला आहे. तुमचा अभिप्राय मात्र मला मिळाला पाहिजे ' त्यानं काव्य वाचायला सुरुवात केली. शॉनं डोळे मिटून घेतले थोड्या वेळानं त्यानं घोरायलाही सुरुवात केली. काव्य ऐकवताना मध्येच कवीनं वर पाहिलं. त्यानं शॉला काहीशा रागानं हलवून जागं केलं आणि विचारलं,

' काय झोप घेत होता काय ? ' शॉ म्हणाला, ' तसा समज करून घेऊ नका. मी तुमच्या काव्यावर माझा अभिप्राय देत होतो.' इतका मार्मिक अभिप्राय दुसऱ्या कोणत्याही टीकाकाराने त्या कवीला दिला नसेल. कवींची ही एक सनातन तक्रार आहे की, कवितेचा सुंदर प्रवाह अखंड वाहात राहिला आहे पण रसिकांची परंपरा मात्र केव्हाच खंडित होऊन गेली. आम्ही काव्यरसाचे प्याले वाचकांच्या हाती भरभरून देतो पण या करंट्यांच्या ठायी रसिकता मात्र नाही. हे मत अर्थातच अतिरंजित आहे. हजारो वाचकांच्या अंत:करणात सहज प्रवेश करून तिथं आपले सूर पेरणारी आणि वाचकांना बेभान करणारी काव्यवाणी अलीकडच्या काळात कितीशी निर्माण झाली आहे ? कवितेच्या पदन्यासातून माणसाच्या मनात वाजणाऱ्या अनेक जिवंत भावनांच्या घुंगुरांचा उत्कट आवाज जाणवला पाहिजे. असली वेडावून टाकणारी कविता सध्या आम्हाला कितीशी वाचायला मिळते ? आमचे बरेचसे कवि आपल्या घरट्यातून अजून बाहेरच पडलेले नाहीत. ' स्वप्नातल्या राणी 'बरोबर काल्पनिक प्रणयचाळे करण्यात गुंतून पडलेल्या या कवींना, पाणवठ्यावर, सार्वजनिक नळावर अजूनही अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या स्त्रीला पाणी भरता येत नाही. या वास्तवतेचं दर्शन घडत नाही याला काय म्हणावं ? माझ्या या प्रश्नावर कुणीतरी ' रोमॅण्टिक ' कवि उपहासाने हसेल याची मला जाणीव आहे. तो मला ठसक्यात विचारील.

' या घटनेचा आमच्या काव्याशी काय संबंध आहे ? ही एक सामाजिक समस्या आहे. अस्पृश्यांना अजून पाणवठे खुले झाले नाहीत याचं खापर तुम्ही आमच्या डोक्यावर फोडणार आहात काय ? अगदी अजब आहे तुमचा तर्कवाद. उद्या औषधावाचून तडफडणाऱ्या गरीब रोग्यांचंही उदाहरण घेऊन तुम्ही आम्हाला विचाराल की या वास्तवाचं दर्शन तुम्हाला का घडत नाही ? काव्याशी या

प्रसंगांचा संबंध लावण्याचा प्रयत्न म्हणजे, एक रुपयाला दोन संत्री मिळतात, तर माझं वय किती हे सांगा असलं गणित घालण्यासारखं नव्हे काय ? ' वरवर पाहिलं तर हे प्रतिपादन तर्कशुद्ध वाटेलही. पण ते फसवं आहे. काव्यातून आणि साहित्यातून समाजाच्या व्यथा, वेदना प्रकट व्हाव्यात ही खरे तर अपेक्षा असते. काव्य एका किनाऱ्यावर थबकून उभं आहे आणि जीवन मात्र पैलतीरावर असली ही स्थिती नाही काय ? भाकरीच्या तुकड्यासाठी अश्रू गाळीत असलेला अगतिक झालेला समाज जगण्यासाठी लाचारी पत्करताना दिसतो. पण आमच्या कवितांत मात्र अजूनही गुलाब फुलत राहिले आहेत. चंद्र कधी मावळत नाही. प्रणयिनीच्या ओठांवरच्या अमृताची गोडी कधीच ओसरत नाही. खरं तर आजच्या बहुसंख्य प्रणयिनींच्या डोळ्यांतल्या अश्रूंनी हे अमृत खारट झालेलं आहे. तुमच्या काव्यात दैनंदिन जीवनातले हे क्षार उतरलेत का ? कुठली कोण ' स्वप्नराणी ' आणली आहे ? ही तरी तुम्हांला प्रत्यक्षात कधी भेटली ? ती भेटली असती तर निष्कारण कविता करण्यात तुम्ही आपला मौलिक वेळ दवडला असता काय हा प्रश्नच आहे. प्रत्यक्ष जीविताकडं, त्यातल्या ज्वलंत प्रश्नांकडे खुशाल पाठ फिरवायची आणि आपल्या साहित्यात मात्र सौंदर्याची, प्रेमाची केवळ आतषबाजी करायची ही मला तरी आत्मवंचना वाटते. समाजाला या प्रकारच्या पलायनवादी साहित्याबद्दल काय आत्मीयता वाटणार आहे ?

कवि-महाशय आता माझ्यावर चांगलेच चिडले होते. ते म्हणाले, ' तुझी टीका नेहमीच अन्यायी, तर्कदुष्ट असते. कविता म्हणजे सामाजिक प्रश्नांची साधकबाधक चर्चा करणारा प्रबंध नव्हे. कवितेपासून कशाची अपेक्षा करावी याची साधी अक्कलही तुम्हा ' समाज समाज ' म्हणून रडणाऱ्या टीकाकारांना नाही याचं मला फार दु:ख होतं. गुलाबाच्या झाडाला बोरं का लागत नाहीत म्हणून तुम्ही टीका कराल. कारण फुलांपेक्षा बोरं अधिक समाजोपयोगी असतात ना ! उठल्या सुटल्या समाज, दारिद्र्य, अश्रू आणि दु:खं, विषमता अन् अस्पृश्यता असल्या शब्दांत तू काहीतरी व्याख्यानं देत बसतोस. आमची कविता अशा क्षुद्र गोष्टीत कधी रमणार नाही. आम्ही फक्त कलेचं सौंदर्य मानतो. कलावंताचं जग वेगळंच असतं. कल्पनेच्या अस्मानात भराऱ्या मारणाऱ्या काव्य चंडोलांनी चंद्रचांदण्यांकडं दृष्टी टाकावी. झोपडपट्टीतून निघणाऱ्या धुराशी आणि तिथल्या कलकलाटाशी कलावंतांनी संबंध ठेवायचा नसतो. माझा ' स्वप्नराणी '

हा संग्रह तू वाचून तर पहा. त्यातील एकेक कल्पना तुला बेहोष केल्याशिवाय राहाणार नाही. उदाहरणार्थ या ओळी ऐक.

तुझ्या आरक्त गालांच्या चषकातून
ओघळलेल्या
धुंद यौवनाचे काही थेंब...
मला देतात एक मदिर आमंत्रण
पण ते पाहूनच झालोय मी बेहोष.
आमंत्रण स्वीकारणं शक्य नाही मला.

काय टीकाकार महाराज, कशी वाटली ही कल्पना? झालास की नाही खलास! अरे वेड्या, कविता हा मुळी मादक कल्पनांच्या आणि शब्दाच्या धुंद रसायनानं भरलेला एक मद्यकलश असतो.'

या 'धुंद' झालेल्या कवीला आता वाङ्मयीन किंवा काव्यमय शब्दांतून सांगण्याचा वेडेपणा करण्यात अर्थ नव्हता. तो धड कलावादीही नव्हता की त्याला जीवनवादही कळत नव्हता. तो केवळ स्वतःच्या 'तुटक्या' कवित्वावर निहायत खूष असलेला एक समाजविन्मुख वृत्तीचा, शब्द जुळवीत बसलेला आणि भंपक कल्पना चघळण्यात 'रस' घेणारा अतिसामान्य कवी होता. असले लोक पाहिले म्हणजे रोम शहर ज्वाळांनी धडाडून पेटले तरी त्या ज्वाळांकडे पाहत नेरो आपली सारंगी उत्साहाने वाजवीत होता या गोष्टीवर विश्वास बसायला लागतो. मी त्या कवीला म्हणालो,

'महाकवी, अस्मानातून एकदा जमिनीवर उतरा, नाही तर तुमचे गाल आरक्त करावे लागतील. म्हणे आम्हा कलावंतांचं जगच वेगळं असतं. समजता काय स्वतःला? एक दिवस घरच्या चुलीतून धूर निघाला नाही म्हणजे 'गालाच्या चषकातून सांडणारी शराब' तुम्ही पार विसरून जाल. अस्सल कविता ही जीवनाच्या कोंबापासून फुटून येते. तिच्या डोळ्यांत माणुसकीची ज्योत तेवत असते. त्या माणुसकीतूनच कलेचं सौंदर्य जन्माला येतं. नुसत्या तरण्याताठ्या पोरीच्या नाकावर आणि हनुवटीवर आचरट कल्पना करून काही बाष्कळ शब्द उधळले म्हणजे ती कविता होते हा तुम्हा मंडळीचा एक बेवकूफ समज आहे. तू राहतोस त्याच्याच शेजारी घाम गाळणाऱ्या गरिबांची आणि परंपरेने ज्यांना

अस्पृश्य मानून छळले त्या कष्टकऱ्यांची लांबच लांब पसरलेली झोपडपट्टी आहे. 'स्वप्नातल्या राणी 'ला आपल्या शब्दांनी ओवाळताना शेकडो कंगाल स्त्रिया आपल्या ठेंगण्या गलिच्छ झोपडीच्या अंधारात दोन वेळचे घास मिळत नाहीत म्हणून वर्षानुवर्षे नशिबाला दोष देत बसल्या आहेत. त्या कधी दिसल्या का? आकाशातला चंद्र आणि चांदण्या तुला दिसतात. गालावर खुललेली हास्याची मदिरा तुला निमंत्रण देते. पण सुरकतलेल्या गालावर सांडणारे मायबहिणीचे अश्रू मात्र तुम्हाला कधी दिसले नाहीत. जे जवळ जळत आहे त्याचं दर्शन आणि चित्रण तुमच्या कवितेत नाही. ऐदी, सुखासीन, वेडपट कल्पनांच्या लेबलात गुंडाळलेली तुमची खत्रूड कविता या जगाशी कसलाच 'संवाद' करू शकत नाही. ती फार तर एखाद्या रंगीबेरंगी कव्हराच्या सुबक पुस्तकात बंदिस्त होऊन राहील. विचारतो कोण तिला? याच शहरात जातीय दंगलीची आग भडकली होती. माणसांचं रक्त पाण्यासारखं वाहिलं. बायकांची अब्रू लुटणारे हात माणुस-कीवरच तुटून पडत आहेत. पण असल्या सुखदु:खांचा ओझरताही वास तुमच्या कवितेला येत नसेल तर तिला मी तरी साहित्य म्हणणार नाही. ऐकायची आहे तुला अस्सल कविता? अस्पृश्यतेच्या आगीत तडफडणाऱ्या मनाचं हे पाहा आक्रंदन—

'आमच्या पवित्र पुरातन परंपरेने
पेटवलेल्या या निखाऱ्यावरून
चालताना नागड्या उघड्या पायांनी—
शेकडो वर्षांची अनुभवतोय आग-आग!
शास्त्रपुराणातल्या धार्मिक शब्दांनी
आमच्या आयुष्याची चिता भडकावली
आम्ही जळतो रोज पावलोपावली
पण जळत नाही आमची अस्पृश्यता'

बोला कविवर्य! या कवितेचा चटका बसतो ना अंत:करणाला? या कवि-तेला वास येतो अस्पृश्यांच्या जळालेल्या हृदयाचा. इथं स्वप्नं बिप्नं पिकत नाहीत. 'आम्ही आपल्या अश्रूंतून जे शिकतो तेच आमच्या गीतांत आम्ही ओततो' असं हा कवी म्हणतो. आयुष्याची किंमत मोजल्याशिवाय कविता विकत

मिळत नाही. '

माझ्या या बोलण्याचा अपेक्षित परिणाम झाला. तो म्हणजे आमचे कविमित्र भलतेच रागावले. मला म्हणाले,

' कवितेवर बोलायला तुम्हाला काय अधिकार ? तुम्ही कधी एखादी कविता केली आहे का ? कवितेतलं तुम्हाला काय कळणार आहे ? स्वत: कविता करा म्हणजे तुम्हाला कळेल.' मी त्याला म्हणालो, ' तुला डॉ. केतकरांची एक गोष्ट सांगतो. एकदा सकाळीच एक तुझ्यासारखा कवी केतकरांकडे आपली कविता घेऊन गेला. केतकर न्याहारी करीत होते. ते म्हणाले, ' वाचून दाखवा ' त्याने आपली कविता वाचून दाखवली आणि अत्यंत आशेनं पृच्छा केली, ' कशी काय वाटली कविता आपल्याला ? ' डॉ. केतकर हसून म्हणाले, ' पहिल्या प्रतीची गचाळ कविता आहे तुमची. अगदीच निरर्थक. असल्या कविता लिहून स्वत:चं आयुष्य फुकट कशाला दवडता ? ' त्या बिचाऱ्या उत्साही कवीचा अत्यंत विरस झाला. आपली कविता गचाळ आहे हा अभिप्राय त्याला रुचला नाही. तो रागाने उसळून म्हणाला, ' तुम्हाला कवितेतलं काय कळणार ? तुम्ही फार तर ज्ञानकोश तयार करावेत. कवितेतलं तुम्हाला कळणं शक्य नाही. कारण तुम्हाला कुठं कविता करता येते ? '

डॉ. केतकर शांतपणानं म्हणाले, ' हे पहा, मी न्याहारी करीत आहे. माझ्या बशीत उकडलेलं अंडं आहे. हे अंडं काही मी घातलं नाही. ते कोंबडीनंच घातलं आहे. पण अंडी घालणाऱ्या कोंबडीला जेवढी अंड्याची रुची कळत नाही तेवढी ती मला कळते. तुमची कविता भिकार आहे हे समजायला मी कविता करण्याचं काहीच कारण नाही समजलं ? या आता ! ' बिचारा कवी ! आणि बिचारी कविता !

## १३

# शेपटी हलविण्याची विद्या

सर्व विद्यांत अध्यात्मविद्या श्रेष्ठ असं एका अध्यात्मप्रिय तत्ववेत्त्यानं म्हटलं आहे. परमार्थाच्या मागे लागलेल्या लोकांना हा विचार मान्य होईल यात शंका नाही. पण व्यवहारवादी मनुष्य म्हणेल, ' अध्यात्माच्या विद्येनं काही पोट भरत नाही. जी पैसे मिळवून देते ती खरी विद्या. तुमचं हे अध्यात्म घेऊन आम्हाला काय करायचं ? ' त्याचं हे म्हणणं बरोबरच आहे. पैसा मिळाला पाहिजे. सत्ता आणि एखादं प्रतिष्ठेचं आसन मिळायला हवं. गाडीतून हिंडता आलं पाहिजे. पण हे सारं कसं मिळणार ? अध्यात्माच्या मार्गानं माणूस गेला तर फार तर शेवटी त्याला विमानातून सदेह वैकुंठाला जाता येईल. किंवा समाधी घेऊन मुक्त होता येईल. पण ' याचि देही, याचि डोळां ' विमानातून परदेश पर्यटन घडवून आणण्याची शक्ती या अध्यात्मात आहे काय ? पुरे झालं हे अध्यात्माचं खूळ ! तो व्यवहार-वादी पुढे म्हणेल, ' तुम्हाला जीवनात यशस्वी व्हायचं असेल तर जगातली सर्वांत श्रेष्ठ विद्या तुम्ही आत्मसात केलीच पाहिजे. अहो, भले भले लोक याच विद्येच्या किमयेनं तरून गेले. ही अलौकिक विद्या कोणती असं विचाराल तर त्याचं उत्तर ' शेपूट हलवण्याची विद्या ! '

माझ्या एका अतिव्यवहारकुशल मित्रानं या विद्येच्या माहात्म्याबद्दल एकदा मला तासभर सुनावलं. अनेक उदाहरणं घेऊन त्यानं आपलं प्रवचन चांगलंच रंगवलं. या विद्येत प्रवीण असलेल्या लोकांची एक लांबलचक नामावली त्यानं माझ्यापुढं

ठेवली आणि आपल्या भाषणाचा समारोप करताना तो म्हणाला, ' भल्या गृहस्था शेपूट हलवण्याची ही अजब विद्या ज्याला कधी जमलीच नाही तो केवढाही बुद्धिमान असला, कितीही कर्तबगार असला तरी त्याला जीवनात रखडत राहावं लागतं. पण ज्याला आपली शेपटी कुठं आणि कशी आणि कितपत हलवावी हे समजतं त्याच्या घरी भाग्य चालत येतं. तुला कल्पना नाही. मंत्र्यासमोर, सत्ताधाऱ्यांसमोर मोठ्या कौशल्यानं आपली शेपटी हलवता आली पाहिजे. इतकंच नव्हे तर जरूर तिथं शेपटी घालताही आली पाहिजे. कित्येक मुख्यमंत्री आठवड्यातून चार पाच वेळा दिल्लीची वारी कशाला करतात? पंतप्रधानांसमोर आपल्या इमानीपणाचं प्रदर्शन केलं की यांच्या बुडाखालची खुर्ची सुरक्षित राहते. खुर्ची हा केंद्रबिंदू असतो. तिच्याभोवती सारे शेपटी बहाद्दर प्रदक्षिणा घालण्यात धन्यता मानतात. म्हणून तुला सांगतो मित्रा ! शेपूट असणं आणि ते हलवता येणं ही आजच्या जगातली एक आवश्यक कला आहे. वरिष्ठांच्या रटाळ विनोदालासुद्धा कसं तोंडभरून हसावं, साहेबाच्या बंगल्यावर मधून मधून कशी चक्कर मारावी, साहेब प्रवासाला निघाले की त्यांना ' टा-टा ' करण्यासाठी स्टेशनवर कसं कटाक्षानं हजर व्हावं, साहेबांच्या आणि आपल्या मैत्रीचं (?) कसं जाहीर प्रदर्शन करावं इत्यादी आवश्यक तपशिलासह ही विद्या शिकवण्यासाठी एखादी शिक्षणसंस्था ' जाणकारांनी ' काढली पाहिजे.'

माझ्या मित्रानं या प्रवृत्तीचे वाभाडे आपल्या उपरोधिक भाषणानं चांगलेच काढले. पण उच्च पदावर जाणारी माणसे लांगूलचालनामुळे यशस्वी होतात हे विधान मात्र मला सयुक्तिक वाटले नाही. ते अतिरंजित होते. प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देत कित्येकांनी चिवटपणानं वाटचाल करून आपल्या कर्तृत्वानं महत्त्वाची स्थानं मिळवल्याची उदाहरणं मला माहीत आहेत. तसं मी म्हटल्यावर तो म्हणाला,

' पण ही अपवादात्मक माणसं आहेत. भांगेत सापडणाऱ्या तुळशीसारखी. या दुर्मिळ झालेल्या लोकांबद्दल मला काही बोलायचं नाही. ताठ मानेनं जगणारी आणि कुणासमोरही हुजरेगिरी न करणारी माणसं कधी दृष्टीला पडली की त्यांच्या समोर नतमस्तक व्हावं असं वाटतं. पण सध्या साऱ्याच क्षेत्रांत लाचारांचा, चमच्यांचा जो प्रचंड ' क्यू ' लागला आहे तो पाहिला म्हणजे मन उदास होतं.'

माझ्या माहितीचे एक प्राचार्य आहेत. कर्तृत्व म्हणाल तर शून्य ! पण शेपटी हलवण्याचं जबरदस्त सामर्थ्य ! त्या निसर्गदत्त दैवी गुणाच्या बळावर–प्राचार्यांच्या

खुर्चीवर ते जाऊन बसले. आता इतरांनीही आपल्या समोर लांगूल-चालन करावं अशी त्यांची अपेक्षा. तसे काही ' निष्ठावंत ' अनुयायी त्यांना भेटले. पण एका स्वाभिमानी प्राध्यापकानं एकदा त्यांना हडसून खडसून सांगितलं, ' प्रिन्सिपल साहेब, बोलण्याचा प्रसंग आणलात म्हणून बोलतो. संस्थेच्या अध्यक्षाच्या घरी भाजी तत्परतेनं आणून देण्याच्या योग्यतेपलीकडं तुमच्यात काय विशेष आहे ? मला माझ्या विषयातलं काही सांगण्याचा शहाणपणा कृपा करून करू नका. माझं कर्तव्य काय ते मला कळतं. प्राचार्यांच्या आसनावर तुमच्या ' आगंतुक ' गुणांमुळं तुम्हाला जागा मिळाली ती फक्त सांभाळा. तुमच्या भक्तमंडळात मी नाही म्हणून माझ्यावर अन्याय करू लागलात तर क्षणार्धात तुमच्या तोंडावर राजीनामा फेकून निघून जाईन. नोकरीपेक्षा मला माझा स्वाभिमान जपण अधिक महत्त्वाचं वाटतं. ' या प्राचार्य महाशयांना असं काही ऐकायला मिळेल याची कल्पनाच नव्हती. स्वाभिमानी माणसाचं आणि बाणेदारपणाचं दर्शन त्यांना कधी घडलंच नव्हतं. त्यांचं जग लाचारीच्या कुंपणातच कोंडून पडलं होतं. लोचट हास्यापेक्षा स्वाभिमानी राग अधिक सुंदर असतो, हे त्यांना कधी कळलं नव्हतं. माणसानं आपल्या मनाचा, मनगटाचा आणि मेंदूचा वापर करून निर्धारानं, निर्भयतेनं जगावं या तत्त्वाची त्यांना कधीच ओळख झाली नाही. ते फक्त शेपटी हलवून जगत होते. शेपटीनंच त्यांना यशस्वी केलं होतं. ही शेपटी हेच त्यांच्या कर्तृत्वाचं आणि उत्कर्षांचं आदिपीठ होतं. हत्ती होऊन अंकुशाचा मार सहन करण्यापेक्षा मुंगी होऊन साखर खावी हे त्याचं समंजस मत होतं. लौकिक व्यवहारात अशा वृत्तीचे लोक बहुधा यशस्वी होतात. त्यांना कसलाच रंग नसतो. कोणताच वास नसतो. स्वतःचं स्वतंत्र असं त्यांना काही मतही नसतं, त्यामुळं हे महाभाग कुठेही चालू शकतात. असल्या मचूळ माणसांच्या जीवनविषयक कल्पना साचेबंद असतात. आपल्या मळलेल्या वाटेनं इमानीपणानं हे चालत असतात.

या शेपटी हलवणाऱ्या लोकांचा मी उपहास केला खरा. पण जगात हे लोक आपलं उद्दिष्ट लवकर गाठू शकतात. समाधानात राहू शकतात. असं का व्हावं ? यांची सुखाची मोजमापं सामान्य असतात. क्षुद्र असतात. आपल्या ठिकाणी फारसं कर्तृत्व नाही याचीही जाण बहुधा यांना असते. जे काही आपल्याला मिळवायचं आहे ते कुणापुढं तरी लोटांगण घातल्याशिवाय पदरात पडणार नाही

हे त्यांना समजलेलं असतं. कर्तृत्व नसलेल्या माणसानं लाचारीचा रस्ता चोखाळू नये तर मग काय करावं ? या बाबतीत समाजमनही काही अंशी जबाबदार आहे असं मला वाटतं. ते सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा यांच्याभोवतीच पिंगा घालीत असतं. एखाद्या लहानमोठ्या पदावर असलेल्या पदाधिकाऱ्यालाच समाजात प्रतिष्ठा मिळते. काय असेल ते असो, शेकडो वर्षांपासून समाजानं सत्ताधाऱ्यांना आणि श्रीमंतांनाच प्रतिष्ठेच्या देव्हाऱ्यात नेऊन बसवलं आहे. हे दिसत असताना संपत्ती आणि अधिकार मिळवण्याचे सवंग उपाय स्वार्थसाधू लोकांनी शोधले तर त्यात आश्चर्य नाही. ज्ञानवंताला सर्वत्र मान मिळतो अशा अर्थाचं एक सुभाषित आहे. पण ज्ञानवंताला ओळखण्याचीसुद्धा अक्कल नसलेले बहुसंख्य लोक सत्ता असलेल्यासमोर कसे आणि किती वाकतात हे पाहण्यासारखं आहे. ' विद्वान् सर्वत्र पूज्यते ' हे सुभाषित लिहिणारा मनुष्य विद्वान असेल, म्हणूनच त्यानं स्वतःच्या बाजूनं पोकळ गौरवानं लिहिलं आहे. असं सांगतात की, एक शिकारी सिंहाच्या छातीत भाला भोसकीत असल्याचं चित्र चित्रकारानं रेखाटलं. ते चित्र पाहून एक सिंह म्हणाला, ' हे चित्र पक्षपाती वृत्तीनं रंगवलं आहे. मी चित्रकार असतो तर त्या शिकाऱ्याला सिंह फाडून खात आहे असं रेखाटन केलं असतं. ' ' विद्वान सर्वत्र पूज्यते ' या सुभाषिताची अवस्थाही अशीच झालेली दिसते. एम. ए. पीएच.डी. झालेल्या एका गृहस्थाला दोन इयत्ता शिकलेल्या एका आमदाराचं सर्टिफिकेट घ्यावं लागलं. आमदारमहाशयांनी मराठी भाषेचे अनेक खून पाडीत या भावी प्राध्यापकाला प्रशस्तिपत्र दिले होते. त्या पत्राच्या बळावरच सदर विद्वानाला नोकरी मिळाली. त्याची वास्तविक योग्यता किती आहे याची चौकशी करण्याची जरूर शिक्षण-संस्थेच्या अध्यक्षाला वाटली नाही. कारण ज्याचं सर्टिफिकेट आणलं होतं ते जुने जाणते आमदार होते. दारुविक्रीची दुकाने चालवून त्यांनी गडगंज पैसा मिळवला होता. गावातल्या साहित्यपरिषदेचे सुद्धा ते सूत्रधार होते. आणि एका नामवंत लेखकाच्या ग्रंथाचं प्रकाशन त्यांच्याच शुभहस्ते झालं होतं. त्या लेखकाला आमदारांच्या हातून पारितोषिक दिलं. समाज हे सर्व मान्य करतो. सत्तेच्या पदावर कुणीही असला तरी समाज त्याचा अनुनय करीत राहातो.

समाजावर मी केलेली टीका माझ्या मित्रानं काही अंशी मान्य केली. पण त्यानं एक मुद्दा उपस्थित केला. तो म्हणाला, ' विद्वान समजली जाणारी आणि खरोखरच तशी असणारी कित्येक चांगली माणसं अधिकाऱ्यांसमोर अक्षरशः

हात जोडून लाचारपणानं उभी राहिलेली मी पाहिली आहेत. महाराष्ट्रातला एक मान्यवर लेखक एका अतिसामान्य उपमंत्र्यांच्या ऑफिसात आशाळभूत चेहऱ्यानं अर्धा तास उभा होता. तो उपमंत्री त्या लेखकाची दखलही घेत नव्हता. अर्ध्या तासानंतर मंत्रिमहाशयांनी ढोंगी विनयानं म्हटलं, ' माफ करा ' आपल्याला थांबावं लागलं. ' त्यानंतर मंत्र्याशी बोलताना प्रत्येक वाक्याची सुरुवात आणि शेवट तो लेखक ' साहेब... साहेब ' या शब्दांनी करीत होता. या ' साहेब ' प्रकरणाचा मला अगदी वीट आला. पण सदर विद्वान लेखक काही दिवसांतच एकदोन सरकारी कमिट्यांचे सदस्य झाल्याची वार्ता मी वर्तमानपत्रात वाचली. म्हटलं, ' चला ! आता त्यांचं घोडं गंगेत न्हालं एकदाचं ! यासाठी तर हा सारा अट्टाहास होता.'

पावलोपावली वाकण्याची ही वृत्ती मिळमिळीतपणाची असली तरी ती टिकाव धरण्याच्या दृष्टीने फायदेशीर दिसते. ' महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळे वाचती,' असं तुकारामानं म्हटलं आहे. पाण्याचा लोंढा आला की त्या शक्तीपुढं ताबडतोब विनम्र होण्याच्या सवयीमुळं लव्हाळी तग धरतात. लोंढा निघून गेला की पुन्हा उभी राहतात. पण ताठ मानेनं उभे राहणारे वृक्ष मात्र कोसळतात. मी माझ्या मित्राला म्हणालो,

' कोसळून पडण्याची क्षिती न बाळगता आपण वाकायचं नाही, शरणागती पत्करायची नाही असा निर्धार असणं हेच मर्दपणाचं खरं लक्षण. अशी ऊर्मी ज्यांच्या नसांनसांतून उंचबळते तेच नवा पुरुषार्थी इतिहास घडवू शकतात. केवळ जगत राहणं– आरामात गाद्यागिरद्यांवर लोळत राहणं यात कसला तेजस्वीपणा आहे ? तडजोड करणाऱ्या लोकांना मी दोष देत नाही. ती अपरिहार्य असेल तर केलीच पाहिजे. पण व्यवहाराच्या नावाखाली तत्त्वाच्या नरडीला नख लावून तडजोड करणारी माणसं शेपटी घालणाऱ्या प्रवृत्तीची असतात. असल्या भ्याड, नामर्द माणसांत आणि मेंढ्यांत कसला फरक असणार ? राजसत्तेपुढं मी कदापि वाकणार नाही असा बाणा ठेवणाऱ्या सॉक्रेटिसाला प्राणाला मुकावं लागलं. पण स्वाभिमान, तत्त्वनिष्ठा, ध्येयवाद, स्वार्थत्याग या मूल्यांना त्याच्यामुळंच जीवदान मिळालं. ' सत्या ' साठी त्यानं शांतपणानं मृत्यू पत्करला. माणसाच्या सामर्थ्याची आणि संस्कृतीची उंची अशा व्यक्तींमुळेच वाढते. स्वार्थी आणि मूर्ख माणसं नको तिथं वाकतात, भलत्याच ठिकाणी लोटांगण घालतात. त्यांच्या-

बरोबर इतरांचीही किंमत ते कमी करतात. ' आम्ही काय कुणाचे खातो रे, तो राम आम्हाला देतो रे ' असं ठणकावून सांगणारी पिळदार वृत्ती बाह्यतः उद्धट वाटण्याचा संभव आहे. पण ती अभिमानी असूनही विनम्र असते. गांधीजी तत्त्वकठोर होते, पण त्यांच्यात शालीनताही होती. नम्रता आणि स्वाभिमान यांच्यात कसलाच विरोध नाही. ' भले तरी देऊ कासेची लंगोटी ' हे तुकारामाचे एक रूप झाले. पण या रूपाचाच दुसरा आविष्कार ' नाठाळाच्या माथ्यावर काठीचे तडाखे हाणू ' हा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेल्या आमंत्रणाला हा ' मराठा ' कवी ' तुम्हापाशी आम्ही येवोनिया काय, वृथा आहे सीण चालण्याचा ' असं उत्तर देतो तेव्हा देहूच्या इंद्रायणीचं पाणी कसं चमकदार आहे याचा प्रत्यय येतो. '

पण ज्यांना शेपटी हलवण्यातला ' स्वर्गीय ' आनंद उपभोगायचा आहे त्यांना आपण विरोध कशाला करावा ? ' जो जे वांछील तो ते लाहो ' असं म्हणून आपण त्यांना शुभेच्छा द्याव्यात हे बरं !

## १४

# अरे संसार संसार

आमच्या शेजारचे हरिभाऊ म्हणजे एक मजेदार वल्ली आहे. कधी कधी ते अत्यंत वैतागानं मला म्हणतात, ' मी गाढवपणा केलाय. लग्न करण्याचा महामूर्ख-पणाचा निर्णय मी कोणत्या घातकी क्षणी घेतला कुणास ठाऊक ! पण या लग्नाच्या जंजाळात पडलो पहा ! लग्न करण्याचा विचार म्हणजे बुद्धीचं दिवाळं वाजणं. आज मला माझ्या वेडेपणाचा भयानक पश्चात्ताप झाला आहे. पण काय करू ? या संसारातून पळून जाता येत नाही म्हणून तर नशिबाला दोष देत स्वस्थ बसलो आहे. अहो, काही झालं तरी मुळातच हा प्रपंच नासका आहे. अगदी अंतर्बाह्य किडलेला आहे म्हणा ना ! असल्या कवडी किंमतीच्या संसारात माणसं स्वतःला का गुंतवून घेतात काही कळत नाही. जाऊ द्या. या जन्मी जे व्हायचं ते झालं. आता पुढच्या जन्मी मात्र असली चूक मी करणार नाही.' त्यांचं बोलणं मी शांतपणानं ऐकून घेतो. कारण हे संभाषण त्यांच्या तोंडून मी अनेकवेळा ऐकलं आहे. आता त्यात नावीन्य उरलेलं नाही. हरिभाऊंच्या या पश्चात्तापयुक्त भाषणामागं मोठसं तात्त्विक कारण नसतं. बायकोबरोबर भांडण झालं की हरिभाऊ संसाराला शिव्या मोजीत माझ्याकडं येतात. संसार हा मुळातच कसा अर्थशून्य आहे, हे मला पटवून देऊ लागतात. अशा वेळी कोणत्या संतानं, कोणत्या महाराजांनी संसारासंबंधी काय निष्कर्ष काढले आहेत याचीही माहिती ते मला तत्परतेनं देतात. संसारातून बाहेर पडल्याशिवाय आत्मकल्याण साधता

येत नाही असं सांगून काही ठराविक उदाहरणे देतात. त्यांचं हे प्रवचन, बायकोबरोबरचं भांडण, संसाराबद्दलचा वैताग हे सर्व ठरलेले कार्यक्रम आहेत. आठवड्यातून दोन वेळा हरिभाऊंचं हे प्रपंचनिरूपण मला सहनशीलतेनं ऐकून घ्यावं लागतं. काय करायचं ? शेजारधर्म आहे ना !

बायकोबरोबर हिमतीनं, चिवटपणानं कसं भांडावं या बाबतीत माझा एक मित्र भलताच निष्णात आहे. भांडणाला तोंड लागलं की हा तिला अवाक्षरानंही उत्तर देत नाही. मुक्याचं व्रत घेऊन वर्तमानपत्रात तोंड खुपसून बसतो. कितीही आदळ-आपट झाली, कपबशा फुटल्या किंवा भांड्यांची फेकाफेक होण्याचा प्रसंग आला तरी तो आपल्या वाचन समाधीतून बाहेर येत नाही. हल्ला झाला तरी प्रतिकार करायचा नाही, निमूटपणानं अन्याय सहन करायचा हा 'सत्याग्रही' मार्ग त्यानं स्वीकारलेला असतो. अखेर त्याचा परिणाम असा होतो की, ' हद्द झाली तुमची ! इतकं बोलून काही उपयोग आहे का ? आपलंच नशीब खोटं म्हणावं आणि स्वस्थ बसावं हेच खरं,' असं म्हणून शत्रू एकतर्फी माघार घेतो. युद्धाच्या आघाडीवर सामसूम होते. हा मार्ग थोडासा आत्मक्लेशाचा आहे. पण हमखास यशस्वी होणारा आहे. थोडासा स्थितप्रज्ञ म्हणजेच निगरगट्ट नवरा निश्चित सफल होतो. पण बहुसंख्य नवरे कच्चे असतात. ' अरे ' ला ' का ग ' म्हणायची घोडचूक ते करतात आणि पस्तावतात. सॉक्रेटिसाची बायको फारच भांडखोर होती असं म्हणतात. एकदा ती त्याच्यावर भलतीच भडकली. बराच वेळ तिच्या तोंडून शब्दांचे फटाके उडत होते पण सॉक्रेटिसासारखा तत्त्वज्ञ प्रकृतीचा माणूस अगदीच शांत राहिला. एका शब्दानं त्यानं प्रत्युत्तर केलं नाही. अखेर ती अधिकच चिडली आणि त्याच्या डोक्यावर तिनं कळशीभर थंड पाणी ओतलं. हा महान तत्त्वज्ञ हसून शांतपणानं म्हणाला, 'मेघगर्जना आणि विजेच्या कडकडाटानंतर पर्जन्यवृष्टी व्हावी हे निसर्गक्रमाला अनुसरून झालं.' मला वाटतं सॉक्रेटिस जितका नवरा होता त्यापेक्षा तो अधिक तत्त्वज्ञ होता. कदाचित अशी बायको मिळाल्यामुळेच तो तत्त्वज्ञानाचा आचार्य झाला असावा.

आमचे हरिभाऊ कधी कधी अत्यंत खुषीत असतात. उत्साहानं ते माझ्या खोलीत प्रवेश करतात आणि आपल्या प्रेमळ पत्नीची स्तुतिस्तोत्रं गाऊ लागतात. ते म्हणतात, ' तुम्ही काही म्हणा ! अशी प्रेमळ आणि गृहकृत्यदक्ष आणि सद्गुणी, विचारशील, स्वार्थत्यागी, सेवावृत्तीची, काटकसरी, शांत, सुशील बायको

मिळायला पूर्वजन्मीची पुण्याई लागते, काय समजलात !' मराठी भाषेतल्या आठवतील तितक्या प्रशंसापर विशेषणांचा अशा वेळी ते वर्षाव करतात. इतके सारे सद्गुण एकाच स्त्रीत कसे अवतीर्ण झाले हा वादविवादाचा विषय बाजूला ठेवू. पण आपल्या पत्नीच्या अनेक गुणांचं वर्णन हरिभाऊ गहिवरून करू लागले की मला आश्चर्य वाटतं. दोन दिवसांपूर्वीच लग्न आणि संसार, बायको आणि तिचा अडाणीपणा या विषयावर हरिभाऊंचं एक जबरदस्त व्याख्यान मी ऐकून घेतलेलं असतं. त्यावेळी हा वैतागलेला नवरा तडक संन्यास घेऊन कुठेतरी गिरिकंदरात तपश्चर्येसाठी जाणार आहे, आता तो या क्षुद्र नीरस संसारात क्षणभरही थांबणे शक्य नाही असा त्याचा अंतर्भाव असायचा. पण दोनच दिवसांत असा काय चमत्कार घडतो कुणास ठाऊक ! हरिभाऊ म्हणतात,

'परमेश्वरानं हिच्यासारखं रत्न पदरात टाकलं म्हणून माझा संसार कसा सुखासमाधानाचा झाला आहे. संसारात काही अर्थ नाही असं म्हणणाऱ्या लोकांना मला ओरडून सांगावंसं वाटतं की, अरे वेड्यांनो ! इथं माझ्या घरी येऊन पहा. एक आदर्श संसाराचं चित्र तुम्हाला पाहायला मिळेल.' हरिभाऊंची ही दोन्ही व्याख्यानं मला पाठ झाली आहेत. इतकी की मी त्यांना प्रॉम्प्टिंग करू शकेन. पण एक प्रश्न असा पडतो की यातले खरे कोणते नि खोटे कोणते ? वैताग खरा की समाधान खरे ? संसाराच्या नाण्याच्या या दोन बाजू आहेत. दोन्ही तितक्याच खऱ्या आहेत असे म्हणायला हरकत नाही. भांडणारी बायको आणि नवऱ्यासाठी आपल्या वैयक्तिक सुखाचाही त्याग करणारी बायको ही दोन्ही रूपे खरीच नव्हेत का ? भांडणातही तिचे प्रेम असू शकेल. बायकोवर गुरगुरणारा नवरा प्रेमशून्य असतो काय ? त्याच्याही मनातून प्रीतीचे पाझर पाझरताना दिसतात. एकूण पती, पत्नी आणि संसार हा एक गुंतागुंतीचा पण गमतीदार विषय आहे म्हणायचा ! त्यात परस्पर-विरोध आहे म्हणूनच पोषकताही आहे. तुकारामांवर तोंडसुख घेणारी त्यांची फटकळ बायको त्याच्या तोंडी सुखानं दोन घास पडावेत म्हणून जिवाचा आटापिटा करायची. त्यांनाही तिच्या ठायी असलेल्या गुणांची जाणीव होती. एकूण संसार हे रहस्यमय प्रकरण आहे म्हणायचं !

माझा एक मित्र मला म्हणाला, 'कमाल आहे या हरिभाऊची ! बायकोबरोबर याची सारखी भांडणं होतातच कशी ? गेल्या वीस वर्षांत माझं एकदाही माझ्या बायकोबरोबर भांडण झालेलं नाही.' मी त्याला म्हणालो, 'तू एक अपवादात्मक

पती दिसतोस. वीस वर्षांत एकदाही बायकोबरोबर भांडण झालं नाही या विक्रमाबद्दल तुला राष्ट्रपती पारितोषिक मिळालं पाहिजे. भांडणाचं मूळही प्रेमात असू शकतं याची तुला कल्पनाही आली नाही. प्रत्येक भांडण द्वेष आणि मत्सर यातूनच निर्माण होत असतं असं मानणं म्हणजे एक गैरसमज आहे. पति-पत्नींच्या काही मतभेदांना भांडणाचा केव्हा केव्हा रंग येतो हे काही खोटं नाही. पण अखेर ते पति-पत्नी असतात. आंतरिक प्रेमानं जन्माचे एकत्र आलेले असतात. संसारातल्या काही अडचणींचा त्यांच्या मनावर ताण पडतो. परस्परांसाठी झिजताना, त्याग करताना काही चुकीचे समज होतात; केव्हातरी भांडणात त्याचं पर्यवसान होतं. पण भरून आलेलं आकाश पुन्हा स्वच्छ होतं.' माझं हे भाष्य त्याला कितपत रुचलं हे मला कळलं नाही. पण संसार हा ऊन–पावसाचा गमतीदार खेळ आहे यात शंका नाही. कधी तो हवाहवासा वाटतो. कधी तो नको नकोसा होतो. पति-पत्नीतल्या प्रेमाला अपत्यांच्या वात्सल्यामुळं एक रुचिर रंग येतो. दोघांनी मिळून आता मुलांचं जीवन फुलवायचा वसा घ्यायचा असतो. कुणीतरी दु:खात आणि संकटातसुद्धा आपल्याबरोबर आहे ही जाणीव अत्यंत सुखद नसते काय ? पण काही संसार पति-पत्नीच्या दुराग्रहामुळेच उद्ध्वस्त झालेले दिसतात तेव्हा मात्र त्यांना जोडून ठेवणारा प्रेमधागा फार विरळ होता किंवा मुळातच नव्हता याची कल्पना येते. गडकऱ्यांनी विनोदानं म्हटलं आहे की, पतिपत्नी हा द्वंद्व समास असून त्याचा विग्रह कोर्टात वकिलाकडून करून घ्यावा लागतो. एका पाश्चात्त्य लेखकानं यासाठी तरुणांना मिस्कीलपणानं सल्ला दिला आहे. तो म्हणतो, ' बायको आणि तलवार यांची निवड करताना दुसऱ्यावर विसंबून राहू नये. नवरे फार शांत आणि सहनशील असले की मग बायका जहांबाज बनतात. पण वाईट नवरा सुधारण्याचं औषध मात्र अद्यापि सापडलेलं नाही.' या विधानात काहीसा विनोद असेल पण आपल्या अनुभवातून लेखकाने एक कडवट सत्य जरूर सांगितले आहे.

शेजारचे हरिभाऊ ' प्रपंच मुळातच नासका आहे.' असा मुद्दा कधी कधी गंभीरपणाने मांडतात. संसारावर या प्रकारचा आक्षेप अनेक संतमहंतांनी घेतला आहे. पण हा आक्षेपही मला फारसा सयुक्तिक वाटत नाही. आपल्या पारंपरिक निराशावादी दृष्टिकोणातून संसारनिंदा केली जाते. ज्या संतांनी प्रपंचाला लटका म्हटले, संसार असार आहे असे सांगितले त्यांनीही ' प्रपंच करावा नेटका '

असा स्पष्ट आदेश दिला नाही काय? प्रपंचाच्या आत्यंतिक आहारी जाऊन आपली सारी आध्यात्मिक कर्तव्यं विसरू नये यासाठीच ही संसारनिंदा होती. शतकानुशतके ही निंदा केली जात होती, म्हणून माणसांनी संसार कधीच सोडला नाही. ज्यांनी तात्कालिक आवेगात तो सोडला त्यांच्या मनातील संसाराची तहान कायमच राहिली. कुठल्याशा साधूच्या आध्यात्मिक प्रवचनाचा एका धनिकावर फार परिणाम झाला. साधू म्हणाला होता,

'प्रपंचाच्या विळख्यात सापडलेल्या माणसाला परमेश्वर कसा भेटणार? या खोट्या प्रपंचावर लाथ मारा आणि सर्वभावाने ईश्वराला हाक मारा.' झाले! या शब्दांनी तो श्रीमंत भारावून गेला. एक दिवस भगवी कफनी घालून स्वारी भ्रमण करू लागली. पण प्रपंचात मुरलेल्या या धनिकाला त्याचे वैभव सारखे आठवत होते. तो पावलोपावली लोकांना सांगत होता. 'माझा बंगला, गाडी आणि पंचवीस लाखांची इस्टेट सोडून मी या परमार्थमार्गाला आलो आहे.' कुणीतरी त्याला म्हटलं, 'महाराज त्या बंगल्याचा, गाडीचा आणि लाखो रुपयांचा भोग तुम्ही आजही प्रत्येक क्षणी तुमच्या मनानं घेत आहातच. तुमच्या मनात तुमची इस्टेट, बायकामुलं आताही आहेत. कपड्याचा रंग भगवा झाला तरी मनातला हिरवेपणा अजून गेला नाही.' प्रपंचाची आसक्ती ही काही अनैसर्गिक गोष्ट नव्हे. संसार मनापासून करावा. त्यात आपण काहीतरी चूक करीत आहोत असली ओशाळगत कशाला? परमेश्वर तरी प्रपंचापासून कुठे मुक्त आहे? संसाराला असार, असुंदर मानणाऱ्या वैराग्य-संपन्न लोकांशी आमचं जमणं कठीण आहे. इथं संसारापासून दूर पळायचं आणि स्वर्गातल्या सुखी संसारासाठी राना-वनात जाऊन म्हणे आत्मध्यान करीत राहायचं! कशाला हवा हा खटाटोप? त्यापेक्षा याच प्रपंचात आम्ही आमच्या कुटुंबातल्या व्यक्तींच्या सहवासात चार दिवस मनापासून राहू, हसू आणि खेळू. खेळत खेळत दु:खांना तोंड देऊ. हे सोडून एकट्यानं कुठेतरी गुहेत बसून कशाची तपश्चर्या करायची?

खरं म्हटलं तर माझ्या या विचारात कसलाच पाखंडीपणा नाही. पण एका सनातन, सांकेतिक विचारावर मात्र मला प्रहार करायचा होता. संन्यास का संसार? या प्रश्नाला गीतेनं दिलेलं तेजस्वी उत्तर मला सर्वार्थांनी मान्य आहे. भगवे कपडे म्हणजे संन्यास आणि संन्यास म्हणजे पलायनवाद, दुसरे काय?

'संसार' या शब्दावर भाष्य करताना स्वातंत्र्यवीर सावरकरांनी काढलेले

उद्‌गार मला आठवतात. अंदमानच्या अंधार कोठडीत डांबण्यापूर्वी सावरकरांना काही दिवस भायखळ्याच्या तुरुंगात ठेवलं होतं. काळ्या पाण्यावर त्यांना लवकरच नेलं जाणार होतं. पन्नास वर्षांची जन्मठेप भोगायला निघालेल्या आपल्या पतीला अखेरचं भेटण्यासाठी त्यांची पत्नी आली होती. कोठडीच्या खिडकीतून तिनं सावरकरांकडं पाहिलं मात्र, एका विलक्षण उत्कट वादळी आवेगानं ती स्फुंदून स्फुंदून रडू लागली. आता तिचा संसार पार उद्‌ध्वस्त झाला होता. संसाराचं गोड स्वप्न तिच्या डोळ्यांसमोर होरपळून गेलं. त्याची राखरांगोळी झाली होती. नियतीच्या काटेरी क्रूर हातांनी या दांपत्याचा संसार ओरबडून नष्ट केला होता. पत्नीच्या हुंदक्याचा आवेग कमी होईपर्यंत सावरकर उभे होते. नंतर ते आपल्या धीरगंभीर स्वरात तिला म्हणाले,

' हे पाहा, चार काटक्या एकत्र करून घरटं बांधायचं आणि मुलाबाळांची वीण वाढवायची, याला जर संसार म्हणत असाल तर असला संसार कावळे आणि चिमण्यासुद्धा करतात. पण संसाराचा याहून भव्यतर अर्थ घ्यायचा असेल तर इतरांच्या चुलीतून सोन्याचा धूर निघावा म्हणून आपल्या चुलीवरची चार गाडगीमडकी फोडून टाकण्यास आपण सिद्ध असलं पाहिजे.'

संसाराचा हा अर्थ महान आहे. पुरुषार्थानं रसरसलेला आहे. आम्हा सामान्य माणसांना हा अर्थ कसा परवडणार ? पण हा एक दिव्य संसार होता आणि काही ध्येयवाद्यांनी तो हसत हसत केला. सामान्य संसार असो की असामान्य असो, तो हसत हसतच करायचा असतो. त्याच्याकडं पाठ फिरवून कुठेतरी पळून जायचे नसते. आमचे हरिभाऊ मधूनमधून बायकोशी भांडण करतात. संसाराला शिव्या मोजतात पण त्यांचं आपल्या बायकोवर, मुलांवर आणि संसारावर प्रेम आहे. प्रेम करणाऱ्यालाच शिव्या देण्याचा अधिकार असतो आणि प्रेमाच्या स्पर्शानं शिवीसुद्धा ओवी होते.

१५

## कथा आत्मकथेची

काल भल्या सकाळी माझा एक मित्र मला भेटायला आला. जागतिक राजकारणापासून ग्रामपंचायतीपर्यंत अनेक विषयांवर बोलून झाल्यानंतर तो एकाएकी मराठी साहित्याबद्दल तक्रारीच्या सुरात म्हणाला, ' काय रे, तुमच्या मराठी साहित्याचं काही खरं नाही. मला तरी त्याच्या भविष्याबद्दल आता चिंता वाटायला लागली आहे.' मराठी साहित्य हा असा विषय आहे की त्याबद्दल कुणीही बोलावं. बेजबाबदारपणानं बोलण्याची हौस असलेल्या लोकांना या विषयात मुक्तपणानं बोलता येतं. मी म्हणालो, ' सद्गृहस्था, इतक्या सकाळी मराठी साहित्याच्या वाटेला कशाला जातोस ? त्याचं काय व्हायचं असेल ते होऊ दे ! तू चिंता केल्यामुळं त्याचं मोठंसं कल्याण होणार आहे अशातला भाग नाही. तू आपला निमुटपणानं बशीतला शिरा संपव.' माझ्या टोमण्यामुळं तो थोडासा चिडला आणि खोचून मला म्हणाला, ' साहित्यावर बोलण्याचा केवळ आपल्यालाच अधिकार आहे काय ? लक्षात ठेव ! साहित्य तुमच्यासारख्या मूठभर टीकाकारांसाठी नसतं. आमच्यासारख्या हजारो सामान्य वाचकांसाठीच ते लिहिलं जातं. माझी तक्रार अशी आहे की, ' तुमचं अलीकडचं बहुतेक साहित्य एकजात गचाळ आहे. ज्यांना फुंकणी धरण्याची अक्कल नाही त्यांनी हातात लेखणी घ्यावी याला काय अर्थ ? '

फुंकणी आणि लेखणी यांचा संबंध कोणत्या तर्कशास्त्राच्या आधारानं त्यानं

जोडला होता कुणास ठाऊक ! पण मी मुकाट्याने त्याची विधानं ऐकून घेत होतो. शिरा खात असल्यामुळं कदाचित असेल, पण तो फारच उत्साहानं आपले विचार मला ठणकावून सांगत होता. बोलताना मधून मधून, ' हे तुमचं मराठी साहित्य ' असा शेरा मारीत होता. अखेर काहीशा तीव्रतेनं मी त्याला म्हणालो, ' मराठी साहित्य ही काही माझी प्रायव्हेट प्रॉपर्टी नाही. ही साऱ्यांचीच मालमत्ता आहे. पण तुम्हा काही तथाकथित उच्चभ्रू लोकांना साहित्याबद्दल असं तुच्छतेनं बोलण्याची सवय लागली आहे त्याला काय करायचं ? ' माझ्या या हल्ल्यामुळं त्यानं माघार घेऊन म्हटलं, ' बरं बुवा, आपलं मराठी साहित्य म्हणतो. आता माझे आक्षेप शांतपणानं ऐकून घे. काय टीकाटिप्पणी करायची ती नंतर कर. नुकतचं प्रसिद्ध झालेलं एक आत्मचरित्र माझ्या दुर्दैवानं हाती पडलं. मराठीत इतकी निरर्थक, इतकी निखालस खोटी आत्मकथनं लिहिली जातात हे पाहून मला धक्काच बसला. अरे, ज्याचं चरित्र आणि चारित्र्य जगजाहीर आहे, ज्यानं अनेकांना लुबाडून आणि अनेकांसमोर शेपूट हलवून पैसा मिळवण्यासाठी पराकाष्ठा केली, जो सदैव ' तीर्थप्राशनात ' बुडालेला असतो अशा 'सदगृहस्थानं' स्वतःला गांधीजींचा अवतार मानून आत्मचरित्र लिहावं किंवा कुणाकडून तरी लिहवून घ्यावं यापेक्षा दुसरा विनोद कोणता ? ज्यांच्या जवळ सांगण्यासारखं काही असतं त्यांनी जरूर लिहावं; पण ज्याच्या आयुष्यात ढोंगांशिवाय दुसरं काहीच नसतं त्यानं संतत्वाचा अभिनय कशाला करायचा ? त्यानं आत्मचरित्र लिहिण्याचा मूर्ख खटाटोप करू नये असं माझं सरळ स्पष्ट मत आहे. आता तुझ्यासारख्या ' थोर ' टीकाकाराची मतं वेगळी असणार. ' थोर ' समजले जाणारे कित्येक टीकाकार ' पोर ' आहेत असं मला वाटतं.'

मी त्याच्या पोरकट कोटीकडं दुर्लक्ष केलं. पण आत्मचरित्रांच्या संदर्भात त्याने केलेले आक्षेप काही अंशी बरोबर होते. कुणीही उठावं आणि आत्मकथा सांगण्याच्या निमित्ताने धादांत असत्याची आणि आपल्या दुर्गंधी अहंकाराची शब्दांतून वरात काढावी, स्वतःच आपल्या भोवती आरती ओवाळून घ्यावी हा प्रकार अलीकडे वाढला आहे, यात शंका नाही. अज्ञान आणि अहंगंड यातून एक प्रकारचा घृणास्पद उद्धटपणा जन्माला येतो. माजलेल्या बोकडाच्या अंगाची जशी दुर्गंधी येते त्याप्रमाणं काही आत्मकथांतून लेखकांच्या प्रवृत्तींचा चमत्कारिक दर्प जाणवत राहतो. पण माझ्या मते अशाही लोकांना लिहिण्याचा अधिकार

जरूर आहे. स्वत:वर संतुष्ट असणाऱ्या मूर्खांना त्यांच्या नंदनवनातून कुणी बाहेर काढू नये. असल्या दांभिक आत्मकथनांनी कोणीही वाचक फसत नाही. प्रत्येकाचं आयुष्य ही एक कादंबरी असते असं म्हटलं जातं, पण ते फार मर्यादित अर्थानं खरं आहे. बहुसंख्य माणसं ठरलेल्या चाकोरीतूनच सरावानं चालत असतात. थोडे फार शिक्षण घेतात. कुठंतरी नोकरी मिळवितात. वरिष्ठांपुढं लोचटपणानं हसतात. चार-चौघांसारखा प्रपंच करतात. असल्या साचेबंद, संघर्षशून्य, रसहीन जीवनात आवर्जून सांगण्यासारखं काहीच असत नाही. पण ज्यांच्या आयुष्यात ' रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग ' असतो त्यांच्या आत्मकथा रसपूर्ण असतात. त्या आपल्याला एका विलक्षण जीवनचैतन्याच्या सहवासात घेऊन जातात. फार दिवसांपूर्वी मी रूसोचं आत्म चरित्र वाचलं होतं. त्या विक्षिप्त, काहीशा विकृत पण उद्दाम प्रतिभावंताचा तो ' कबुली जबाब ' मला अस्वस्थ आनंद देऊन गेला होता. गांधी, नेहरूंच्या आत्मकथाही अशाच काहीशा लौकिकावेगळ्या आहेत. माणसांच्या सामान्यपणात जेव्हा उत्कट ध्येयाचे, त्यागाचे आणि असीम साहसाचे रंग मिसळले जातात, तेव्हा त्यांचं चरित्र अनेक रसांनी रसरसून निघतं. पण असली माणसं थोडीच असायची. महान व्यक्तींनीच आत्मचरित्रं लिहावीत हा विचार मात्र मला बरोबर वाटत नाही. सामान्यातल्या सामान्य मनुष्यालाही काहीतरी सांगावं असं वाटतं. तो जे सांगतो ते साधारणच असेल पण त्यानं ते अंत:करणाच्या गाभ्यापासून सांगितलं असेल तर त्याच्या जीवनकथेलाही रसस्पर्श होतो. माझं हे मत माझ्या त्या मित्राला पटलं नाही. तो म्हणाला,

' अतिसामान्य माणसांच्या आयुष्यात घडतं तरी काय ? भुईवरून सरपटणाऱ्या तुच्छ प्राण्यांकडं पाहण्यात काय अर्थ आहे ? भरारी घेण्याची जिद्द असलेली आणि स्वत:ला बेभानपणानं झोकून देणारी माणसं आम्हाला आवडतात. आत्मचरित्र लिहावं ते गरुडांनी. कावळ्या-चिमण्यांनी त्या भानगडीत पडूच नये. त्यांनी फक्त जमिनीवर सांडलेले दाणे टिपावेत आणि त्यातच आनंद मानावा. ' पण या विचारात मला तरी तर्कशुद्धता दिसत नाही. साधारण माणसाच्या जगण्यातही काही रस असतो. त्याच्या लहान का असेनात पण काही अपेक्षा असतात. चिमणीलाही तिचे पंख आणि तिचे आकाश असते. सामान्य माणसाला सुद्धा स्वत:बरोबर आणि जगाबरोबर झगडावं लागतं. आपली सुखदु:खं कुणाला तरी सांगावीत असं त्याला वाटणारच. जीवन सामान्य असो की असामान्य असो,

जीवनाला त्याची स्वत:ची एक रुची असते. गिरणीत राबणाऱ्या एका कामगाराची आत्मकहाणी मला वाचायला मिळाली होती. त्या जीवनात मी रंगून गेलो होतो. ती आत्मकथा वाङ्मय या दृष्टीनेही खरोखर सरस होती. कसलाही आडपडदा न ठेवता निखळ सत्य त्या कामगारानं सांगितलं होतं. सत्याचं वैशिष्ट्य असं असतं की ते कल्पितापेक्षा रंगहीन असलं तरी सरळ मनाचा ठाव घेतं. अनेकवेळा कल्पितापेक्षा सत्य अधिक चमत्कृतिपूर्ण असतं. मी मित्राला म्हणालो, 'आत्म-चरित्र कुणीही लिहावं. पण त्यात प्रांजलपणा असावा. तोंडावर कुठलातरी मुखवटा घेऊन जेव्हा आत्मचरित्रं लिहिली जातात तेव्हा त्यांचा तकलादूपणा ताबडतोब लक्षात येतो. मी काही विलक्षण प्रांजल आत्मकथनं वाचली आहेत. हेडी लामार नावाच्या एका हॉलिवूडमधील नटीनं आपल्या आयुष्यातले बरेवाईट प्रसंग काहीही न लपवता अत्यंत धीटपणे सांगितले आहेत. परपुरुषाच्या सहवासात असताना आपला नवरा अचानक कसा घरी आला आणि त्यातून कोणतं नाट्य निर्माण झालं, याची कहाणी या नटीनं सरळ सांगितली आहे. पण या चमत्कारिक घटनेकडं ती अलिप्तपणानं पाहू शकते, स्वत:चं फसवं समर्थन ती करीत नाही. आपल्या चंचलपणाचा, उतावळेपणाचा, आपल्या हातून घडलेल्या निंद्य चुकांचाही ती कबुलीजबाब देते. स्वत:चंच कसं बरोबर होतं याचा दांभिक युक्तिवाद तिनं केला नाही. आत्मचरित्र म्हणजे स्वत:च्या आयुष्याचं सरळ, स्पष्ट चित्र रेखाटणं. माणसं कॅमेऱ्यासमोर येताना तोंडाला रंगरंगोटी करून 'बरं दिसण्यासाठी' येतात. आत्मचरित्र बरं आहे का यापेक्षा ते खरं आहे का हेच माझ्या दृष्टीनं महत्त्वाचं आहे.' माझ्या मित्राला माझं म्हणणं खोडून काढणं शक्य नव्हतं, पण तरीही तो म्हणाला,

'तुझ्या मते आपल्या लाजिरवाण्या पापांचीही कबुली आत्मचरित्र लेखकानं द्यावी? एखाद्या दरोडेखोरानं किंवा वेश्येनंही असंच धीटपणानं लिहावं असं तुला वाटतं काय? त्याचा समाजावर काय परिणाम होईल? आपण खरं लिहावं हे मान्य; पण त्याचा समाज-मनावर वाईट परिणाम होऊ नये ही दक्षता लेखकानं घेतलीच पाहिजे.'

लेखनाकडे ढोबळ नीतीच्या चष्म्यातून पाहणाऱ्याची ही दृष्टी असते. पण माणसाच्या वाट्याला येणारं जीवन अनेक वेळा रूढ नीतीच्या चौकटीत बसण्या-सारखं नसतं. नीतीचे नियम झुगारून स्वत:च्या सुखाची वाट चोखाळणारे अनेक

जण असतात. ते सुखी किंवा दु:खी होत असतील. पण ते जीवनही आपल्याला समजून घेतलं पाहिजे. नीती आणि अनीती म्हणजे नेमकं काय हे पुष्कळ वेळा कळत नाही. एखादी वेश्यासुद्धा नीतिमान असू शकेल. सत्याचं अनाग्रही चित्रण हा तर आत्मचरित्राचा पाया आहे. ' स्वान्तरासी नग्न पहावे ' असं एक संतवचन आहे. स्वत:ला विवस्त्र करून पाहण्याची शक्ती माणसात आल्याशिवाय त्याचं आत्मकथन प्रामाणिक होणार नाही. माझ्या मित्राला हा मुद्दा पटला असावा. मी म्हणालो,

' एका नर्तकीनं आपली विलक्षण जीवनकथा लिहिली आहे. त्या पाश्चात्य कलावतीला पुरुषांच्या लंपट प्रवृत्तीचा जो विदारक, दु:खद अनुभव आला तो तिनं सरळ सांगितला आहे. आपल्या अध:पाताची सर्वस्वी जबाबदारी तिनं पुरुषांवर टाकली नाही. पण समाजातल्या प्रतिष्ठित, धार्मिक, महनीय समजल्या जाणाऱ्या लोकांच्या तोंडावरचे संभावित मुखवटे या लेखिकेने टराटर फाडले आहेत. हे आत्मचरित्र प्रसिद्ध होताच ' तो मी नव्हेच ' असं म्हणत पळ काढणाऱ्या भेकड शिष्ट लोकांचं धक्का देणारं दर्शन समाजाला घडलं. या नर्तकीला ' सुसंस्कृत ' जगात स्थान नव्हतं. पण तिच्या आत्मचरित्रानं सुसंस्कृताच्या जगावर एक वेगळाच धगधगीत प्रकाश पाडला. आत्मकथनाला केवळ साहित्य म्हणण्यात अर्थ नाही. त्याला सामाजिक इतिहासाचं साधन मानावं लागेल. पण काही आत्मकथनं केवळ स्वत:तच गुरफटलेली असतात. ती वाचण्यात मला तरी रस वाटत नाही. स्वत:भोवती प्रदक्षिणा घालत बसलेल्या माणसाची कधीच वाढ होत नाही. ' मी 'च्या वेलांटीचा गळफास घेऊन ही माणसं मरून जातात.'

' अरे, असलीच रटाळ आत्मकथनं सध्या मराठीत प्रसिद्ध होतात, म्हणूनच मी मराठी साहित्याचं काही खरं नाही असं म्हणतो. ' मित्रानं आपला पूर्वीचाच मुद्दा पुन्हा मांडला. ' पूर्वी सत्तेवर असलेल्या एका अधिकाऱ्यानं लिहिलेलं आत्म-कथन वाचून मी थक्क झालो. हे महाशय लाच खाण्यात युगप्रवर्तक ठरावेत अशी त्यांची कामगिरी आहे. गरीब शेतकऱ्यांना तर यानं इतकं छळलं की त्याची आठवण झाली तरी संताप येतो. पण आत्मचरित्रात तर त्यांनी संत तुकारामाचा मेकअप् केला आहे. असली आत्मचरित्रं लिहून धूळफेक करणाऱ्यांची नाटकं पाहून माझी करमणूक होते. माणूस किती ढोंगी असतो याचे हे इरसाल नमुने आहेत. जसा माणूस आहे तसाच तो दिसत असला तर मग चरित्रांची आणि

आत्मचरित्रांची काही जरूरच नव्हती. '

बोलता बोलता माझ्या मित्रानं फारच मार्मिक विधान केलं. मला ते आवडलं पण तरीही मला त्यावर मल्लिनाथी करणं आवश्यक वाटलं. मी म्हणालो, ' भल्या माणसा, चुकतोस तू. माणसं जशी असतात तशीच ती दिसायला लागली तर या जगातले सारे संघर्ष संपून जातील. सारी गंमत नाहीशी होईल. मग कुणी कुणाचा केसानं गळा कापणार नाही. प्रेमाचा देखावा करणारा प्रेमिक कुणा पोरीला फसवू शकणार नाही. देवाच्या मूर्तीसमोर उभा राहून भक्तीचा अभिनय करणारा ' संभावित ' देवालाही आज ओळखता येत नाही. नैवेद्य ठेवणाऱ्या साऱ्यांनाच तो गरीब बिचारा देव ' प्रसाद ' देतो. भोळे देव आणि भामटे भक्त यांचा आज सुळसुळाट झाला आहे. या परिस्थितीतली मग गंमतच संपून जाईल. देशोदेशीच्या राजकारणात आज नाटकाला, सदिच्छा भेटीला आणि प्रीतिभोजनाला जी भरती आली आहे तीच नाहीशी होईल. शस्त्रकपात करण्याच्या मसुद्यावर सही करणं हे देखील राजकारणातलं एक शस्त्र आहे. माणसं जशी असतात तशी ती दिसत नाहीत म्हणूनच जीवनाचं आणि जगाचं नाटक रंगतदार बनलं आहे. सत्य हे बऱ्याच वेळा बेचव असतं. असत्याला आणि दांभिकतेला मात्र मसालेदार चव असते. म्हणूनच काही लोक स्वतःला लपवण्यासाठी आत्म-चरित्राचा बुरखा तोंडावर घेतात. ती त्यांचीही फसवणूकच असते. पण त्यात जर त्या बिचाऱ्यांना समाधान वाटत असेल तर लिहू द्या त्यांना असली आत्म-कथनं. मी लेखन-स्वातंत्र्याचा भोक्ता आहे. रोगट समाधान मिळवण्यासाठी कुणी लिहीत असेल तर परमेश्वर त्याचं भलं करो ! '

गरम कॉफीचा कप तोंडाला लावीत मित्र म्हणाला, ' तू म्हणतोस ते ठीक आहे. पण ज्यांच्या आयुष्याचं चंदन फक्त लोकजीवनासाठीच झिजलं अशा अनेकांनी आपली आत्मकहाणी सांगितलीच नाही. ती आज त्यांच्याच शब्दांतून वाचायला मिळाली असती तर या महापुरुषांचं व्यक्तित्व आपल्याला चांगलं कळलं असतं. '

' होय, खरं आहे ' मी म्हणालो, ' पण मोठ्या माणसांना स्वतःबद्दल बोलण्याचा, स्वतःची जाहिरात करण्याचा मोह पडत नाही, कारण ती खरोखरच मोठी असतात म्हणून नम्र असतात. लोकांच्या आग्रहासाठी त्यांनी आत्मकथन केलं तरी त्यात त्यांचा अहंकार नसतो. स्वतःचा शोध घेण्याचाच त्यांचा

प्रयत्न असतो. तुकाराम-रामदासांसारखे संत पुरुषही आपल्याबद्दल लिहिताना आपल्या मर्यादांची जाणीव ठेवतात. आपल्या दोषांची प्रांजल कबुली देतात. इथं त्यांचं माणूसपणही समजतं आणि संतपणही उमगतं. पाणी खोल असलं म्हणजे ते संथ असतं. उथळ पाण्याला खळखळाटच अधिक.'

'पण तू म्हणतोस तसं आदर्श आत्मचरित्र केव्हा लिहिलं जाईल ?' मित्रानं विचारलं.

मी खोडकरपणानं म्हणालो, 'आता तू हातात लेखणी घेशील तेव्हा !'

१६

## काळपुरुषाशी ' संवाद '

काळ हा एक लहरी, निर्दय जादूगार आहे असं मला वाटतं. पाहता पाहता तो होत्याचं नव्हतं करून टाकतो. काल झुळझुळ वाहणारा एखादा नाचरा झरा आज पाहावे तो सुकून कोरडा ठणठणीत पडलेला दिसतो. दोन वर्षांपूर्वी जिच्या सुंदर काळ्याभोर डोळ्यांत जीवनाच्या उत्साहाचं रम्य चांदणं खुललेलं पाहिलं होतं तिचे डोळे आता स्नेहशून्य, स्वप्नहीन झालेले दिसतात तेव्हा मन व्याकुळ होतं. काळानं असला चमत्कारिक बदल का घडवून आणावा ? दहाच वर्षांपूर्वी आमच्या कॉलेजातला विशीतला एक कोवळा तरुण माझ्याकडं आपल्या कवितांची वही घेऊन आला. त्याच्या कविता वाचताना मी रोमांचित झालो. जणू माझी हरवलेली अनेक चिमुकल्या स्वप्नांची पाखरे आपले पंख फुलवीत मला त्या कवितांतून भेटत होती. माझ्याच मनातल्या कित्येक आशा-आकांक्षा त्याच्या काव्यातून उचंबळत होत्या. एका तेजस्वी, प्रणयी, पुरुषार्थी तारुण्याचे रुचिर दर्शन घडविणारी त्याची ती गतिमान कविता माझ्या अंतःकरणात कितीतरी काव्यमय कंपने निर्माण करून गेली. बऱ्याच दिवसांनी मला उद्याचा एक चांगला कवी भेटला होता. तो मधून मधून येऊन माझ्याशी संवाद करायचा. काही नवं लिहिलं की वाचून दाखवायचा. त्याच्या शब्दांत आणि कल्पनांत ताज्या प्रमत्त यौवनाचे श्वासनिःश्वास दरवळत असायचे. एक कलावंत घडत होता, आकार घेत होता. पण मध्येच काय घडले कुणास ठाऊक ! त्यानं कॉलेज

सोडलं. त्याची माझी भेटही झाली नाही. परवा एक महिन्यापूर्वी मुंबईच्या एका उपनगरीय स्टेशनवर तो मला अकस्मात भेटला. कुठल्याशा कचेरीत तो आता एक साधारण नोकरी करीत होता. कौटुंबिक जबाबदाऱ्यांच्या ओझ्याखाली आता तो वाकला होता. वाढलेली दाढी, मळकट शर्ट आणि काहीतरी हरवल्यासारखा दिसणारा चेहरा. काहीतरी विचारावं म्हणून मी त्याला विचारलं, ' काय रे ! बरा आहेस ना ? लेखन चालू असेलच. ' तो असा हसला की हसला नसता तर बरं झालं असतं. कधी कधी हसणं रडण्याची भूमिका करतं. जणू त्याला म्हणायचं होतं, ' आता कसलं लेखन ? कवितांचा एक काळ होता. त्या काळात वेदनेलाही फुलांचा सुवास दरवळत होता. अंधारालाही उजेडाचं स्वप्न होतं. आता काळ बदलला. फार लवकर बदलला. त्याच्याशी मला संवादही करता आला नाही. काळ असा का बदलून गेला हेच समजत नाही. त्यानं मला अंतर्बाह्य लुटून नेलं. ' प्रत्यक्षात तो तरुण– आता तो आपल्या वयाच्या मानाने बराच प्रौढ दिसत होता असं काही बोलला नाही हे खरं, पण त्याच्या निस्तेज डोळ्यांतले हे शब्द मी वाचले. इतक्यात लोकल पकडण्यासाठी तो धावत गेला. मी क्षणभर तिथंच उभा राहिलो. काळानं घडवून आणलेलं हे स्थित्यंतर मला तरी फारच क्रूरतेचं वाटलं. याच्या मुळाशी नियम आहेत काय ? कोणत्या तर्कवादानं असल्या अनपेक्षित बदलाचं सामर्थन करणार आहोत ? मानवी तर्काच्या आणि बुद्धीच्या पलीकडे असलेला हा समर्थ कालपुरुष आपली मनस्वी क्रीडा करीत असतो. आपण नुसते पाहायचे असते !

काळाची काही पावले नियमाने बांधलेली असतात. निसर्गाचा क्रम म्हणून आपण ते मान्य केलं पाहिजे. पण तरीही काळावर निर्दयतेचा आरोप करावा असं आपल्या भाबड्या मनाला वाटून जातं. अनेक प्रसंग सांगता येतील. काही वर्षांपूर्वी अल-इतालिया कंपनीचे एक विमान मुंबईजवळ समुद्रात कोसळले होते. त्या विमानात बहुतेक शाळकरी मुलं-मुली होती. दहा-बारा वर्षांच्या या कोवळ्या बालकांनी असा कोणता गुन्हा केला होता की क्षणार्धात त्यांना समुद्रात बुडवून ठार मारण्याची घोर शिक्षा काळानं द्यावी ? कित्येक दिवस त्या निष्पाप बालकांचे मृतदेह शोधण्याचं काम चालू होतं. क्षणापूर्वी आकाशात फिरणारं विमान, क्षणार्धात महासागराच्या तळाशी खेचलं जावं याची कारणमीमांसा मला तरी करता येत नाही. यांत्रिक बिघाड, वगैरे कारणं दिली आणि ती खरी असली

तरी जखमी मनाचं ती समाधान करू शकत नाहीत. तुकारामाच्या शब्दांत सांगायचं तर ' आले देवाजीच्या मना, तेथे कोणाचे चालेना' एवढंच म्हणता येईल. असल्या शेकडो भयानक अपघातांच्या वार्ता समजल्या की जीवनावरचा विश्वास काही वेळ तरी उन्मळून पडतो. ख्रिस्त, गांधी, लिंकन, इंदिरा गांधी यांच्या अमानुष हत्येची काही कारणे देता आली तरी काळाने त्यांच्या पदरात असा मृत्यु टाकायला नको होता ही ठसठसणारी जाणीव मनाला फार क्लेशदायक होते. मनुष्य समर्थ असला काय नि क्षुद्र असला काय, तो प्रतिभावंत असो, सिंहासनावरील सम्राट असो की, फूटपाथवरला भिकारी असो, काळाच्या हिशेबी सारेच समान आहेत. काळासारखा समतावादी कोणी असेल का ? पण खरं तर तो समतेचा आणि न्यायाचा विचार कधी करीतच नाही. कुणाच्या पदरात काय टाकावं हे केवळ त्याच्या वेडया लहरीवर अवलंबून आहे का ? होय, असंच असेल. त्याच्या नुसत्या भ्रुकुटिभंगानं जगातली बलाढ्य सिंहासनं शतखंड होऊन जातात. चक्रवर्तीलाही भणंग होऊन दारोदार भटकावं लागतं. पण असं असेल तर माणसाच्या हातात काहीच नाही असा निष्कर्ष काढावा लागेल. असा निष्कर्ष मला पटत नाही. पण आपल्या पटण्या—न पटण्याची काळाला कदर कधीच नसते. त्याच्या विध्वसंक वृत्तीचा विश्वात स्वैरसंचार सदैव चालू असतो.

मराठीचे ' जादूगार ' कादंबरीकार ना. सी. फडके यांना त्यांच्या मृत्यूपूर्वी काही महिने मी भेटायला गेलो होतो. ते अगदी अशक्त झाले होते. मध्यंतरी काही वर्षांत मी त्यांना भेटलो नाही याबद्दल त्यांनी मला प्रेमळ जाब विचारला. त्यांच्या क्षीण प्रकृतीकडे पाहून सारखं जाणवत होतं की आता अप्पासाहेब फार काळ आपल्यात राहणार नाहीत. त्यांनाही याची कल्पना होती. ते म्हणाले, 'बाडबिस्तरा बांधून ठेवला आहे. काळानं खुणेची शीळ घातली की इथून उठायचं. पण तुम्हाला माहीत आहे की, मला ऐकायला कमी येतं. त्यामुळे शीळ लवकर कानी येत नाही. ' अप्पासाहेबांचा हा प्रसन्न विनोद मला आजही आठवतो अन् आनंद देऊन जातो. राहून राहून मनात येतं की या थोर कादंबरीकारानं आपल्या प्रतिभेची ' दौलत ' मराठी माणसांवर उधळली. मराठीला एक नाजूक, डौलदार प्रभावी शैली दिली. विध्वंसक काळावरही लेखक आपल्या लेखणीनं अमरत्वाचा लेख लिहून ठेवतो तर ! कॉलेजच्या पहिल्या दुसऱ्या वर्षात शिकत असताना फडक्यांच्या साहित्याबद्दल मला दृढ आकर्षण होते. त्या काळात त्यांच्या कादंबऱ्यांनी

तरुण-तरुणींना चोरट्या प्रेमाची दीक्षा दिली असं विधान मी करतो. फडक्यांनी 'झंकार' नावाचं एक साप्ताहिक काढलं होतं. या 'झंकार'मधून माझ्या चार-पाच कथा लागोपाठ प्रकाशित झाल्या. प्रा. फडक्यांचा आणि माझा त्यामुळे परिचय होऊ शकला. आज त्या कथा वाचताना मला त्यातल्या उणिवा स्पष्ट दिसतात. पण एका ज्येष्ठ कलावादी लेखकानं माझ्यासारख्या विद्यार्थ्यांच्या कथांना प्रसिद्धी दिली याचा मला आजही अभिमान वाटतो. फडक्यांची काही गाजलेली भाषणं मी ऐकली आहेत. इतकं रेखीव, सुबक अन् प्रसन्न वक्तृत्व करणारा दुसरा वक्ता मला आजपर्यंत ऐकायला मिळाला नाही. आचार्य अत्र्यांचं वक्तृत्व म्हणजे विनोदाचा झंझावात तर फडक्यांची कलावती वाणी म्हणजे सुगंधी वाऱ्याची प्रसन्न झुळूक. महाराष्ट्रातले हे दोन दिग्गज आज जरी काळाच्या पडद्याआड गेले असले तरी त्यांनी मराठी साहित्यात आपल्या अभिनव वाग्विलासाने आगळेच कर्तृत्व करून दाखवले. वृद्धावस्थेत त्यांना मृत्यू यावा हे क्रमप्राप्त असले तरी काळाने गिळंकृत केलेल्या या कलावंतांच्या तोलामोलाचे दुसरे साहित्यसेवक आम्हांला दिले काय हा प्रश्न अनुत्तरित राहतो.

माझ्या या विचारावर एका मित्रानं टीका केली. तो म्हणाला, 'काळाचा प्रवाह आपल्याच नादात आणि जोषात अखंड वाहात असतो. काळावर तू निर्दयतेचा जो आरोप करतोस तो मात्र मला मान्य नाही. जे जे आपल्या मार्गात असेल ते ते पोटात घेऊन काळाचा हा जबरदस्त ओघ सुसाट धावत असतो. तो लहरी आहे असं म्हणण्यापेक्षा तो आंधळा आहे. त्याच्या तडाख्यात जे सापडले ते नष्ट होते. म्हणूनच या अमर्याद काळपुरुषाला भर्तृहरीनं वंदन केलं आहे. पण हाच कठोर काळ जी सुंदर किमया करीत असतो त्याच्याकडं तू का लक्ष देत नाहीस?'

काळाच्या क्रूरतेवर टीका करताना मला त्याच्या ठायी असलेल्या नवनवोन्मेष-शाली निर्माणशक्तीचा विसर पडलेला नाही. एका बाजूनं तो सुरूप नि कुरूप सारंच पुसून टाकीत असतो तर दुसऱ्या बाजूनं सुंदराची आणि असुंदराचीही रचना करण्याचा खेळ खेळत असतो. एक लाट किनाऱ्यावर आपटून वाळूत जिरून गेली म्हणून काय झालं? अशा एकापेक्षाही एक प्रचंड गगनचुंबी लाटा निर्माण करण्याची क्षमता सागरात असते. काही फुलं सुकून त्यांचं निर्माल्य होत असताना नव्या कळ्या वेलीवर डुलत असतात. त्यांना फुलायचं असतं. त्यांना

फुलवण्याची जादुगिरी हा काळच करीत असतो ना! काळाचा हा एक चिरंतन कधी न संपणारा अद्भुत चाळा आज कित्येक युगं उलटली तरी चालूच आहे. या काळालाच गिळून टाकणारा एखादा महाकाळ अस्तित्वात आहे काय? काळ-रूपी नाठाळ घोड्यावर स्वार होऊन त्याचा लगाम खेचणारा घोडेस्वार कधी जन्माला येणार ते केवळ काळालाच माहीत असणार. तुम्ही आम्ही या प्रश्नाचा विचार करीत राहाणं म्हणजे व्यर्थ काळ घालवणं आहे. महाकवी शेक्सपिअरनं काळासंबंधी एक गमतीदार विचार सांगितला आहे. तो म्हणतो,

' काळ हा फॅशनेबल यजमानासारखा आहे. तो निरोप घेणाऱ्या पाहुण्यांशी किंचित हस्तांदोलन करतो आणि बाहू पसरून नवीन येणाऱ्यांचं हार्दिक स्वागत करतो.' दुसऱ्या एका कवीनं काहीशा निराशेनं म्हटलं आहे, ' काय म्हणता? काळ निघून जातो? छे छे! काळ तसाच असतो. आपण मात्र निघून जातो.' काळाचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न कितीतरी काळापासून चालू आहे. त्यात कधी खंड पडेल असे वाटत नाही. पण नवं सौंदर्य उत्पन्न करण्याची त्याची शक्ती देखील विलक्षण आहे यात शंका नाही.

दोन महिन्यांपूर्वीची एक चमत्कारिकपूर्ण घटना आता माझ्या मनात अगदी कोरली गेली आहे. तो अनुभव जितका अनपेक्षित तितकाच आनंददायक होता काळाची ही लहर मात्र मला विस्मयकारक वाटली. मुंबईला एका नाटयगृहात कुठल्याशा समारंभाच्या निमित्तानं नृत्याचा कार्यक्रम ठेवलेला होता. मी सहज त्या समारंभाला उपस्थित राहिलो. सुरुवातीची भाषणं वगैरे झाल्यानंतर एका नर्त-कीच्या नृत्याला आरंभ झाला. त्या तरुण नर्तकीची पावलं इतक्या कलात्मक रीतीनं पडत होती आणि तिचे आविर्भाव, मुद्राभिनय इतका वेधक होता की त्या नर्तकीनं पाहता पाहता नव्हे नाचता नाचता ते सारं नाट्यगृह जिंकून घेतलं. तिच्या साऱ्याच हालचाली चपल आणि मोहक होत्या. डोळ्यांत आत्मविश्वास होता आणि एक अवखळ मधुर स्मितही त्यातून डोकावत होतं. तिचा कमनीय देह नृत्याच्या मोहिनीनं जणू भारलेला होता. हजारो प्रेक्षकांचे डोळे आणि कान एका अवीट तृप्तीनं भरून गेले होते. या तरुणीला दहापंधरा वर्षांपूर्वी आपण कुठंतरी निश्चित पाहिलेलं आहे असं मला अंधुकपणानं आठवू लागलं. पण हिचं वय अठरा-वीस वर्षांपेक्षा अधिक नसावं. मग पंधरा वर्षांपूर्वी मी हिला कुठून पाहाणार? काहीतरी गफलत होत होती. हिशेब चुकत होता. पण हीच आकृती, हेच विलोभनीय

रूपलावण्य, असेच वेडावून टाकणारे लाडिक आविर्भाव मी पाहिले होते. पण ती ही कशी असेल? विचार करता करता एक नाव विस्मृतीच्या अंधाराचा भेद करून डोळ्यांसमोर चमकले. अरे! हीच ती प्रमोदिनी. ती अशीच देहभान विसरून एका आगळ्या कलात्मक धुंदीत नृत्य करायची. अशीच मुद्रा, अशीच निमुळती झालेली हनुवटी. ती अशीच गव्हाळ रंगाची आणि अंगोपांगांतून यौवनाचे रंग प्रकट करणारी कलावती होती. पण तिचा तर केव्हाच मृत्यू झाला होता. मग ही कोण? मला काहीच कळेना. एक काळ असा होता की प्रमोदिनीच्या नृत्यनैपुण्याची चर्चा रसिकांत सतत होत असे. तिच्या कटाक्षाने घायाळ झालेले अनेक प्रेमवेडे हेही लोकांच्या चर्चेचा विषय बनले होते. आता ती घटना जुनी झाली होती. कारण कुठल्याशा अपघातात चाळिशीच्या आतच प्रमोदिनी मृत्युमुखी पडली होती. पण आता या क्षणी माझ्यासमोर बेहोष नृत्य करणारी ही लावण्यवतीसुद्धा तिचीच प्रतिकृती वाटत होती. मध्यंतर झाल्यावर मी मेकअप रूममध्ये जाऊन तिची भेट घेतली. माझ्या मनातली शंका तिला बोलून दाखवली तेव्हा ती काहीशी अस्वस्थ झाली असावी. ती म्हणाली,

'तुम्हाला जे वाटलं ते अगदी खरं आहे. मी प्रमोदिनीची मुलगी. तिच्या-प्रमाणंच आपणही नृत्यात पारंगत व्हावं म्हणून मी फार परिश्रम घेतले. रसिकांना माझं नृत्य आवडतं यात माझ्या आईच्या पुण्याईचा फार मोठा वाटा आहे.' तिनं आपले ओलावलेले डोळे पदरानं पुसले. उत्तम नृत्याबद्दल मी तिचं अभिनंदन करून पुन्हा नाट्यगृहात येऊन बसलो. आता माझी अस्वस्थता संपली होती. सहज मनात विचार येऊन गेला, आपण काळाला विध्वंसक वृत्तीचा क्रूरकर्मा समजतो. असा तो असेलही. पण आपल्या कलावान बोटांनी तो पुन्हा सुंदर संगीताचे सूर निर्माण करतो. तो मोडतो आणि पुन्हा घडवतो. एक ज्योत तो मालवतो आणि दुसऱ्याच क्षणी नवी ज्योत पालवतो. पालवण्याचा आणि मालवण्याचा, संहाराचा आणि सृजनाचा चमत्कारिक खेळ हा काळपुरुष करीत आहे.

हे काळपुरुषा, धन्य आहे तुझी! आम्हा पामरांना तुझ्या अतर्क्य लीला कधी कळल्या नाहीत, कधी कळणारही नाहीत. तू आमचा महान मित्र आहेस आणि तूच आमचा महान शत्रूही आहेस! तुला त्रिवार वंदन असो.

# १७

## ते बहारीचे दिवस....

काही दिवसांपूर्वीची गोष्ट. फर्स्ट इयर बी. ए. च्या वर्गावर माझा तास होता. वर्ग संपूर्ण भरला होता. दीडदोनशे विद्यार्थी-विद्यार्थिनींचा तो संमिश्र वर्ग पाहून मी सुखावलो. वर्गात सहसा मी 'प्रेझेंटी' घेत नाही. पण त्या दिवशी घेण्याची मला लहर आली. एकेक नंबर मी उच्चारीत होतो आणि विद्यार्थी 'येस सर' म्हणून प्रतिसाद देत होते. वर्ग शांत होता. एका विद्यार्थ्याचा रोल नंबर मी उच्चारला आणि कोपऱ्यातील शेवटच्या बाकावर बसलेल्या तीन–चार विद्यार्थ्यांपैकी एकानं मुलीचा स्वर काढून 'येस सर' असं मोठ्यानं म्हटलं. तो कृत्रिम, लाडिक, जनानी स्वर ऐकून वर्गात हास्याची एक जोरदार लाट आली. काही मुलांनी उत्साहानं बाकावर आपले हात आपटले. मी शेवटच्या बाकावरील विद्यार्थ्यांकडं रोखून पाहिलं. मुलीच्या आवाजाची नक्कल त्यांपैकी कोणी केली असावी हे मी सहज ओळखू शकलो आणि ओरडून म्हणालो, 'देशमुख, उभे रहा.' ओशाळल्या चेहऱ्यानं सतरा-अठरा वर्षांचा तो मुलगा भीत भीत उभा राहिला. त्याच्याकडे बोट रोखून मी वर्गाला उद्देशून म्हणालो, 'बंधुभगिनींनो, देशमुखात झालेला बदल सर्वांच्या लक्षात आला ना ? हा नुकताच झालेला बदल दिसतो आहे. इतका सुंदर आणि नाजूक बदल झाल्याबद्दल मी आपल्या सर्वांच्या वतीनं देशमुखांचे अभिनंदन करतो. उद्यापासून ते मुलींच्या बाकावर बसतील.' वर्गात पुन्हा हशा टाळ्यांची एक जबरदस्त लाट

आली. बिचारा देशमुख फारच ओशाळून गेला. त्यानं दिलगिरी व्यक्त करून म्हटलं, 'सर, मी सहज, गंमत केली.' देशमुखाचं स्पष्टीकरण बरोबर होतं. कॉलेजातले विद्यार्थी आपल्या प्राध्यापकांची कधी कधी फिरकी घेण्याचा प्रयत्न करतात. प्रसंगविशेषी त्याची चेष्टाकुचेष्टा करून त्याला हास्यास्पद बनवतात. नवशिका प्राध्यापक अशावेळी अस्वस्थ होतो, घाबरतो. तो घाबरला आहे हे चाणाक्ष विद्यार्थी चटकन ओळखतात आणि मग चित्रविचित्र आवाज करून किंवा काहीतरी गमतीदार प्रश्न विचारून प्राध्यापकाची हुर्यो करतात. अशावेळी व्यास-पीठावर ठामपणानं उभं राहून खेळकरपणानं विद्यार्थ्यांना मार्मिक प्रतिटोला देऊ शकणारा प्राध्यापक उनाड विद्यार्थ्यांसमोर टिकाव धरू शकतो. लेचेपेचे प्रोफेसर मात्र घामाघूम होऊन स्टाफरूमकडं पळ काढतात आणि मोठ्या वर्गाची सदैव धास्ती घेतात. माझ्या माहितीचे एक प्राध्यापक तर विद्यार्थ्यांसमोर उभं राहण्याचा प्रसंग आला म्हणजे वर्गाकडं जातानाच कावरेबावरे झालेले दिसतात. त्यांनी वर्गात प्रवेश केला की विद्यार्थी त्यांच्या नावाचा जयजयकार करतात. वर्गातल्या फळ्यावर पोरांनी जमतील तशी त्यांची व्यंगचित्रं काढलेली असतात. एखादं वाक्य त्यांनी उच्चारलं की एकदम पाच पन्नास पोरं 'असं का?' म्हणून भक्तिभावानं माना डोलावतात. एकदा ते वर्गात म्हणाले होते, 'शिवाजी हा शूर होता.' त्याबरोबर पाच दहा पोरं ओरडली, 'होय का? हे आम्हाला माहीतच नव्हतं! आम्ही शिवाजीला तुमच्यासारखाच समजत होतो.' या हल्ल्याला काय उत्तर द्यावं हे त्या पीएच. डी. झालेल्या विद्वान प्राध्यापकाला कळेना. 'सायलेन्स प्लीज, सायलेन्स प्लीज' असं म्हणून त्यानी मुलांना शांत करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांचा आवाज पहिल्या दोन बाकांपर्यंतसुद्धा पोहोचत नव्हता. इतक्यात कुणीतरी वर्गातच एक फटाका उडवला. प्राध्यापकमहाशय अधिकच भेदरून स्टाफरूममध्ये आले. आणि त्यांनी पुढं एक आठवड्याची रजा काढली.

असले प्रकार मधून मधून कॉलेजात घडू शकतात. आपल्या शिक्षकांची चेष्टा करण्याची लहर विद्यार्थ्यांना आली तर ती काही वेळा स्वाभाविकच मानावी लागते. आज मी विद्यार्थ्यांना शिस्तीचं महत्त्व प्रभावी भाषेत पटवून देऊ शकतो. आपल्या प्राध्यापकांविषयी विद्यार्थ्यांच्या मनात सदैव आदरभावच असावा असंही मी कधी कधी आग्रहानं म्हणत असतो. पण त्यावेळी सुद्धा माझ्या मनात लपून बसलेला एक वात्रट मिश्कील विद्यार्थी मला विचारतो की, 'सॉक्रेटिसच्या बापा-

सारखा महागंभीर चेहरा करून एखादा प्राध्यापक गडकऱ्यांची प्रेमकविता शिकवू लागला, किंवा शिवाजीच्या पराक्रमाचं वर्णन करू लागला तर आम्ही ते पुराण जांभया देत ऐकावं काय ?' प्रश्न अगदी बरोबर आहे. आपल्या विषयात रस उत्पन्न करण्याचं सामर्थ्य नसलेला अध्यापक हा विद्यार्थ्यांच्या चेष्टेचा विषय झाला नाही तरच नवल ! एकदा अशाच एका प्राध्यापकांच्या रटाळ व्याख्यानाच्या वेळी एक व्रात्य मुलानं मोठ्यानं जांभई दिली होती. आणि जांभई देताना आपल्या उघडलेल्या जबड्यासमोर तो चुटक्या वाजवीत होता. या घटनेचा अर्थातच योग्य तो परिणाम होऊन प्राध्यापकांनी तास सोडून दिला होता. विद्यार्थ्यांसमोर शिकवताना व्याख्यानांची पद्धती कॉलेजात स्वीकारावी लागते. आपलं व्याख्यान माहितीपूर्ण तर असावं पण ते रोचक आणि रंजक होईल याची थोडी तरी दक्षता अध्यापकाला घ्यावी लागते. आपल्या विषयाशी समरस न होणारा आणि विद्यार्थ्यांच्या माथ्यावर अगदीच रटाळ, पाल्हाळिक व्याख्यान मारणारा प्राध्यापक विद्यार्थ्यांना बहुधा आवडत नाही. याबद्दल अर्थातच मी तरी विद्यार्थ्यांना दोषी धरणार नाही. खरं सांगायचं तर तरुण, हसऱ्या, खेळकर आणि खोडकर मुलामुलींना एखाद्या विषयाची माहिती करून देणं ही केवढी तरी आनंदाची घटना असते. मुलामुलींनी भरलेल्या वर्गात व्यासपीठावर जाऊन उभं राहणं आणि हळुवारपणानं आपल्या विद्यार्थ्यांच्या मनाच्या तारा रसिकतेने छेडणं यातला अवीट आनंद जातिवंत शिक्षकालाच समजण्यासारखा आहे. आपल्या व्यक्तिगत विवंचनेत कितीही बुडून गेलेला प्राध्यापक शिकविण्यासाठी वर्गात प्रवेश करतो आणि समोर बसलेल्या मुलामुलींच्या उत्साही, उत्सुक, प्रसन्न आणि व्रात्य चेहऱ्यांकडं नजर टाकतो तेव्हा त्याच्या मनातल्या चिंता निदान त्यावेळी तरी दूर जातात. शिकविण्यात एक नवनिर्मितीचा विलक्षण आनंद आहे. काही प्राध्यापक शिकविताना देहभान विसरतात आणि आपल्यालाही विसरायला लावतात. एखाद्या खोलीच्या बंद असलेल्या खिडक्या कोणीतरी भराभर उघडाव्यात आणि क्षणार्धात ती अंधारलेली खोली स्वच्छ प्रकाशात न्हाऊन निघावी तसा भास काही प्राध्यापकांची व्याख्यानं ऐकताना मला झालेला आहे.

कित्येक वर्षांपूर्वी प्रा. राजाराम सदाशिव अय्यर यांच्या इंग्रजीच्या तासाला बसण्याची संधी मला मिळाली होती. वस्तुत: मी पहिल्या वर्षाचा विद्यार्थी होतो. पण अय्यरचं व्याख्यान ऐकण्यासाठी सीनियर बी. ए. च्या वर्गात जाऊन बसलो.

प्रा. अय्यरांनी वर्गात प्रवेश केला, स्मितपूर्वक सर्वांकडं पाहिलं आणि आपल्या अत्यंत शुद्ध शैलीदार इंग्रजीतून बोलायला सुरुवात केली. ऑथेल्लो नाटकातील एक प्रवेश त्यांनी आम्हाला रंगवून सांगितला. त्या प्रवेशातील प्रत्येक वाक्य नव्हे प्रत्येक शब्द त्यांनी जिवंत करून वाचला. त्यांची वाचण्याची पद्धतीच अशी होती की प्रत्येक शब्दाचा अर्थ आम्हाला आपोआप कळत होता. शेक्सपीअरनं रंगवलेलं एक विलक्षण नाट्य प्रा. अय्यर अतिशय सहजतेने आणि रसिकतेने आपल्या शब्दातून सजीव करीत होते. एखादं विधान विवरून सांगताना त्यांच्या प्रखर चिकित्साबुद्धीचा विलास दृष्टीला पडून आम्ही दिपून जात होतो. त्यांच्या शिकविण्यात पांडित्य, रसिकत्व आणि विनोद यांची विलक्षण गुंफण झालेली होती. प्रा. अय्यर लवकरच कॉलेज सोडून गेले. आणि त्यांच्या जागी आलेल्या दुसऱ्या प्राध्यापकांच्या पिरीयडला बसणं ही साऱ्यांनाच शिक्षा वाटू लागली. बाक आपटणं, प्राध्यापकावर कागदी बाण मारणं, आरडाओरडा करणं या गोष्टींना काही दिवस खंड पडला नाही. अजूनही कधी कधी प्रा. अय्यरांच्या परिणामकारक अध्यापनाची आठवण मनात तरळून जाते.

आज कॉलेजातल्या विद्यार्थ्यांना मी असा उपदेश करतो की कोणत्याही अध्यापकाच्या तासाला विद्यार्थ्यांनी शांततेने आणि शिस्तीने बसून त्याच्या व्याख्यानाची टिपणं काढावीत. पण या उपदेशाचं मी विद्यार्थी असताना पालन केलं होतं काय? मला आठवतं, कित्येक प्राध्यापकांना मी आणि माझ्या काही मित्रांनी प्रत्यक्षअप्रत्यक्ष बराच त्रास दिला होता. त्या प्रकाराची आज थोडीशी खंत वाटते. एकदा इंटर आर्टस्च्या वर्गावर इकॉनॉमिक्स शिकविण्यासाठी एक नवीन प्राध्यापक आले. प्राचार्यांनी वर्गाला त्यांची ओळख करून दिली. हा प्राध्यापक चेहऱ्यावरून अगदीच नवशिका पोरगेला वाटत होता. सूट, बूट, टाय असा थाट करून तो आमच्यासमोर व्यासपीठावर हातात एक जाडजूड ग्रंथ घेऊन ऐटीत उभा होता. नवा प्राध्यापक आला आहे ही खमंग बातमी कॉलेजात पसरली होती. त्यामुळं इतर वर्गाचे विद्यार्थीही आमच्या वर्गात दाटीवाटीने येऊन बसले. या नव्या प्राध्यापकाला मराठी मुळीच समजत नव्हतं. आपल्या स्टायलिश इंग्रजीतून त्याने 'लॉ ऑफ डिमिनिशिंग युटिलिटीचा' सिद्धांत समजावून सांगायला सुरुवात केली. त्याचे इंग्रजी उच्चार अगदीच युरोपीय थाटाचे वाटत होते. त्यामुळं एक मुलगा उठून ओरडला, 'काय पाव्हनं, लंडनहून केव्हा

आला ? ' त्याच्या प्रश्नानं सारा वर्ग खदखदून हसला. लंडन हा शब्द ऐकल्यावर प्राध्यापकांनी माहिती दिली ' लंडन इज दि कॅपिटल सिटी ऑफ इंग्लंड.' पुन्हा हशाची जोरदार लाट आली. प्राध्यापकांनी आपल्या फर्ड्या इंग्रजीत पाच–दहा मिनिटे भाषण करून सिद्धांत स्पष्ट केला. ते म्हणाले,

' समजा, तुमच्यासमोर एका टेबलावर आठ ॲपल्स (सफरचंदे) आहेत. दोन किंवा तीन फळे खाल्ल्यानंतर तुमची भूक भागेल आणि मग उरलेल्या फळांची उपयुक्तता आणि मूल्य तुमच्या दृष्टीने कमी होईल. यालाच अर्थशास्त्रात ' घटत्या उपयुक्ततेचा सिद्धांत ' म्हणतात. हे ऐकताच मी एकदम उठून उभा राहिलो आणि वात्रटपणानं म्हणालो, ' सर, आय वुईल ईट ऑल द ॲपल्स.' त्याबरोबर माझे चार सहकारी उठून ओरडले, ' वुई कॅन ईट टू डझन ॲपल्स.' सर्वांनी बाकं वाजवून आमच्या विधानाचं स्वागत केलं. काही उत्साही मुलांनी सिनेमा थिएटरात वाजवतात तशा शिट्ट्या वाजवल्या. एका कोपऱ्यातील तीनचार मुलं ' सर, वुइ वाँट ॲपल्स ' असं ओरडू लागली. तोपर्यंत प्राध्यापक घामानं निथळून गेले होते. समोरच्या वानरसेनेला कसं आवरावं ते त्यांना कळेना. त्यांचे शब्दही कुणाला ऐकू येईनात. अशाच गोंधळात अर्थशास्त्राचा तो तास संपून गेला. पुढे आमच्या वर्गात येताना त्या प्राध्यापकाबरोबर एक ज्येष्ठ प्राध्यापक त्यांना सोबत करीत असत. काही तासांना ते वर्गात येऊन बसत. अर्थशास्त्राच्या त्या प्राध्यापकाचा पहिला तास उधळून लावण्यात मी अग्रभागी होतो याचा मला आज खेद वाटतो. पण ॲपल्सचे उदाहरण इंग्रजी अर्थशास्त्रात आहे म्हणून ते जसंच्या तसं इथं सांगण्यात त्यांची तारतम्याच्या दृष्टीनं चूक झाली असं अजूनही वाटतं. पंचवीस तीस वर्षांपूर्वी आम्हाला सफरचंद पहायला सुद्धा मिळत नव्हती. त्या काळात ते एक महाग आणि दुर्मिळ फळ होतं. भारतीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आपल्याला काय शिकवायचं आहे ही जाणीव असती तर त्यांनी निश्चितच वेगळं उदाहरण घेतलं असतं. पण म्हणून त्यांच्या तासाला आम्ही जो काही गोंधळ केला तो फारसा समर्थनीय नव्हता.

आमच्या इंटर आर्ट्सचा वर्ग हा नाठाळ पोरांचा वर्ग म्हणून कॉलेजात प्रसिद्ध होता. आमच्या वर्गात जो प्राध्यापक अर्धा तास टिकाव धरू शकेल तो कोणत्याही व्यासपीठावर यशस्वी झाला असता. चांगल्या चांगल्या अभ्यासू अध्यापकांची सुद्धा भंबेरी उडवण्यात पोरांना त्यावेळी काय समाधान मिळायचं कुणास ठाऊक ?

फळ्यावर काहीतरी लिहिण्यासाठी प्राध्यापकांनी पाठ वळवली की वीस पंचवीस विद्यार्थी मागील दारानं आणि खिडक्यांतून पसार होत असत. पुन्हा काहीतरी लिहिण्यासाठी ते वळले की आणखी वीस पंचवीस पोरं उड्या मारून निघून जात. समोरचा वर्ग एकाएकी अर्ध्यापेक्षा अधिक रिकामा व्हायचा. केवळ आज्ञाधारक मुली तेवढ्या वर्गात उरायच्या. असं एक दोन वेळा घडलं म्हणजे प्राध्यापक वर्ग सोडून निघून जात असत. आमच्या वर्गात रजपूत नावाचा एक बुद्धिमान पण महाचावट विद्यार्थी होता. बावीस–तेवीस वर्षांचं त्याचं वय असेल. तो विवाहित होता आणि त्याला दीड-दोन वर्षांचा मुलगाही होता. एकेदिवशी आपल्या छोट्या मुलाला घेऊन तो वर्गात आला. मुद्दामच मुलींच्या बाकाजवळ जाऊन बसला. एका मुलीकडं बोट दाखवून आपल्या छोकऱ्याला तो मोठ्यानं म्हणाला, ' अरे ती तुझी आई नव्हे, तुझ्या आईसारखी दिसते पण तुझी आई नव्हे. ' हे ऐकताच ती मुलगी ताडकन उठून वर्गाबाहेर गेली. दुसऱ्या मुलीकडं पाहूनही रजपूतनं हाच प्रकार केला. दोघींनी मिळून प्राचार्यांकडं तक्रार गुदरली. आमचे प्राचार्य फार सरळ आणि भोळे होते. त्यांनी उलट त्या मुलींना विचारलं, ' रजपूत म्हणतो ते खोटं आहे का ? तुम्ही का निष्कारण असल्या तक्रारी करता ? ' आज हा रजपूत मुंबईला कुठल्याशा बँकेत मोठा अधिकारी आहे. परवा त्याची भेट झाली, तेव्हा या प्रकाराची मी त्याला आठवण करून दिली. तो हसत हसत म्हणाला, ' आपल्या वर्गानं आणि विशेषत: मी काही मुलींना आणि प्रोफेसरांना त्यावेळी फार छळलं. पण कॉलेजातले ते दिवस खरोखरच बहारीचे होते. आता पुन्हा ते दिवस परत मिळणार नाहीत.' त्याचं म्हणणं खरं आहे. आम्ही विद्यार्थी-अवस्थेत असताना कॉलेजात केवळ उनाडक्याच केल्या असं मात्र नव्हे. कित्येक प्राध्यापकांवर आम्ही मनापासून प्रेम केलं. आमच्या कॉलेजचा प्यूनसुद्धा आम्हाला जवळच्या मित्रासारखा वाटायचा. ज्यांना आम्ही त्रास दिला त्या प्राध्यापकांनीसुद्धा प्रसंगविशेषी रागावून आमच्या खोडकरपणाचं कौतुकच केलं. परीक्षेचे दिवस जवळ आले म्हणजे सारा वर्ग गंभीर व्हायचा. आम्ही वेळीअवेळी प्रोफेसरांच्या घरी जाऊन त्यांना शंका विचारीत असू. पुस्तक मागत असू. सर्वांनीच आम्हाला मदत केली. काहींनी थोड्या कोपरखळ्या दिल्या, कानउघाडणी केली पण त्यातही त्यांचा जिव्हाळाच दिसून आला.

तरुण मुलामुलींनी तुडुंब भरलेलं कॉलेजचं विश्व अखंड तारुण्यानं आणि

उत्साहानं उचंबळत असतं. या विश्वाच्या नुसत्या स्पर्शानंसुद्धा माझ्या वृत्ती ताज्या टवटवीत होतात. गेली पंचवीस वर्ष एका कॉलेजात मी विलक्षण उत्साहानं अध्यापन करीत आहे. महाराष्ट्रातल्या बहुतेक सर्व लहानमोठ्या कॉलेजांतल्या विद्यार्थ्यांसमोर वेगवेगळ्या विषयांवर व्याख्यानं देण्याची आणि विद्यार्थी-विद्यार्थिनींशी 'संवाद' करण्याची मला संधी मिळाली आहे. मुलामुलींचं हे चैतन्यपूर्ण जग एक प्रकारच्या उनाड उत्साहानं ओथंबून गेलं आहे. त्यांच्यासमोर उभं राहिल्या-नंतर माझ्यातली रुक्ष व्यवहारी वृत्ती पार पळून जाते. धमन्यांतून जिवंत उष्ण रक्त वाहू लागतं. माझ्या शब्दांना नवे पंख फुटतात. विचारांना तारुण्याचा अमृत-स्पर्श होतो. नवनवीन कल्पना वेगानं दृष्टीसमोर झेपावू लागतात. प्रौढपणाची कात गळून पडते. समोर बसलेल्या तजेलदार, मिश्कील आणि दंगेखोर पण तरीही शालीन व शांत अशा विद्यार्थ्यांच्या वयाशी आणि वृत्तीशी माझी सहज जवळीक साधते. त्यांना खुलवीत आणि चिडवीत, कधी रेशमी चिमटे काढीत, एखादी कविता अथवा निबंध मी त्यांना समजावून सांगू लागलो की त्या वर्गात प्रसन्न-तेची लाट कशी पसरत आहे याची सुखद जाणीव मला मुलामुलींच्या त्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसते. कॉलेजचे विद्यार्थी कधीकधी बेशिस्तीनं वर्तन करतात. कधी त्यांचा वात्रटपणा सभ्यतेच्या सीमा ओलांडून पलीकडं जातो. कधीकधी खेळाच्या मैदानावर मारामाऱ्या करणं, कोणत्यातरी क्षुल्लक बाबीसाठी प्राचार्यांना आणि कुलगुरूंना घेराव घालणं असली कृत्यं त्यांच्या हातून घडतात. त्याबद्दल मी त्यांचं समर्थन कधीच करणार नाही. पण यातले काही गुन्हे तारुण्यसुलभ उता-वळेपणामुळे घडतात. कित्येकवेळा बाहेरच्या राजकीय व अन्य चळवळीतून विध्वंसकतेचं लोण त्यांच्यापर्यंत येऊन पोहोचतं. नगरपालिकांतून, विधानसभांतून मोठी समजली जाणारी माणसं ज्या प्रकारानं वागतात, त्याचं अनुकरण महाविद्या-लयातील विद्यार्थी करू लागले तर त्यात आश्चर्य कसलं? पण कोणी काही म्हटलं तरी मूलत: विद्यार्थी सभ्य आणि शालीनच असतो. कॉलेजच्या स्वतंत्र वातावरणात त्याला पंख फुटतात त्याप्रमाणं काही वेळा शिंगही फुटतात. पण जिथं विद्वत्ता आढळेल, प्रेरणा मिळेल– तपश्चर्या दिसेल तिथं हे विद्यार्थी--विद्यार्थिनी विनम्र होतात. त्यांच्या फाजीलपणालाही रसिकतेची आणि विनोदप्रियतेची एक मोहक किनार असते. त्यामुळं या मुलांमुलींवर फार काळ राग धरावा असं कुणा-लाच वाटणं शक्य नाही. मी कधी कधी वर्गात रागाचं एखादं वाक्य उच्चारतो.

क्वचित प्रसंगी राग अनावर झाला तर एखाद्या विद्यार्थ्याला वर्गाच्याबाहेर जायला सांगतो. पण तास संपल्यानंतर जेव्हा ओशाळल्या चेहऱ्यानं तो विद्यार्थी जवळ येऊन दिलगिरी प्रदर्शित करतो तेव्हा त्याच्या पाठीवर थाप मारून मी म्हणतो, ' तुमच्या खोडकरपणाबद्दल माझी तक्रार नाही. पण हा खोडकरपणा कुठं आणि किती करावा याचं तारतम्य तुमच्याजवळ नसल्यामुळं कर्तव्य म्हणून मला रागावणं भाग पडलं...' त्या विद्यार्थ्याच्या मुद्रेवर स्मितरेषा चमकून जाते. आणि मलाही समाधान वाटतं. विद्यार्थी म्हणून मी कॉलेजात होतो. आता अध्यापक म्हणून या कॉलेजच्या जीवनाशी पूर्ण समरस झालो आहे. खरं तर मी अध्यापक झालो नसतो तर मला फार खंत वाटली असती. कदाचित इतर व्यवसायात मी यशस्वीही ठरलो असतो. पण मला का कुणास ठाऊक यशाच्या झगझगाटाचं फारसं आकर्षण नाही. एखादा सामाजिक किंवा वाङ्मयीन विचार समोर बसलेल्या विद्यार्थि-विद्यार्थिनींना मन:पूर्वक विवरून सांगावा आणि विचारप्रकटीकरणातलं, भावनांच्या अभिव्यक्तीतलं एक मौलिक समाधान मिळवावं या व्यतिरिक्त दुसरी हाव मला वाटली नाही. मासा ज्याप्रमाणे पाण्यातच जगेल त्याप्रमाणं मी विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या परिवारातच मुक्तपणानं श्वासोच्छ्वास करू शकतो. माझ्या विद्यार्थ्यांनी आजपर्यंत माझ्यावर प्रेमाचा आणि आपुलकीचा इतका प्रचंड वर्षाव केला आहे की त्या सहस्रधारांनी मी चिंब भिजून गेलो आहे. त्यांनी माझ्या आयुष्यात आनंदाचे, उत्साहाचे, वाङ्मयप्रेमाचे आणि समाजनिष्ठेचे झरे उत्पन्न केले आहेत. जोपर्यंत कुठं ना कुठं दूर प्रांतात देखील माझा एखादा विद्यार्थी भेटतो आणि अत्यंत आपलेपणानं माझी प्रेमळ चौकशी करतो, आग्रहानं आपल्या घरी नेऊन कुटुंबियांची ओळख करून देतो आणि आपण मिळवलेल्या अल्पस्वल्प यशाचं श्रेय जेव्हा माझ्या पदरात टाकतो, तोपर्यंत मी खरोखरच फार समाधानी आहे. परवा मुंबईतल्या एका प्रचंड गर्दीच्या रस्त्यावर एक विद्यार्थी-विद्यार्थी कसला एक ऐटबाज ऑफिसर—गाडीतून खाली उतरला आणि ' सर ! सर ! ' अशी हाक मारून माझ्याकडं लगबगीनं आला. मी त्याला ओळखलं नाही. त्याच्या रुबाबदार व्यक्तिमत्त्वासमोर मी अगदीच सामान्य कळाहीन आहे याची मला जाणीव होत होती. तो विलक्षण आदरानं आणि भावनावेगानं माझ्याशी बोलत होता,

' सर, मी एकोणीसशे अठ्ठावन ते एकसष्ट या काळात तुमचा विद्यार्थी होतो. आता एका अमेरिकन कंपनीत अधिकारी आहे. अनेक वेळा तुमची आठवण

होते. वीस वर्षांपूर्वी तुम्ही आम्हाला ज्ञानेश्वरीचा एक अध्याय शिकवला होता. तांब्यांच्या प्रेमकवितांचं सौंदर्यग्रहण मी तुमच्याच तोंडून ऐकलं होतं. आज कितीतरी वर्षं उलटली पण तुमचे कित्येक शब्द, कित्येक विधानं अजूनही मला आठवतात.' त्याचे शब्द ऐकल्यावर माझ्या चित्तवृत्ती फुलून आल्या. शिक्षकाला मिळणारं सर्वात मोठं पारितोषिक माझ्या त्या विद्यार्थ्यानं उदारतेनं मला देऊन टाकलं होतं. स्तुतीचे शब्द ऐकल्यावर मी सहसा हुरळून जात नाही. कोणते शब्द नाटकी हे मला इतक्या वर्षांच्या अनुभवानंतर कळू लागले आहे. या विद्यार्थ्याच्या बोलण्यात कदाचित अतिशयोक्ती असेलही, पण त्यात अप्रामाणिकपणा नव्हता. मी ही कॉलेजात विद्यार्थी असताना काही प्राध्यापकांची व्याख्यानं झपाटून ऐकली आहेत. काही जणांच्याकडून मी कितीतरी ऋण घेतलं आहे. ज्यांना मी विसरू शकणार नाही असे काही प्राध्यापक मला कळत न कळत पुष्कळसं देऊन गेले आहेत. कॉलेजचं शिक्षण मला मिळालं नसतं तर हे संस्कार माझ्यावर झाले नसते.

महाविद्यालयाचं वातावरण, तेथील शिस्त, बेशिस्त कोणाला आवडो वा न आवडो पण मला अजूनही कोणत्याही कॉलेजची इमारत पाहिली की एखाद्या वर्गात जाऊन तेथील विद्यार्थी-विद्यार्थिनींत मिसळून जावं, प्राध्यापकाचं व्याख्यान ऐकावं आणि त्याची जाता जाता सहज थोडी गंमत करावी असा मोह होतो.

# १८

## भाकरी आणि स्वप्ने

माझ्या एका प्राध्यापक मित्रानं एकदा माझ्याशी वाद घातला. प्राध्यापकांना ही सवय असते. वाद उकरून काढायचा आणि आपण काहीतरी नवीन मौलिक विचार व्यक्त करीत आहोत असा आविर्भाव करायचा. मनुष्य भाकरीवर जगतो का ? हा त्या वादाचा विषय होता. भाकरी हा माणसाच्या जीवनातला एक गौण भाग आहे असं माझं प्रतिपादन होतं. माझ्या मताचं अभिनिवेशानं खंडन करण्यासाठी हे महाशय पुढे सरसावले. प्राध्यापक असल्यामुळे अनेक गैरलागू, विसंगत विधाने त्यांनी केली. ते तर्कशास्त्राचेच प्राध्यापक होते. त्यांना अशी तर्कशून्य विधाने करण्याचा अधिकारच होता. बराच वेळ ते बोलत होते. अखंडपणे विसंगत बोलण्याइतके बुद्धिचातुर्य त्यांनी फार परिश्रमाने मिळवले असावे. अखेर आपल्या वक्तव्याचा समारोप करताना ते म्हणाले,

" लक्षात ठेव, भाकरी हेच जगातलं सर्वश्रेष्ठ सत्य आहे. भाकरी हाच जगाचा आत्मा आहे. ही म्हणजे मनुष्याची जीवनप्रेरणा आहे. भाकरीतूनच माणसाची संस्कृती फुलते. आजपर्यंत भाकरीनंच माणसाला जगवलं आहे. तिकडं पलीकडे पहा. उन्हातान्हात खडी फोडणाऱ्या, घाम गाळणाऱ्या या कष्टकऱ्यांची सारी धडपड कशासाठी आहे ? अरे, पोटातला वैश्वानर भाकरीशिवाय कधीच संतुष्ट होत नाही. तो जर भडकला तर तुमच्या साऱ्या संस्कृतीचं काय होईल ? भाकरी ही संरक्षक देवता आहे. तिची उपासना करण्यासाठी तिच्या भोवती सारं

जग प्रदक्षिणा घालीत आहे. तू तिचं महत्त्व नाकारलंस म्हणून काय झालं ?"

प्राध्यापकानं 'भाकरी'साठी इतकं पोटतिडिकीनं बोलावं हे मला बरं वाटलं नाही. मी भाकरीचं महत्त्व मुळीच नाकारलेलं नव्हतं. माणसाच्या जीवनात त्याचं पोट आणि ते भरण्यासाठी त्याला करावी लागणारी उरस्फोड याची मला काय जाणीव नाही ? रिकाम्या पोटातील आग प्रक्षुब्ध झाली म्हणजे ती किती विध्वंसक होते याची साक्ष इतिहासानं अनेकवेळा दिलेली आहे. विश्वामित्रासारख्या तपस्व्यालाही 'अभक्ष्य' भक्षण करायला लावणारी ही भूक आम्हा सामान्य माणसांवर कशी स्वार होते याची मला कल्पना आहे. "अन्न हे परब्रह्म" मानलं गेलं आहे. गांधीजी एकदा म्हणाले होते, "परमेश्वराला आज अवतार घ्यायचा असेल तर तो भाकरीच्याच रूपाने घ्यावा लागेल." दरिद्री देशाला भाकरी ही परमेश्वररूप वाटावी यात कसलं आश्चर्य ? हे सारं मला मान्य आहे. पण मुख्य प्रश्न वेगळाच होता. मनुष्य भाकरीवरच जगतो का या प्रश्नाचं माझं उत्तर निराळं होतं. मी त्या विद्वान मित्राला– हो प्राध्यापकाला विद्वान म्हटल्याशिवाय गत्यंतर नाही, म्हणालो—

'भाकरी माणसाला जगवते यात शंका नाही. पण तो भाकरीसाठीच जगतो किंवा भाकरी हेंच जीवनातलं परमसत्य आहे असं तू म्हणतोस ते मात्र मला मुळीच मान्य नाही. भाकरीला बाजूला सारून काही श्रेष्ठ मूल्यांच्या मागं माणसं धावतात म्हणूनच संस्कृतीचा विकास होतो. अन्न ! केवळ अन्न ! ही पशूंची संस्कृती झाली. पोटाच्या पलीकडं त्यांची दृष्टी जाऊच शकत नाही म्हणून तर ते पशूच राहिले. माणसातला "माणूस" भाकरीमुळं नव्हे तर काही उच्च जाणिवामुळं उत्क्रांत झाला. पोटामुळं त्याची माणुसकी वाढली नाही. ती मनामुळं आणि मेंदूमुळं वाढत गेली.'

माझा हा विचार त्याला खोडणं शक्य नव्हतं. माणूस हा सुद्धा एक प्राणीच आहे. केव्हातरी तो पशूच्याच अवस्थेत जगत होता. शरीराच्या भुका भागल्या की तो संतुष्ट राहत होता. पण कधीतरी एखाद्या माणसाच्या मनात कुठल्यातरी नव्या विचाराची ठिणगी पडली असावी. केव्हातरी एखादं स्वप्न त्याच्या डोळ्यांत लकाकलं असावं. त्या स्वप्नाचा मागोवा घेत वाटचाल करताना त्याचं 'मानव्य' आकाराला आलं असेल. मला वाटतं माणसं नेहमीच स्वप्नांवर जगत आली आहेत. भाकरी हे एक साधन आहे. शरीर जगवण्याचं. पण माणूस म्हणून

जगताना त्याला काही स्वप्नं हवी असतात.

प्राध्यापक मित्राला हसू आलं. त्यानं मला विचारलं, " कुणी सांगितलं तुला हे ब्रह्मज्ञान? अरे, कसली स्वप्नं घेऊन बसलास? ज्यांना पोटभर भाकरी मिळत नाही असे लोक कशाची स्वप्नं रंगवणार आहेत? या स्वप्नांच्या आणि आदर्शांच्या गप्पा केवळ भरल्या पोटावर रंगतात. आधी पोटोबा आणि मग नंतर विठोबा! एवढा साधा व्यावहारिक न्याय तुला कळत नाही याला काय म्हणावं? संस्कृती, स्वप्नं, मूल्यं हे सारे भंपक शब्द पक्वान्नांची सुवासिक ढेकर देत उच्चारायचे असतात. या झोपडपट्टीत राहणाऱ्या कोणत्याही माणसाला जाऊन विचार, तो म्हणेल, पोटाची भूक कशी भागवायची या चिंतेत मी आहे. मला तुमचं स्वप्न बिप्न काही कळत नाही." या म्हणण्यात काही अंशी तथ्य आहे. पण तरीही मला असं वाटतं की उद्याची भ्रांत असलेल्या माणसालाही काही स्वप्नं जगण्याची चेतना देत असतात. माणूस केवळ पोटार्थी नाही. त्याला कितीतरी आशा-आकांक्षा असतात. कोणत्यातरी उद्दिष्टासाठी त्याला जगायचं असतं. पिंजऱ्यात बंदिस्त असलेल्या पोपटाला विनासायास डाळिंबाचे दाणे मिळतात. त्याच्या पोटाचा प्रश्न पिंजऱ्यात राहिल्यामुळेच सुटलेला असतो. पण तरीही त्याला पिंजऱ्याचे गज टोचत राहतात. माथ्यावरचं निळं आभाळ त्याला आमंत्रण देत असतं. त्याचे पंख उत्सुक असतात. ते डाळिंबाचे दाणे त्याला नकोसे वाटतात. स्वातंत्र्याची किंमत पिंजऱ्यातल्या सुखापेक्षा अधिक आहे हे त्याला मनोमन पटलेले असते. तो बिचारा आपल्या स्वातंत्र्याचं स्वप्न रंगवीत राहतो.

माणसं भाकरीवरच जगतात हे विधान मला पटत नाही. कार्ल मार्क्स लंडनच्या एका ग्रंथालयात दररोज नियमानं बसून काहीतरी लिहीत होता. वाढलेली दाढी, ओढलेला चेहरा, कपडे फाटलेले. अशक्त दिसणाऱ्या मार्क्सच्या पोटात काहीवेळा भुकेची आग पेटलेली असायची. पण त्याच्या डोळ्यात मात्र कोणत्या तरी नव्या स्वप्नांच्या ठिणग्या पेटलेल्या असायच्या. त्या ठिणग्यांच्या प्रकाशात तो लिहीत राहायचा. झपाटलेल्या मनाने तो सारखा लिहीत होता. त्याचा संसार जागजागी फाटून गेला होता. आजारी मुलीला औषधोपचार करण्यासाठी त्याच्यापाशी पैसे नव्हते. पोटातला भुकेचा वणवा विझवण्याचा प्रयत्न करण्याऐवजी हा अव्यवहारी वेडा माणूस कामगारांच्या जीवनाची मीमांसा करणारा आणि त्यांच्या शोषण मुक्तीचं स्वप्न रंगवणारा एक ग्रंथ लिहिण्यात निमग्न झाला

होता. अत्यंत उत्कटतेनं त्यानं म्हटलं, ‘ जगातील कामगारांनो, एक व्हा. तुम्हाला फक्त तुमच्या पायांतले साखळदंड गमवावे लागतील. पण संपूर्ण नवीन जग मात्र तुम्ही जिंकू शकाल ! ’ कष्ट करणारा कामगार हाच कारखान्याचा मालक आहे म्हणून त्याचा मालकी हक्क प्रस्थापित झाला पाहिजे. असला विलक्षण आशा-वाद त्यानं आपल्या हृदयाशी घट्ट कवटाळून ठेवला होता. भाकरीला किंमत न देता तो आपलं उदात्त स्वप्न आयुष्यभर फुलवीत होता. खरं तर तो आपल्या स्वप्नावरच जगत होता. त्याच्या प्रेतयात्रेला मूठभर लोकही आले नाहीत. पण या उपेक्षित माणसाचं एक भव्य स्वप्न त्यानं लिहिलेल्या ‘ कॅपिटल ’ या ग्रंथातून पुढे असंख्य लोकांच्या मनात उतरलं. आपलं जिवाभावाचं स्वप्न घेऊन जेव्हा तो जगाचे दरवाजे ठोठावीत होता तेव्हा या वेड्या फकिराची कोणीच दखल घेतली नाही. तो केव्हातरी मरून गेला. पण त्याचं स्वप्न मात्र जिवंत राहिलं. त्याच्या ग्रंथानं, त्यातल्या बंडखोर विचारानं, त्यातल्या आक्रमक ध्येयवादानं, जगाच्या आर्थिक आणि सामाजिक विचारात क्रांती घडवून आणली. त्यानं लिहिलेल्या विचाराचे निखारे आजही रसरशीत आहेत. हा मनुष्य स्वतःच्या भाकरीच्या चिंतेत कधीच गुरफटला नाही त्याचं आश्चर्य वाटतं. त्यानं तसं केलं असतं तर आणखी पंधरा-वीस वर्ष तो जगू शकला असता. कोणत्या उज्ज्वल आणि उदात्त स्वप्नांच्या मागं धावणारा स्वप्नवादी किती वर्षं जगला या कारकुनी हिशोबाला फारसा अर्थ असत नाही. माणसानं जरूर जगावं पण त्यानं स्वप्न घेऊन जगावं. याचा अर्थ वास्तवाकडं त्यानं पाठ फिरवावी असा मुळीच नाही. माझा मित्र म्हणाला,

“ तुझ्या बोलण्यात मला विसंगती दिसते. थोडा तर्कशास्त्राचा अभ्यास तुला केलाच पाहिजे. स्वप्नासाठीच जगावं आणि वास्तवाला विसरू नये हे तुझं विधान सुसंगत आहे का ? एकाच वेळी वास्तव आणि स्वप्न एकत्र कसं येऊ शकेल ? ”

मी उत्तर दिलं, “ पुस्तकांचं केवळ चर्वितचर्वण करणाऱ्या प्राध्यापकाला हे समजणं शक्य नाही. स्वप्न म्हणजे वास्तवतेचं आदर्शात रूपांतर. केवळ अशक्य, अद्‌भुत कोटीतल्या कल्पनाशी खेळणं हास्यास्पद आहे. असल्या फसव्या स्वप्नरंजनात काही अर्थ नसतो. पण वास्तवावरची पकड ढिली न होऊ देता एखाद्या श्रेष्ठ आदर्शाचा ध्यास घेणारी माणसं असतात. कदाचित तुझ्या

सारखे लोक त्यांना वेड्यांच्या सदरात टाकतील. खुशाल टाकू द्या. आजचे वेडे उद्या प्रेषित आणि महात्मे ठरतात हा इतिहास आहे. अरे, फार वर्षं झाली नाहीत या घटनेला. मोहनदास गांधी नावाच्या एका तरुण बॅरिस्टरानं पाशवी अत्याचाराचा प्रतिकार करण्यासाठी दक्षिण आफ्रिकेत अहिंसात्मक सत्याग्रह सुरू केला होता. हेच शस्त्र हातात घेऊन त्यानं भारताचा स्वातंत्र्यसंग्राम सुरू केला. मिठाचा कायदा मोडला. तेव्हा सर्व जग त्याला हसलं. कुणी म्हणालं, ' मिठाची चळवळ झाली. आता तिखटाची सुरू करा.' कुणी उपहास करून म्हटलं, ' वास्तवाचं आकलन या गांधीला कधीच झालं नाही. अहिंसेनं स्वातंत्र्य कधी मिळणं शक्य आहे का ? हा एक व्यवहारशून्य वेडा आहे. ' या वेड्याचं स्वप्न मात्र उत्तुंग होतं. लक्षात ठेव, लहान माणसांना जेव्हा मोठी स्वप्नं पडतात आणि त्या स्वप्नांमागं जेव्हा ती बेभान होऊन धावतात तेव्हा ही लहानखुरी वाटणारी माणसं महात्म्यांच्या मालिकेत जाऊन बसतात. "

पण याचा अर्थ भाकरी अगदीच नगण्य आहे असा मात्र नाही. अखेर महात्म्यालाही पोट असतेच. कित्येक कलावंत, कवी, नाटककार पोटासाठीच कुठल्यातरी क्षुद्र नोकरीत बंदिवान होऊन पडतात. माझा एक मित्र कवी आहे. त्याच्या काही कविता तर विलक्षण भावस्पर्शी आहेत. त्या कविता अगदी काळजाला भिडतात आणि जखम करतात. ती वेदना एकाच वेळी व्याकुळही करते आणि रोमांचितही करते. तो काही प्रसिद्ध कवी नाही. म्हणूनच त्याच्या कविता चांगल्या आहेत. प्रसिद्धीच्या झगझगाटापासून दूर असलेल्या या मित्राच्या कित्येक कविता मी त्याच्या डायरीतून वाचल्या आहेत. केव्हा केव्हा त्यानंही मला आपल्या कंपयुक्त स्वरातून वाचून दाखवल्या. मी त्याला विचारलं,

" तुझ्या कवितांत इतकं विलक्षण कारुण्य कुठून आलं ? मला तरी या कविता वाचताना सभोवती अंधार दाटत चालला आहे असं वाटतं." तो काहीशा तीव्रतेनं म्हणाला,

" खरं आहे. अरे, याच अंधारानं माझी सारी प्रकाशस्वप्नं गिळून टाकली. शिक्षण अर्धवट सोडून कुटुंबातल्या दहा माणसांची जबाबदारी मला पत्करावी लागली. गेली सहा–सात वर्षं माझे वडील अंथरुणाला खिळून आहेत. अर्धांगानं त्यांचा लोळागोळा झालाय. ते धड जगत नाहीत आणि त्यांना मरणही येत नाही. इतकी माणसं दररोज मरतात पण मरणानंसुद्धा माझ्या वडिलांवर दया करण्याचं

नाकारलेलं दिसतंय. साऱ्या कुटुंबाला दररोज दोन वेळा पोट भरता आलं पाहिजे इतकीच माझी आता जीवनापासून अपेक्षा आहे स्मशानाच्या वाटेवर नाक्यावर बसून दररोज मृत्यूचे पास फाडणारा, नोंदी करणारा मी एक सामान्य कारकून म्हणून गेली दहा वर्षं काम करतो आहे. माझ्या सगळ्या सगळ्या स्वप्नांची या मसणवाटेत आता राखरांगोळी होत आहे. पोट भरण्यापलीकडं मला काहीच करणं शक्य नाही. पण तरीही आज माझ्या मनात काही अर्धवट जळालेल्या स्वप्नांचे अवशेष आहेत. तेच माझ्या कवितांत दिसतात. असं वाटतं की हा अंधार कधीतरी संपेल. कधीतरी माझं एखादं मृतस्वप्न जागं होईल. जीवकळेनं ते बहरून जाईल. पुन्हा नवे किरण मला भेटतील. त्या आशेवर मी जगत आहे.''

या कारकुनाच्या उद्ध्वस्त जीवनाची हकीकत विलक्षण करुण आहे. पण या कवीच्या मनात अजूनही एखादं स्वप्न शिल्लक आहे हे ऐकून मला फार बरं वाटलं. ज्याला स्वप्नं पाहाता येतात तो कवी असतो. जो केवळ भाकरीच्याच विचारात् गुरफटून राहातो त्याच्या जीवनात सौंदर्य कसं निर्माण होणार ? कोणाला कोणकोणती स्वप्न पडतात यावर त्याची अभिरुची, संस्कृती, जीवनदृष्टी अवलंबून असते. जगातलं सारं दुःख निरसून टाकावं, माणसाच्या हृदयातली दुःखाची मुळं आपण निपटून टाकावीत, त्याच्या डोळ्यातले अश्रू आपल्या हळुवार हातांनी पुसून टाकावेत आणि त्याच्या गालांवर आशेचं हसू फुलवावं हे अत्यंत भावोत्कट स्वप्न गौतम बुद्धानं जन्मभर पाहिलं. साऱ्या माणसांना गुलाम करून त्यांच्यावर आपली सत्ता गाजवावी असंही स्वप्न काही सम्राटांनी, हुकुमशहांनी पाहिलं आणि निरपराध माणसांच्या रक्तानं ते रंगवलं. मला वाटतं, स्वप्न सारेच जण पाहातात. भाकरी ही एक शरीराची गरज. पोटासाठी ती आवश्यक आहे. पण मन जगवायला, भावना फुलवायला आणि जीवन जिवंतपणानं उपभोगायला माणसाला स्वप्नांचीच गरज असते. एखादा तत्त्वज्ञ मला म्हणेल,

"जीवन हे सुद्धा एक स्वप्नच आहे. या स्वप्नात मनुष्य आणखी काही स्वप्नांच्या ज्योती पेटविण्याचा प्रयत्न करतो इतकंच."

१९

# शेवटचा दीस गोड व्हावा !

कोणतं तरी स्तोत्र अत्यंत भक्तिभावानं आपल्या श्रुतिमधुर, पण स्पष्ट, शुद्ध आणि खणखणीत आवाजात पंडितजी म्हणत आहेत. त्या संस्कृत शब्दांचा मृदुल स्पर्श आणि नाद कानांना सुखवीत आहे. जणू देववाणीतलं सारं सौंदर्य पंडितजींच्या पठणातून आकार घेत आहे. त्या मंतरलेल्या शब्दांनी सारं घर भरून जातं. गद्य वाचताना, काव्य म्हणताना किंवा कुणाशी चर्चा करताना पंडितजींचा आवाज खालच्या पातळीवर कधीच नसतो. विचारही वरच्या पातळी-वरचे आणि उच्चारही त्याच उंचीवरचे. आचाराबद्दल तर प्रश्नच नव्हता. एका सरळ वाटेनं हा अति सरळ माणूस नव्वद वर्षांहून अधिक काळ चालत राहिला. धर्ममूल्यांचा हात धरून शांतपणानं आपल्याच नादात या सात्त्विक विद्वानाची पाउलं एकाच तालात पडत राहिली. पायांना वाकडं वळण माहीत नाही. जिभेलाही त्याचा पत्ता नाही. 'बोले तैसा चाले' हाच स्वभाव. दररोज नित्यनेमानं शेपन्नास आर्या लिहून काढायच्या आणि त्या आपल्या नादवती वाणीनं मोठ्या प्रसन्नपणानं म्हणायच्या. कवि आणि श्रोता या दोन्ही भूमिका पंडितजीच करतात. व्यवहारात गुरफटलेल्या जगाला त्यांची धार्मिक कविता ऐकायला वेळ नसतो. हा 'डबल रोल' करता करता सारं आयुष्य संपत आलं तरी त्यांना जाणीव नाही. किंवा खरं सांगायचं तर या भूमिका करीतच आपल्याला हा जीवनप्रवास संपवायचा आहे हे मनाशी ठरवून घेतलेलं आहे. एखादा अभिजात नट जसा

आपल्या भूमिकेशी संपूर्णतया समरस व्हावा तसे ते आपल्या साहित्य संसारात सर्वस्वी रंगले आहेत. अनेक वादळे आली, नि निघून गेली. त्या वादळांकडे निर्विकारपणानं पाहत पंडितजी लेखन करीत राहिले. आपल्या मित्रांबरोबर आणि आपल्या नातलगांसमवेत ते वर्षेच्या वर्षे काव्यशास्त्र-विनोद करीत राहिले. समंत-भद्र, कुंदकुंद, रविषेण, अमितगती, शंकराचार्य, आशाधर, तत्त्ववेत्ते आचार्य आणि पुष्पदंत, कालिदास, भवभूती, भारवी, असे महाकवी दररोज त्यांच्या लहानशा अभ्यासिकेत एकत्र येत आहेत आणि या 'स्वकीयां'बरोबर विलक्षण समरसतेनं वादसंवाद करताना, काव्याचा आस्वाद घेताना असंख्य रात्री त्या रसरंगात विरघळून गेल्या. भूतकालातल्या या कविमित्रांनी त्यांचा वर्तमानकाल सुखाचा केला. तसे पंडितजी वर्तमानकालात फारच थोडा वेळ रमले. ते तीर्थंकरांच्या आणि पुराणकालीन चक्रवर्ती राजांच्या काळातच स्वछंदाने फिरत राहिले.

प्राचीन संस्कृत, प्राकृत आणि धार्मिक साहित्याचा पंडितजींचा व्यासंग अफाट आहे. जुन्या ग्रंथातले शेकडो श्लोक, वचनं आणि कित्येक उतारे संदर्भ सांगून ते सहज म्हणून दाखवतात तेव्हा ऐकणारा मनुष्य त्या खळखळून वाहणाऱ्या प्रवाहाबरोबर वेगानं वाहात जातो. आनंदानं आणि आश्चर्यानं तो उद्‌गारतो, 'पंडितजींचं पाठांतर दांडगं आहे.' पण गंमतीची गोष्ट अशी की, त्यांनी मुद्दाम काहीच पाठ केलेलं नाही. वैशिष्ट्यपूर्ण श्लोक आणि उतारे त्यांच्या संवेद्य मनात कायमचं घरटं करून बसतात. चाळीस वर्षांपूर्वी वाचलेल्या ग्रंथातले उतारे काना-मात्राही न चुकता आज त्यांना आठवतात. पण काल सकाळी आपल्याला भेटायला कोण आला होता, याची आठवण मात्र संध्याकाळी राहत नाही. स्मरणाबरोबर विस्मरणाचीही शक्ती विलक्षण. अप्रिय घटना त्यांच्या मनातून फार लवकर पुसल्या जातात. एकदा एका गृहस्थानं काही धार्मिक मतभेदांवरून त्यांना 'अधार्मिक' शब्द कठोरपणे सुनावले. पंडितजींनी कसलंही प्रत्युत्तर दिलं नाही. चार–आठ दिवसांनी त्या गृहस्थानं त्यांची क्षमा मागितली. पंडितजींच्या डोळ्यांना पाणी आलं. ते म्हणाले,

'असा मानसिक त्रास करून घेऊ नका. आठ दिवसांपूर्वीचे तुमचे शब्द आता मला आठवत नाहीत. जे आठवून आनंद होत नाही त्याची आठवण मुद्दाम मनात ठेवणं हे एक पातक आहे. त्या वेळचे तुमचे मानसिक परिणाम आता या

क्षणी नाहीत. मनाचे भाव बदलत जातात. आपलं मन अधिकाधिक उज्ज्वल करणं हाच मला धर्म वाटतो. क्षमा मागणारा धार्मिक असतो.' असं म्हणून त्यांनी त्या 'धार्मिक' गृहस्थाला काही संस्कृत श्लोक आपल्या बोलण्याच्या पुष्टीसाठी खणखणीत आवाजात म्हणून दाखवले. पंडितजींना कुणाशी वैर करणं जमत नाही. याचं कारण असंही असेल की, त्यांच्याशी कुणीही कसलं वैर केलं नाही. 'अंतरी निर्मळ, वाचेचा रसाळ' असणाऱ्या माणसाशी भांडण तरी कुणाचं असणार? अहंकारातून भांडणं निर्माण होतात. या माणसाला तर अहंकाराचा वाराही लागला नाही. पंडीतजींची मानसिक आणि बौद्धिक प्रकृती कधीच बिघडली नाही. 'ठेविले अनंते तैसेचि रहावे, चित्ती असो द्यावे समाधान' या संत वचनाचं हे साक्षात् जितंजागतं उदाहरण. धर्म, तत्त्वज्ञान आणि साहित्य यांच्या उभ्या आडव्या, सुंदर रेशमी धाग्यांनी त्यांच्या व्यक्तिमत्वाचं बाह्यतः साधं पण अंतर्यामी जरतारी असलेलं वस्त्र विणलं गेलं आहे. अंगातला सदरा फाटला आहे काय इकडं कधीच लक्ष नसतं. पण आपल्या संग्रहातल्या हजारो ग्रंथांना सुबक पुठ्ठे घालण्यात त्यांनी रस घेतला आहे. लेखणी आणि पुस्तक यांच्याशी त्यांचा 'आत्मबंध' जडलेला आहे. आपलं एखादं पुस्तक कुणी वाचायला नेलं आहे हे त्यांच्या पक्कं लक्षात असतं. ते लवकर परत मिळवलं नाही तर ते अस्वस्थ होतात. लेखन आणि वाचन हेच त्यांच्या आग्रहाचे विषय असतात. बाकी कोणत्याही बाबतीत त्यांचा आग्रह नसतो. एका हितचिंतकानं त्यांना एकदा विचारलं,

'पंडितजी, त्या गृहस्थाला तुम्ही सात आठ हजार रुपये हातउसने दिलेत, साधी चिठ्ठीसुद्धा लिहून घेतली नाही. आता तो माणूस तुमचं तोंड चुकवतो. त्याच्याकडून कसले पैसे वसूल करणार? ते आता बुडाल्यातच जमा झाले.'

पंडितजी थोडेसे हसले. हातातला ग्रंथ त्यांनी मिटला आणि म्हटले,

'त्या रकमेबद्दल मी विसरूनच गेलो होतो. पण मूर्खाला दिलेली विद्या आणि दुसऱ्याच्या हाती गेलेलं धन दोन्ही व्यर्थ होतात असं एक संस्कृत सुभाषित आहे. पैसे बुडण्याबद्दल मी इतकंच म्हणतो की, ज्याचे होते ते तो घेऊन गेला. माझे असतील तर मला न मागताही मिळतील. अखेर या साऱ्या गोष्टी कर्मगतीनं घडत असतात. निष्कारण चिंता करून त्याचा काय उपयोग होणार? ते राहू द्या. कालच अहिंसा धर्मावर मी शंभर–दीडशे आर्या लिहिल्या

आहेत. त्या वाचून दाखवतो.'

पंडितजी आपल्या अस्खलित वाणीनं आर्या वाचण्यात रंगून गेले. तो श्रोता समोर आहे की नाही याचेही त्यांना भान नाही. या कवीला श्रोत्याचीही अपेक्षा नसते. याची शब्दगंगा वाहात राहते.

आपल्या व्यवहारशून्यवृत्तीमुळं आपल्या तथाकथित 'मित्रमंडळींनी' आपल्याला किती सहस्र रुपयांना बुडवलं याचा हिशेब त्यांना माहीत नाही. एका रीतीनं ते चांगलं आहे. कुणीही यावं आणि त्यांच्या सरळपणाचा, सज्जनपणाचा किंवा खरं तर व्यवहारशून्य स्वभावाचा गैरफायदा घ्यावा असं अनेक वेळा घडतं. घरातल्या माणसांनी त्यांचा आर्थिक अधिकार काढून घेतल्यावर हे प्रकार हळूहळू थांबतात. पैशाची किंमत त्यांना कधी कळाली नाही. त्यांच्या सुखविषयक तत्त्वज्ञानात या तुच्छ पैशाला कधी जागाच मिळाली नाही. वडिलांनी काटकसरीनं मिळवलेले हजारो रुपये त्यांनी या पद्धतीनं उधळले. पण त्याची खंतही त्यांना वाटली नाही. अंगावरचे जाडे भरडे सुती कपडे, दोन वेळा ताटात पडणारी भाकरी आणि एखादी भाजी यावर वर्षानुवर्ष अत्यंत समाधानात राहायला मनुष्याजवळ काहीतरी 'आध्यात्मिक' बळच पाहिजे. कुठली तरी एखादी अतूट विलक्षण उत्कट निष्ठा अशा लोकांच्या मनीमानसी रुजलेली असते. ती निष्ठाच त्यांना जागवते. एखाद्या भौतिक वेदनेनं यांना ग्रासलेलं असलं तरी शरीराचं दु:ख यांच्या मनाला विळखा घालू शकत नाही. शरीर हा एक अत्यंत नाशवंत असा पर्याय आहे. आत्म्याच्या चिंतनात या शरीराची चिंता कशाला करायची? असला तात्त्विक मुद्दा हे लोक विचारतात. पंडितजी संसारात असूनही संसारात नसतात. ऐन चाळिशीत त्यांनी शांतपणानं पत्नीचा मृत्यू पाहिला. तिचा अंत जवळ आल्यावर त्यांनी 'समयसार' हा ग्रंथ हाती घेतला आणि त्यातले श्लोक ते म्हणू लागले. पत्नीची प्राणज्योत मालवल्यावर पंडितजी म्हणाले, 'आत्म्यानं जुनं वस्त्र सोडून दिलं. एक नाटक संपून गेलं, पडदा पडला.' डोळ्यातलं पाणी पुसून त्यांनी पुन्हा ग्रंथवाचनाला सुरुवात केली.

वर्ष–सहा महिन्यांनंतर अनेकांनी त्यांना लग्नाबद्दल सुचवून पाहिलं. त्यांनी मूक नकार दिला. पण फार आग्रह होत आहे असं दिसल्यावर त्यांनी स्वच्छ खुलासा केला.

'संसाराचं स्वरूप मी पाहिलं. काही वर्षं त्याचा अनुभवही घेतला. त्याची

कडू चव जिभेवर घोळत असताना संसार गोड आहे अशा भ्रमानं पुन्हा त्याच्याकडं वळण यासारखा दुसरा वेडेपणा नाही. जे आपल्या कर्मात असतं तेवढंच आपल्याला वाट्याला येतं. उगीच एखाद्या मृगजळामागं धावायचं आणि अखेर कंठशोष पडून मरायचं असला 'भ्रांतिमूलक' आशावाद मला मान्य नाही. जोपर्यंत शरीराच्या आणि मनाच्या शक्ती कायम आहेत तोपर्यंत मला धर्माची आणि साहित्याची सेवा करू द्या. खोट्या संसारासाठी आयुष्य उधळून टाकावं असं मला वाटत नाही. वेळ फार थोडा आहे. 'लग्न आणि संसार' हे शब्द आता माझ्या कोषात राहिले नाहीत. जिथं आपला देह देखील आपली अखेरपर्यंत सोबत करीत नाही तिथं या मायावी संसारसुखाबद्दल तुम्ही मला काय सांगणार आहात ? संसाराचं सुख म्हणजे आकाशाच्या वेलीला लागलेलं फूल. जे मुळातच नसतं ते गृहीत धरून त्यांचा सुगंध घेण्याचा प्रयत्न करायचा, असल्या निरर्थक खटाटोपात गुंतून पडण्यात काय स्वारस्य आहे ?'

पंडितजींच्या या बिनतोड, अतिवास्तव विचारांचा प्रतिवाद कोण करणार ? एकदा भौतिक सुखाची आणि संसारमोहाची दारं त्यांनी बंद करून ठेवली ती कायमचीच ! संसाराची आसक्ती अनिवार्य असते असं म्हणतात. तिच्या उष्णतेनं योग्यांचा निग्रहसुद्धा वितळून जातो म्हणतात. पण काय असेल ते असो ! पंडितजींना त्या संसाराची आठवणही झाली नाही. साहित्यावर, धर्मावर आणि तत्त्वज्ञानावर प्रेम करणारं त्यांचं सुसंस्कृत मन आता अधिकच अंतर्मुख झालं. त्यांच्या चिंतनाला आणि वाणीला आता लालित्याचा मोहोर येत चालला. धर्माच्या स्वरूपाबद्दल, माणसाच्या धर्मविषयक कर्तव्याबद्दल, जीवनाच्या उद्दिष्टांबद्दल आता ते अतिउत्साहानं लिहू लागले, बोलू लागले. त्यांची पुस्तकं छापली जाऊ लागली. काव्याचा आणि धर्मभावनेचा सुगंध उधळीत त्यांची लेखणी कलात्मक नृत्य करू लागली. संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश साहित्याचा एक अनिवार छंद त्यांनी जोपासला. त्याचं संशोधन, त्यावर टीका टिप्पणी असं लेखन सुरू झालं. गावोगाव आता त्यांची प्रवचनं-व्याख्यानं सुरू झाली. मंदिरात व्यासपीठावर बसून प्रवचन करताना त्यांच्या डोळ्यासमोर ते पुराणकालीन वातावरण एखाद्या चित्रासारखं नटून थटून उभं राहायचं. एखादी कथा, एखादी चर्चा पंडितजींच्या संस्कृतप्रचुर अतिशुद्ध काव्यवाणीतून ऐकणं हा श्रोत्यांच्या सुदैवाचा भाग असतो. वक्तृत्व शांत आणि संथ. त्यात आर्तता असेल, पण आक्रमकता, आवेश नाही.

जिभेवर येणारा प्रत्येक शब्द हृदयाचा ओलावा घेऊन येतो. आंतरिक जिव्हाळ्यात मिसळलेलं शब्दाचं वाङ्मयीन सौंदर्य पंडितजींच्या शालीन स्वभावाचा रंग घेऊन प्रकट होतं. पोटाची चिंता पाठीमागं ठेवून महाराष्ट्रात ते ठिकठिकाणी जातात आणि सलग पंधरा दिवस, महिनाभर प्रवचनं करीत राहतात. त्यांची व्याख्यानं आणि साहित्य म्हणजे धर्मविचारांचं एक भांडारच. एकदा एका साहित्यिकानं त्यांना विचारलं,

'पंडितजी तुमची काव्यशक्ती अजब आहे. तुमच्यासारखी निर्दोष, वृत्तबद्ध रचना करणारे आज क्वचितच असतील. पण तुमचं सारं साहित्य तुम्ही या धार्मिक चौकटीतच का बंदिस्त करून ठेवलं आहे ? आजची काव्याची धाटणी वेगळी आहे. लोकांच्या आजच्या अभिरुचीला तुमचं हे जुन्या पठडीतलं काव्य चालत नाही. केवळ धार्मिकच लिहीन हा आग्रह कवीनं धरू नये. तुम्हाला काय वाटतं ?'

त्या साहित्यिकाचं म्हणणं तर्कशुद्ध होतं, पण पंडीतजींना ते मान्य होण्यासारखं नव्हतं. आपल्या अंतःकरण प्रवृत्तीनं स्वीकारलेली वाट त्यांना सोडणं शक्य नसतं. ज्या परंपरेत ते वाढले ती त्यांना प्रिय होती. ते विनयानं म्हणाले,

'मी प्रथम धार्मिक आहे आणि नंतर कदाचित कवी असेन. माझं स्वतःचं समाधान मला या धार्मिक आणि तात्त्विक विचारमंथनात सापडतं. धर्मसाहित्यातला रस माझ्या दृष्टीनं कधी आटत नाही की कधी बिटत नाही. साहित्य हे पुण्यबंध घडवणारं असावं. सामान्य वासनाविकारांच्या कथा आपल्याला जखडून ठेवतात. साहित्यानं तर मुक्त केलं पाहिजे. जिनसेन आचार्यांनी महापुराणात म्हटलं आहे, कविता ही पुण्यानुबंधिनी असावी. तशी ती नसेल तर पापाला कारण होते. आपलं प्राचीन कथा आणि काव्यसाहित्य गुणवान आहे. कला सुंदर आहे आणि ते धर्मसंदेश देणारेही आहे. साहित्याचा संबंध धर्माशी असावा आणि धर्म ही तर आपल्या जीवनाची आधारशीला असली पाहिजे असं मला मनापासून वाटतं. मग मीच आजच्या लोकाभिरुचीला अनुसरून लिहावं असं तुम्ही कसं म्हणता ? तारणारं साहित्य लिहावं. मारणाऱ्या साहित्याकडं आपण वळू नये अशी माझी भूमिका आहे.'

हा युक्तिवाद त्यांच्या दृष्टिकोणातून पाहिलं तर बरोबरच आहे. साहित्याचे निकष व साहित्यिकाची बांधिलकी त्यांच्या मते हीच आहे. आपण प्रमाण मान-

लेल्या आदर्शाची भक्ती करीत, प्रचार करीत पंडीतजी लेखन करतात. विपुल आणि वेगानं लिहिणारा हा पंडीत कवी. दासोपंत, मोरोपंत यांच्याच परंपरेतला. लेखणी हेच जीवनाचं रहस्य. पंचवीस वर्षांपूर्वी पंडीतजींच्या पोटावर एक मोठी शस्त्रक्रिया करण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर ते जगतील अशी चिन्हं दिसेनात. मिनिटामिनिटाला त्यांचा रक्तदाब पाहिला जात होता. प्राणवायू सारखा दिला जात होता. डॉक्टर काहीशा अस्वस्थतेनं उभे होते. आप्तनातलगांच्या मुद्रा काळवंडलेल्या. पंडितजी डॉक्टरांना क्षीण आवाजात म्हणाले,

' मी रामायण लिहायला घेतलं आहे. त्याची फक्त बेचाळीस पर्वं लिहून झाली आहेत. अजून सत्तर तरी पर्वं मला लिहायची आहेत. तोपर्यंत मला जगलंच पाहिजे. सध्या तरी मला मरायचं नाही. मला रामायण पूर्ण करायचं आहे.' डॅक्टरांच्या चेहऱ्यावर स्मितरेषा उमटतात. हा ' पेशंट ' निराळा आहे, त्याचे औषध त्याच्या जवळच आहे असं त्यांना वाटलं असावं. आपल्याला अजून लिहायचं आहे हीच पंडीतजींच्या जीवनामागची प्रबल प्रेरणा असते. त्यांच्या दीर्घायुष्याच्या झरा प्रसन्न रीतीनं झुळझुळत राहिला याचं एकमेव कारण त्यांच्या लेखणीतूनच त्यांना अमृतसंदेश मिळत होता. कशाचं तरी वेड असल्याशिवाय माणूस शहाणपणानं जगू शकत नाही. आपल्या तृप्तीत आणि तंद्रीत लिहायला आणि जगायला एखादं वेड उरात फुलवावं लागतं. या वेडालाही उदात्ततेची बैठक असेल तर जीवनाची एकतारी मस्त झंकारत राहाते. पंडितजींच्या जगण्याला एक सुरेख लय होती. कधी कधी ती बिघडायची. दररोजच्या वर्तमानपत्रात कुठंतरी खुनाची, रक्तपाताची, अत्याचाराची बातमी असते. ती वाचनात आली की, ते बेचैन होतात. आपल्या खोलीत अस्वस्थ येरझारे घालताना म्हणतात, ' काय चाललंय हे ? जगाचा तोल इतका कसा ढासळलाय ! चांगली मूल्ये आणि संस्कार यांची अशी दुरवस्था व्हावी ? माणसानं थोडा आपल्याशी, आपल्या आत्म्याशी संवाद करायला शिकलं पाहिजे. आत्मदर्शन होत नाही तोपर्यंत हा हिंसेचा आणि विकारांचा वडवानल असाच पेटत राहाणार आहे.' त्यांचं हे नेहमी चालणारं ' स्वगत ' साऱ्या घराला ऐकू जातं. त्यांच्या स्पष्ट, मधुर शब्दांच्या लहरींनी घर कसं उचंबळत राहातं. नव्वद वर्षांचा हा कवी आणि पंडीत दोन महिन्यांच्या मुलीला खेळवू लागला म्हणजे दोन निरागस बाल्यांचं दर्शन घडतं.

पंडीतजींना अलीकडं तीव्रतेनं जाणीव होते की, आता आपली यात्रा संपत

आली आहे. ज्या तत्त्वांची पताका आपण खांद्यावर घेतली ती जन्मभर यथाशक्ती नाचवली. जीवनाचं मंगल गाणं आपण अंत:करणापासून गात राहिलो. खूप खूप लिहिलं. झपाटून लिहिलं. बरंच साहित्य अजूनही अंधारात आहे. पण त्याची खंत नाही. त्या साहित्याच्या प्रत्येक शब्दात नि अक्षरात आपण आत्म्याचा प्रकाश ओतण्याचा प्रयत्न केला आहे. आपण आपल्या समजुतीप्रमाणे लोकमनात काही आदर्शांची पेरणी करण्याची धडपड केली. परतफेडीची अपेक्षा न करता जे देणे शक्य होतं ते मी दिलेलं आहे. आलेला प्रत्येक दिवस मी गोड करून घेतला. आता माझा शेवटचा दिवस गोड व्हायला काहीच हरकत नाही. पंडीतजींचा हा स्वगत संवाद संस्कृत भाषेतून दररोज चालतो.

' शरीराच्या पिंजऱ्यात तुला फार वर्षे बंदिवान होऊन राहावं लागलं. पण तू मूळचा मुक्त आहेस. सम्यक्ज्ञानाची प्राप्ती झाल्यानंच तुझं कल्याण होईल. दर्शन, ज्ञान आणि चारित्र्य हाच मुक्तीचा महामार्ग आहे.'

पंडीतजींच्या या मुक्त स्वगतात त्यांच्या मनाचा ठाव लागतो. एक स्वच्छ आणि सुंदर मन शब्दांतून उलगडत जातं. या मनाला एक कोवळा सुवास आहे. या मनाच्या देव्हाऱ्यात विशुद्ध भावनेचा एक नंदादीप तेवत आहे. अनंताकडं जाण्याची एक ओढ या मनातून उमटणाऱ्या शब्दातून जाणवत आहे. वाट संपत आली असावी, मुक्तिमंदिराचं शिखर आता दृष्टीच्या टप्प्यात आलं असावं म्हणूनच यांचे मन ही भैरवी गात आहे. यांचा शेवटचा दिवस गोड होणार यात शंका नाही.

# हिरव्या वाटा

जीवनाची वाट काव्याकुट्यांनी भरलेली असते, असा एक समज आहे. अंशतः तो बरोबरही असेल. पण रसिकतेच्या लोलकातून जीवनाकडे पाहणाऱ्या सुजाण व्यक्तीला कित्येक 'हिरव्या वाटा' दिसल्याशिवाय राहात नाहीत. हिरवे मन अशा वाटांनी मग चालत राहाते.

निर्मलकुमार फडकुले यांचे जीवनचिंतन एका ललितसुंदर हिरव्या वाटेने काही लक्षणीय वळणे घेत चालले आहे. जीवनातल्या नाना प्रवृत्तींचा आणि प्रश्नांचा रसप्रसन्न दृष्टीने वेध घेत, त्यांची काव्यात्म चर्चा त्यांनी केली आहे. आशावाद, प्रगल्भ आणि रुचिर वृत्ती व सहजसुंदर शैली हे या ललितलेखनाचे विशेष आहेत. तत्त्वचिंतन आणि लालित्य यांच्या संगमातून आकाराला आलेल्या या 'हिरव्या वाटा' वाचकांना आनंद देतील. अंतर्मुख करतील.

एक साक्षेपी, रसिक समीक्षक या नात्याने निर्मलकुमार फडकुले मराठी वाचकांना परिचित आहेत. लोकहितवादी आणि संतकवी तुकाराम यांच्या साहित्याचा आणि व्यक्तित्वाचा त्यांनी विचक्षणतेने शोध घेऊन त्यांच्या प्रतिमा नव्या दृष्टीने मांडण्याचा प्रयत्न केला. आता ललितलेखांचा एक नवा संग्रह त्यांनी वाचकांपुढे ठेवून आपल्या विविध वाटचालींचे दर्शन घडवले आहे.